## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




# ई मासिक विद्यासंवाद

ऑक्टोबर २०२४ | आवृत्ती–१६



## पुण्यतिथी निमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन

विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन–जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
१०० शताब्दी वर्ष
१९२३ - २०२३

ऑक्टोबर २०२४ | आवृत्ती–१६

मार्गदर्शक
**डॉ. प्रशान्त बोकारे**
प्रभारी कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. राजेंद्र काकडे**
प्रभारी प्र–कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. सी. पी. राधाकृष्णन**



मा. प्रभारी कुलगुरु
**डॉ. प्रशान्त बोकारे**



मा. प्रभारी प्र–कुलगुरु
**डॉ. राजेंद्र काकडे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**





## विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी अध्यासन विभागात 'लघुचित्रपटाचे' आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा पुण्यतिथी कार्यक्रम शुक्रवार, दिनांक ११ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी पार पडला. पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनातर्फे लघु चित्रपट दाखविण्यात आला.

महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्याला माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या शुभहस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे माजी संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे, डॉ. राजेंद्र काकडे, डॉ. मोईज मन्नान हक, डॉ. संजय ढोबळे, डॉ. सरोज शामकुवर, डॉ. संयुक्ता थोरात, डॉ. राहुल खराबे, उद्यान अधीक्षक प्रवीण गोतमारे यांनी राष्ट्रसंतांना आदरांजली अर्पण केली. अध्यासन विभागातील सभागृहात राष्ट्रसंतांच्या जीवनकार्यावर आधारित प्रा. मनोज विष्णूरकर निर्मित 'तुकड्यादास' हा लघु चित्रपट दाखविण्यात आला. यावेळी श्री गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी सर्वश्री दीपक इंगळे, विठ्ठल काठोळे, रवी चौधरी, राजकुमार बोके, गणेशराव भारती, मनोज चौधरी, रामराव धारणे, बाबाराव पाटील, सुभाषराव वर्होकार यांच्यासह विभागप्रमुख शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यासन विभागातील शिक्षक डॉ. देवमन कामडी, प्रा. सुजित जाधव, कल्याणी मेश्राम, छाया खोब्रागडे यांनी सहकार्य केले.



## प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून डॉ. राजेंद्र काकडे यांनी स्वीकारला पदभार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून डॉ. राजेंद्र काकडे यांनी गुरुवार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी पदभार स्वीकारला. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी औषधी निर्माणशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. राजेंद्र काकडे यांचे पदभार स्वीकारल्यानंतर पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रभारी संचालक डॉ. संजय कवीश्वर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतर विद्याशाखीय अभ्यासविद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, आयआयएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ, डॉ. संजय ढोबळे, डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, उपकुलसचिव श्री. संजय बाहेकर, डॉ. राजेंद्र उतखेडे, श्री उमेश उईके, सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार, श्री. संजय भोयर, उद्यान अधीक्षक श्री प्रवीण गोतमारे, कुलगुरू कार्यालयातील श्री सतीश साधनकर यांच्यासह अन्य उपस्थित होते.







# महात्मा गांधींच्या जीवन व कार्यासंबंधीचे ज्ञानकण विद्यार्थ्यांनी वेचावे

## अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांचे प्रतिपादन

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महात्मा गांधी जयंती सप्ताहाचे समापन

महात्मा गांधी यांच्या जीवन व कार्यासंबंधीचे ज्ञानकण विद्यार्थ्यांनी मधमाशांप्रमाणे वेचावे, असे प्रतिपादन मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर महात्मा गांधी विचारधारा विभागाच्या वतीने महात्मा गांधी जयंती सप्ताह आयोजित करण्यात आला. महात्मा गांधी जयंती सप्ताहाचा समापन कार्यक्रम पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग येथे बुधवार, दिनांक २ ऑक्टोंबर २०२४ रोजी पार पडला. यावेळी डॉ. कोरेटी मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, सत्कारमूर्ती श्री गुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ प्रचारक आचार्य श्री हरिभाऊदादा वेरुळकर, महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय संबोधन करताना डॉ. कोरेटी यांनी महात्मा गांधी यांच्या श्रमप्रतिष्ठा, समानता, बंधुत्व या तत्त्वांचा अवलंब आपल्या जीवनात करण्याचे आवाहन केले. महात्मा गांधींच्या संदर्भातून समाज माध्यमांवर माहिती घेणाऱ्या नवीन पिढीने त्याबाबत एकांगी भूमिका न घेता त्यांचे साहित्य व ग्रंथांचा अभ्यास करावा. यातून त्यांना महात्मा गांधी यांचे समग्र व्यक्तिमत्व समजण्यास मदत होईल, असे डॉ. कोरेटी म्हणाले.

कार्यक्रमात ज्येष्ठ प्रचारक आचार्य श्री हरिभाऊदादा वेरुळकर यांचा त्यांच्या अविरत कार्यासाठी सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना श्री वेरूळकर यांनी महात्मा गांधी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार मी जगत आलो असून सत्कार हा माझ्या हाडामासांचा नसून पंचतत्वातील आचार-विचारांचा असल्याचे मत व्यक्त केले. आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी जगात सर्वात तरुण असलेल्या भारतातील लोकशाहीत नवीन पिढीला ग्रामोद्योगाच्या विकासासाठी तसेच रोजगार निर्मितीसाठी गांधी विचार व त्यांचे कार्य याचे समग्रतेने अध्ययन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. माजी विद्यार्थिनी डॉ. अंजुषा पांडवकर यांनी गायन केलेल्या 'वैष्णव जण तो' या भजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांनी प्रास्ताविकेतून २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर दरम्यान घेण्यात आलेल्या महात्मा गांधी जयंती सप्ताहातील विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी डॉ. अंजुषा पांडवकर यांनी 'दे दी हमे आजादी बिना खडक बिना ढाल' व मनोज चौबे यांनी 'पुरी हो कामना बापू की' ही भजने सादर केली. याप्रसंगी गांधी पुस्तक प्रदर्शनी तसेच गांधी टपाल तिकीट प्रदर्शनी प्रदर्शित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रबद्ध निवेदन पौर्णिमा वानखडे व श्रद्धा भारद्वाज यांनी केले.



## पुरस्कार व प्रमाणपत्र वितरण

महात्मा गांधी जयंती सप्ताह अंतर्गत आयोजित गांधी सामान्य ज्ञान स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, छात्र संवाद स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते पुरस्कार व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यक्रमाला विद्यापीठातील विविध प्राधिकरणातील सदस्य, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी महात्मा गांधी सप्ताह कार्यक्रमासाठी आर्थिक सहयोग करणारे लीलाबेन पटेल, नथुजी मेश्राम, निंबाजी ढोबाळे, डॉ. नृपेंद्रप्रसाद मोदी, डॉ. वंदना महात्मे, डॉ. अनुराधा श्रीखंडे, सौ श्रद्धा भारद्वाज, तृप्ती तिवारी, श्री चंद्रनाथ भागवतकर यांचा सत्कार करण्यात आला.




# विद्यार्थ्यांनी रेखाटले महात्मा गांधी यांचे रेखाचित्र पदव्युत्तर मानसशास्त्र विभागात चित्रकला स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मानसशास्त्र विभागात 'गांधी इन स्केचेस' या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांचे मुक्तहस्त रेखाचित्र रेखाटले. महात्मा गांधी यांचे जीवन आणि तत्त्वज्ञान याबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी हा या कार्यक्रमामधील उद्देश होता.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिना खान यांनी भूषविले. या कार्यक्रमाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता आणि कलात्मक अभिव्यक्ती निर्माण होण्यास वाव मिळाला. त्याचप्रमाणे अहिंसा, सत्य आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली. यावेळी मार्गदर्शन करताना विभाग प्रमुख डॉ. हिना खान यांनी महात्मा गांधी यांच्या तत्त्वज्ञानाची महत्त्वता कलात्मक अभिव्यक्तीच्या माध्यमातून अधोरेखित केली. आजच्या काळात महात्मा गांधी यांच्या शिकवणींच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना महात्मा गांधी यांच्या विचारांचा वारसा त्यांनी कलात्मक स्वरूपात रूपांतरित करण्यास प्रोत्साहित केले.

स्पर्धेतील प्रथम क्रमांक भौतिकशास्त्र विभागातील एमएससी प्रथम सेमिस्टरची विद्यार्थिनी मानसी चौरावार हिने पटकावला. द्वितीय क्रमांक मानसशास्त्र विभागातील तृतीय सेमिस्टरची विद्यार्थिनी कोमल नागूरकर हिने तर तृतीय क्रमांक मानसशास्त्र विभागातील प्रथम सेमिस्टरची विद्यार्थिनी अवंतिका चावडे हिने पटकावला. रेखाचित्र रेखाटन स्पर्धेत विविध पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण १६ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत नोंदणी करीत विविध कलात्मक शैली आणि तंत्रे दर्शवली. सहभागी विद्यार्थ्यांना चित्रकला सामग्री प्रदान करण्यात आली होती. कलाकृती पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना ३ तासांचा अवधी देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी मुक्तहस्त रेखाचित्रातून महात्मा गांधी यांच्या विविध भूमिका, शांतता प्रचारक आणि प्रतिकात्मक लढाईचे दर्शन घडविले. काहींनी महात्मा गांधी यांचा सूत कताई करीत असतानाचे चित्रण रेखाटले. तर काही विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांचा आधुनिक सामाजिक चळवळीवर असलेला प्रभाव चित्रणातून व्यक्त केला. प्रत्येक स्पर्धकाने त्याच्या कलात्मक शैलीतून महात्मा गांधी यांची एक वेगळे रेखाचित्र रेखाटले होते. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांच्या अद्वितीय विचार शक्तीतून महात्मा गांधी यांचे जीवनदर्शन घडले. रेखाचित्रांचे मूल्यांकन मानसशास्त्र विभागातील शिक्षकांनी केले. मूल्यांकन करताना सृजनशीलता, मौलिकता, कलात्मक तंत्र, विषयाशी संबंध त्याचप्रमाणे भावनिक प्रभाव ही बाब लक्षात घेण्यात आली. विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुबोध बन्सोड यांनी केले. प्रा. प्रजक्ता जोशी यांना कार्यक्रम समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली.



# नाविन्यपूर्ण

## विद्यापीठाला संशोधनासाठी डीएसटीचे ११.४२ कोटींचे अनुदान

### संशोधनातून नवीन स्टार्टअप करण्यास होईल मदत

भारत सरकारचे विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय नवी दिल्ली अंतर्गत विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या (DST) वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला संशोधनासाठी तब्बल ११.४२ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. विद्यापीठ संशोधन आणि उत्कृष्ट वैज्ञानिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत डीएसटीने हे अनुदान मंजूर केले आहे. यामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आधुनिक आणि उच्च प्रतीच्या उपकरणांद्वारे संशोधन तसेच नवीन स्टार्टअप करण्यास मदत मिळणार आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागा (DST) ने मार्च २०२४ मध्ये विविध विद्यापीठांमधून संशोधन प्रस्ताव आमंत्रित केले होते. या अंतर्गत विद्यापीठातून प्रस्ताव सादर करण्यासाठी तत्कालीन माननीय कुलगुरू आणि तत्कालीन आयआयएल संचालक डॉ. राजेश सिंह यांच्यासोबत एक प्रकल्प कार्यान्वयन समिती स्थापन केली होती. या समितीचे अध्यक्ष प्रा. सुभाष कोंडावार (भौतिकशास्त्र) होते, प्रमुख संशोधक प्रा. रविन जुगादे (रसायनशास्त्र), सहसंशोधक म्हणून प्रा. उमेश पलिकुंडवार (भौतिकशास्त्र), डॉ. राजेश उगले (औषधी निर्माणशास्त्र) तर सदस्यांमध्ये डॉ. विजय तांगडे (रसायनशास्त्र), डॉ. सत्येंद्र प्रसाद (औषधी निर्माणशास्त्र) आणि डॉ. दादासाहेब कोकरे (औषधी निर्माणशास्त्र) यांचा समावेश होता. योजने अंतर्गत प्रस्ताव डीएसटी (DST) कडे सादर करण्यात आला. या प्रकल्पाला तज्ज्ञ समितीतून प्रारंभिक मान्यता मिळाली आणि विद्यापीठाच्या समिती सदस्यांना २८ ऑगस्ट रोजी आयआयटी (IIT) नवी दिल्ली येथे प्रेझेंटेशनसाठी बोलविण्यात आले. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण समितीने १५ तज्ज्ञांचा समावेश असलेल्या डीएसटी प्रोग्राम मॅनेजमेंट बोर्डसमोर संशोधन प्रस्तावाचे सादरीकरण केले. समितीकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचे डीएसटीच्या सदस्यांनी कौतुक केले आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला २५ ऑक्टोबर २०२४ रोजी अनुदान मंजूर करण्यात आल्याचे पत्र पाठविले. मंजूर केलेल्या रकमे अंतर्गत ८.०० कोटी रुपयांचे वैज्ञानिक उपकरणे, ५ संशोधन विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प फेलोशिप आणि चार वर्षांच्या कालावधीत आवश्यक इतर उपसाधने आणि अनपेक्षित खर्चांचा यात समावेश आहे.

## पर्यावरण आणि स्टार्टअपला मदत

पर्यावरण आणि आरोग्य या दोन्ही मानकांशी तडजोड न करता स्वच्छ ऊर्जा उपकरणाच्या निर्मितीसाठी नवीन साहित्याचा विकास यावर संशोधन प्रस्ताव आधारित असल्याचे प्रमुख संशोधक प्रा. रविन जुगादे यांनी सांगितले. आत्मनिर्भर भारत मिशनसाठी आवश्यक स्वच्छ ऊर्जा उपकरणे, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पर्यावरण पुनरुज्जीवन आणि स्वस्थ भारत मिशन अंतर्गत आवश्यक आरोग्यसामग्री निर्मिती आदी प्रकल्पाच्या तीन महत्त्वपूर्ण बाबी आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात संशोधनाकरिता हा प्रकल्प अधिक गती देणारा ठरणारा आहे. सोबतच समाजाच्या गरजा लक्षात घेऊन त्या दृष्टीने संशोधन करीत साहित्य विकसित करण्यास मदत मिळणार आहे. विद्यापीठाने स्थापित केलेल्या इंक्यूबेशन सेंटर हे उद्योग आणि विद्यापीठ यांच्यामधील दुवा म्हणून कार्य करीत आहे. याच इनक्युबेशन केंद्राच्या माध्यमातून नवीन साहित्य, तंत्रज्ञान विकसित केले जाणार आहे. त्यामुळे नवीन स्टार्टअप सुरू होण्यास मदत मिळेल. या अनुदानातून उपलब्ध सर्व उपकरणांचा लाभ विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग तसेच संलग्नित महाविद्यालयातील सर्व संशोधकांना घेता येणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (NEP-2020) अभ्यासक्रमानुसार संशोधन प्रकल्पांमध्ये उपयुक्त ठरणार आहे. विद्यापीठाने मागील शैक्षणिक सत्रापासूनच एनईपीनुसार अभ्यासक्रम लागू केले आहे.

## नवोदित संशोधकांना प्रशिक्षण

मंजूर केलेल्या रकमेचा एक भाग वैज्ञानिक सामाजिक जबाबदारी (एसएसआर) अंतर्गत देखील ठेवण्यात आला आहे. अनुदानातून प्राप्त उपकरणांचा विदर्भातील नवोदित संशोधकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासाठी उपयोग होणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून आतापर्यंत मिळालेले हे सर्वात मोठे अनुदान आहे. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी संशोधन प्रस्ताव तयार करण्यासोबतच प्रेझेंटेशनदरम्यान प्रस्तावाचे प्रभावीपणे मांडणी केल्याने संपूर्ण समितीचे कौतुक केले आहे. कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी सर्व कार्यालयीन सहकारी तसेच समितीचे अभिनंदन केले आहे. सोबतच योजनेच्या तातडीने अंमलबजावणीसाठी प्रशासकीय मदत करणार असल्याचे सांगितले.



# जखमेवर लावा आता कृत्रिम त्वचा

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे संशोधन

### संशोधकांनी शोधली अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आण्विक जीवशास्त्र आणि अनुवंशिक अभियांत्रिकी (मॉलिक्युलर बायोलॉजी आणि जेनेटिक इंजीनियरिंग विभाग) विभागातील संशोधकांनी अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा शोधून काढली आहे. संशोधकांच्या संशोधनामुळे आता जखमेवर मलमपट्टी न करता कृत्रिम त्वचाच लावता येणार आहे. विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोलॉजी आणि जेनेटिक इंजीनियरिंग विभाग प्रमुख डॉ. दयानंद गोगले, लिटूच्या बायोटेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. आरती शनवारे यांनी प्रकल्प प्रमुख आणि वर्जीनिया युनायटेड स्टेट्स येथील वर्जिनिया पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट अँड स्टेट युनिव्हर्सिटी, दी नॅशनल सेंटर फॉर अर्थ अँड एन्व्हायरमेंटल नॅनो टेक्नॉलॉजी इत्रफास्ट्रक्चर (नॅनो अर्थ), नॅनो स्केल कॅरेक्टरलायझेशन अँड फॅब्रिकेशन लेबोरेटरी (एनसीएफएल) चे रिसर्च असोसिएट डॉ. बिपिन लाडे यांच्या मदतीने हे संशोधनकार्य पूर्ण केले आहे.

जखम झाली की मलम लावत पट्टी बांधायची अशी वर्षानुवर्षे पद्धत आहे. मात्र, या मलमपट्टी ऐवजी विद्यापीठाच्या संशोधकांनी निर्माण केलेली कृत्रिम त्वचा जखमेवर लावता येणार आहे. जखम झालेल्या जागेवर पट्टीच्या ऐवजी या कृत्रिम त्वचेचा तुकडा लावल्याने जखम सुकेल आणि बरी होईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या औषधीय घटकांचा वापर या कृत्रिम त्वचेत करण्यात आला आहे. या त्वचेमुळे जखम झाकली जाईल आणि बरीही होईल. जखम झालेल्या ठिकाणी कमी वेळात नैसर्गिक त्वचा येण्यासही या संशोधनामुळे शक्य होणार आहे. सोबतच ही त्वचा जैवविघटनशील असल्याने जखमेवर काढून टाकल्यानंतरही ती आपोआप विघटित होईल आणि त्यातून दीर्घकाळ टिकणाऱ्या कचऱ्याचा प्रश्नही निर्माण होणार नाही.

राजीव गांधी जैविक तंत्रज्ञान (आरजीबीसी) प्रकल्प अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर वनस्पती विभागाने संक्रमण रोखण्यासाठी आणि जखमांच्या बरे होण्यासाठी अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली नवीन कृत्रिम त्वचा विकसित करण्याबाबत २०१९-२०२० मध्ये संशोधनास सुरुवात केली. या नाविन्यपूर्ण संशोधनाकरिता आवश्यक सामग्रीत सोडियम अल्जिनेट, जिलेटिन, किटोसन आणि अँटीमायक्रोबियल एजंट यांचा समावेश आहे. ज्यामुळे उच्च दर्जाच्या जखमा लवकर बरी होण्याकरिता मदत मिळेल. बायोटेक्नोलॉजीचे विद्यार्थी आकाश कांबडी यांनी संशोधन कार्यात सहभाग घेतला.

## नाविन्यपूर्णता

जखमांवर मलमपट्टी करण्याची वर्षानुवर्षीची पद्धत अनेकदा संक्रमण रोखण्यात अपयशी ठरते. त्यामुळे या समस्यांवर उपाय म्हणून संशोधकांनी सोडियम अल्जिनेट, जिलेटिन आणि किटोसन यांचा वापर करून कृत्रिम त्वचा तयार केली. संशोधकांनी पर्यावरणास अनुकूल अशा घटकांचा वापर केला आहे. कृत्रिम त्वचा ही नैसर्गिक त्वचेसारखी दिसू शकते.

## मुख्य वैशिष्ट्ये

संशोधकांनी निर्माण केलेल्या कृत्रिम त्वचेमध्ये अँटीमायक्रोबियल गुणधर्म असून ज्यामध्ये गॅलिक ॲसिड आणि थायमॉल यांचा समावेश आहे. यातील नैसर्गिक गुणधर्म जंतूंना मारत संक्रमण रोखण्यास मदत करते.

## सुरक्षा

संशोधकांनी निर्माण केलेली कृत्रिम त्वचा ही नैसर्गिक त्वचे करिता हानिकारक नसल्याचे विविध चाचण्यांमधून दिसून आले.

## जखम बरे होणे

अँटीमायक्रोबियल गुणधर्म असल्याने जखम लवकर सुकत बरी होण्यास मदत मिळणार आहे. याकरिता कृत्रिम त्वचेमध्ये समाविष्ट असलेल्या विविध औषधी गुणधर्म जखम लवकर बरी करण्याची क्षमता आहे.

# पृथ्वीवरील घटकांच्या अभ्यासात ईबीएसडी तंत्रज्ञानाचे महत्त्वपूर्ण योगदान

## इंग्लंड येथील लिवरपूल विद्यापीठाच्या डॉ. एलीसाबेटा मारियानी यांचे प्रतिपादन

## विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागात प्रा. श्रीपादराव किलपडे व्याख्यानमाला




पृथ्वीवरील खनिज तसेच रचना आदी विविध घटकांच्या अभ्यासात ईबीएसडी तंत्रज्ञानाचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे प्रतिपादन इंग्लंड येथील लिवरपूल विद्यापीठाच्या पृथ्वी, समुद्र आणि पर्यावरणीय विज्ञान विभागातील शिक्षक तथा एसईएम एसआरएफ संचालक डॉ. एलिसाबेटा मारियानी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभागात माजी विभाग प्रमुख प्रा. श्रीपादराव किलपडे व्याख्यानमाला बुधवार, दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडली. या व्याख्यानमालेत प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मारियानी मार्गदर्शन करीत होत्या.

व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे होते तर प्रमुख अतिथी म्हणून इंग्लंड येथील लिवरपूल विद्यापीठाच्या पृथ्वी, समुद्र आणि पर्यावरणीय विज्ञान विभागातील शिक्षक तथा एसईएम एसआरएफ संचालक डॉ. एलिसाबेटा मारियानी, साम ग्रेगर, भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, डॉ. एस. के. हुमने यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे मार्गदर्शन करताना डॉ. एलिसाबेटा मारियानी यांनी 'पृथ्वी विज्ञानात EBSD तंत्रज्ञानाचा उपयोग' या विषयावर बोलताना पृथ्वीवरील घटक असलेले खनिज तसेच त्यांची रचना याचे सूक्ष्म अध्ययन कशाप्रकारे करावे याची माहिती दिली. इलेक्ट्रॉन बॅक स्कॅटर्ड डिफ्रॅक्शन ईमेजींग (EBSD) हे तंत्रज्ञान पृथ्वीवरील घटकांच्या अभ्यासामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. विविध घटकांचा अभ्यास करताना नमुना कशा प्रकारे घ्यावा, नमुना घेत असताना त्यावरील अत्यंत सूक्ष्म घटकांमध्ये वातावरणामुळे बदल होऊ नये यासाठी कोणती दक्षता घ्यावी याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती त्यांच्या व्याख्यानात दिली. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भूकंपांची भूगर्भीय नोंद देखील आपण कशाप्रकारे घेऊ शकतो याचे त्यांनी सविस्तर वर्णन केले. पृथ्वीची सद्यस्थिती कशी आहे? याचा शोध या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घेता येत असल्याचे त्यांनी विविध उदाहरणांद्वारे सांगितले. यावेळी साम ग्रेगर यांनी "ग्रॅनाइटमधील लिथियमच्या प्रमाणाची ओळख" या विषयावर त्यांच्या व्याख्यानात माहिती दिली.

अध्यक्षीय भाषण करताना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी या विद्यापीठाने शंभर वर्ष पूर्ण केले असून त्याचप्रमाणे प्रतिष्ठित विभाग तसेच शिक्षक असल्याचे सांगितले. प्रतिष्ठित विभाग तसेच शिक्षक विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. पूर्वी आणि आताचा काळ फार बदलला असून पूर्वी पदवी प्राप्त केल्यानंतर नोकरीसाठी प्रयत्न करावे लागत नव्हते. तेव्हा आमची संपूर्ण बॅच नोकरीत रुजू झाली. आता सरकारी नोकरीसाठी स्पर्धात्मक स्थिती निर्माण झाली आहे. सरकारी क्षेत्रात नोकरीच्या संधी कमी असल्या तरी खाजगी क्षेत्रात मात्र मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहेत. गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येत असलेल्या परिसरात विपुल प्रमाणात खनिज संपदा असून तेथे मोठी संधी असल्याचे डॉ. बोकारे यांनी सांगितले. बदलत्या काळात विभागाने देखील सज्ज रहावे असे सांगत समाजातील समस्यांची सोडवणूक करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे यांनी भूगर्भशास्त्र विभागाला लाभलेल्या ऐतिहासिक वारशाबाबत माहिती दिली. प्रथम विभाग प्रमुख प्रा. श्रीपादराव किलपडे यांच्या स्मृतीनिमित्त या व्याख्यानमालेचे आयोजन होत असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच विभागात शिकविल्या जात असलेल्या विविध अभ्यासक्रमांची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विभागातील शिक्षकवृंद, संशोधक तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.





## संग्रहालय आणि नवीन सभागृहाचे उद्घाटन

पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभागात नव्याने तयार करण्यात आलेले संग्रहालय तसेच नूतनीकरण करण्यात आलेल्या प्रा. श्रीपादराव किलपडे स्मृती सभागृहाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या शुभहस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. कु. कृतिका जांगडे हिने संग्रहालयासाठी परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रतीक गोडबोले यांनी केले तर आभार कु. अपेक्षा तलान हिने मानले.

पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागातील उपक्रम

## अन्न ग्रहण नियमनात मेंदूची भूमिका महत्त्वपूर्ण
## कॅनडा येथील मॅकइवन विद्यापीठातील डॉ. राज नारनवरे यांचे प्रतिपादन
### पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात व्याख्यान





अन्नग्रहण नियमनात मेंदूची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे प्रतिपादन कॅनडा येथील मॅकइवन विद्यापीठाच्या नर्सिंग फाउंडेशन अँड सायन्स विभागातील असोसिएट प्रोफेसर डॉ. राज नारनवरे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युतर प्राणीशास्त्र विभागात गुरुवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित अतिथी व्याख्यान कार्यक्रमात डॉ. नारनवरे मार्गदर्शन करीत होते. यावेळी प्राणीशास्त्र सोसायटीची घोषणा करण्यात आली.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. व्ही. टी. धुर्वे यांनी भूषविले. यावेळी प्राणीशास्त्र सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ. सुरेश मसराम यांची उपस्थिती होती. 'अन्न ग्रहणाचे मस्तिष्क नियमन : जीवन विज्ञानातील संशोधन आणि त्याची भविष्यातील संभाव्यता' या विषयावर पुढे बोलताना डॉ. नारनवरे यांनी अन्न ग्रहणाचा मेंदू आणि रोगप्रतिकारक प्रणालीशी कशाप्रकारे परस्पर संबंध आहे, याची विस्तृत माहिती पावर पॉइंट प्रेझेंटेशन (पीपीटी) द्वारे दिली. अन्न ग्रहण नियमनात मस्तिष्कातील न्यूरोन्सची प्रक्रिया तसेच हार्मोन्सचे परिणाम शोधण्यासाठी शरीर विज्ञानाची परिपूर्ण माहिती आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. वैद्यकीय तसेच नर्सिंगचे शिक्षण घेत असताना अभ्यासक्रमात शरीर शास्त्रासोबत शरीर विज्ञान संबंधी माहिती असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ वर्षात अभ्यासक्रमात कशाप्रकारे कोणता भाग असावा याबाबत त्यांनी पीपीटीद्वारे माहिती दिली. या विषयासंबंधी संशोधन करताना त्यांनी गोल्ड फिशवर केलेल्या प्रयोगाचे देखील वर्णन केले. शरीर विज्ञान संबंधी माहिती असल्यास रुग्णालयात आलेल्या रुग्णांवर उपचार करताना त्याचा उपयोग वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांना होतो, असे ते म्हणाले. तत्पूर्वी डॉ. नारनवरे यांनी प्राणीशास्त्र सोसायटीचे उद्घाटन झाल्याचे घोषित केले.

अध्यक्षीय भाषण करताना विभाग प्रमुख डॉ. व्ही. टी. धुर्वे यांनी अतिथींचा परिचय करीत कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका सांगितली. यावेळी त्यांनी प्राणीशास्त्र सोसायटीचे गठन मागील महिन्यात करण्यात आल्याचे सांगितले. प्राणीशास्त्र सोसायटीचे सचिव आदित्य कडबे यांनी संपूर्ण वर्षभराचा विभागाचा शैक्षणिक अहवाल सादर केला. कार्यक्रमाचे संचलन डॉ. सुरेश मसराम यांनी केले तर आभार प्राची राठोड यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. दीपक बारसागडे, डॉ. विद्या बेले, डॉ. अरुण खुरड, डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राणीशास्त्र सोसायटीचे पदाधिकारी, संशोधक तसेच विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.



## पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात शिक्षक दिन उत्साहात

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात शिक्षक दिन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विभागातील शिक्षकांचा त्यांच्या कार्याप्रती सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या मनमोहक संदेशांनी कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाची सुरुवात सबरीन मन्सुरी व आदित्य कडबे या विद्यार्थ्यांनी केलेल्या स्वागतपर भाषणांनी झाली. त्यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवासात शिक्षकांचा अनुग्रह आणि मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले. प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. (श्रीमती) वि. टी. धुर्वे आणि डॉ. एस. सी. मसराम यांनी प्रेरणादायी भाषणे दिली. त्यांनी विद्यार्थ्यांचे भविष्य साकारण्यात शिक्षकांचे महत्वपूर्ण भूमिका असल्याचे सांगितले. शिक्षण आणि संशोधन उत्कृष्टतेसाठी शिक्षकांच्या प्रयत्नांचे कौतूक केले. विभागातील शिक्षकांचे त्यांच्या असामान्य योगदानाचा गौरव करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ व हस्तलिखित संदेश देत त्यांचे स्वागत केले.





## पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात 'परीचय' कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी परिचय कार्यक्रम नुकताच पार पडला. सेमिस्टर ३ च्या विद्यार्थ्यांकडून सेमिस्टर १ च्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. (श्रीमती) व्ही. टी. धुर्वे आणि डॉ. एस. सी. मसराम यांनी आपल्या भाषणात शैक्षणिक वर्षात यशस्वी होण्याची आशा व्यक्त केली. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांनी या विविध उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. यावेळी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांनी स्वतःची ओळख करून दिली सोबतच विविध कार्यक्रमांचे आयोजन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात छाया राऊत हिला मिसेस फ्रेशर आणि रक्षित रामटेके याला मिस्टर फ्रेशर हा पुरस्कार देण्यात आला.




## पर्यावरण संतुलनात वन्यजीवांची महत्त्वपूर्ण भूमिका

### मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर यांचे प्रतिपादन

#### वन्यजीव सप्ताहनिमित्त प्राणीशास्त्र विभागात व्याख्यान

पर्यावरणाचे संतुलन राखण्यात वन्यजीवांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे प्रतिपादन मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर (आयएफएस) यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात वन्यजीव सप्ताह निमित्त शुक्रवार, दिनांक ४ ऑक्टोंबर २०२४ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी डॉ. मानकर मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. टी. धुर्वे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर (आयएफएस), राज्य रेशीम संचालनालयातील उपसंचालक श्री. महेंद्र ढवळे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. मानकर यांनी संघराज्य लोकसेवा आयोग परीक्षा (यूपीएससी) आणि विशेषत: भारतीय वन सेवा (आयएफएस) परीक्षेबाबत माहिती दिली. त्यांनी त्यांच्या भाषणातून वन्यजीवांचे संरक्षण तसेच संवर्धन करण्याबाबत माहिती दिली. डॉ. मानकर यांनी वन्यजीवांचे जैवविविधतेतील योगदान आणि शेतीवर त्यांच्या प्रभावाबद्दल पुढे बोलताना चर्चा केली.

रेशीम संचालनालयाचे उपसंचालक श्री. महेंद्र ढवळे यांनी रेशीम शेतीबाबत संपूर्ण माहिती दिली. रेशीम किड्याच्या जीवनचक्राचा उल्लेख विशेषतः केला. त्यांनी मलबरी झाडांच्या लागवडीपासून कच्च्या रेशमाच्या तंतुंच्या काढणीपर्यंतची प्रक्रिया स्पष्ट केली. रेशीम शेतीला शाश्वत उत्पन्न स्रोत म्हणून कृषकांच्या विविध केस स्टडीजची उदाहरणे दिली. त्यांनी रेशीम उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठीच्या संधीचा उल्लेख केला. डॉ. आशिककुमार नागवंशी यांनी अतिथींना परिचय करून दिला. तर विभाग प्रमुख डॉ. व्हि. टी. धुर्वे यांनी अतिथींना सन्मानित केले. या वेळी प्रा. डॉ. एस. सी. मसराम उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप पवन चंकापुरे यांनी आभार मानून केला.



# पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात पालक शिक्षक सभा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात पालक-शिक्षक सभा शनिवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२४ रोजी विभागातील सेमिनार हॉलमध्ये पार पडली. एमएससी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांशी संवाद वाढविणे आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सहकार्याची भावना निर्माण करणे या उद्देशाने सभेचे आयोजन करण्यात आले. सभेची सुरुवात विभाग प्रमुख डॉ. (श्रीमती) वर्षा धुर्वे यांनी सर्वांचे औपचारिक स्वागत करून केली. डॉ. (श्रीमती) धुर्वे यांनी बैठकीच्या आयोजनाबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व वैयक्तिक विकास होण्यामध्ये पालकांच्या सहभागाचे महत्त्व सांगितले. डॉ. धुर्वे यांनी विद्यार्थ्यांच्या यशस्वितेसाठी आणि कल्याणासाठी पालकां सोबत सहकार्याने कार्य करण्याची खात्री दिली. बैठकीमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक यशस्विता, उपस्थिती आणि सुधारणा आवश्यक असलेल्या बाबींवर चर्चा झाली. या सभेमध्ये एक संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रामध्ये पालकांना प्रश्न विचारत चिंता व्यक्त करीत आणि स्पष्टीकरणे मिळवण्याची संधी मिळाली. शैक्षणिक अपेक्षा, विद्यार्थ्यांचे वर्तन आणि विद्यार्थ्यांना घरी समर्थन देण्याच्या पद्धती यासारख्या मुख्य विषयांवर चर्चा झाली. बैठकीचा समारोप डॉ. सुरेश मसराम यांच्या समारोपात्मक भाषणाने झाला. त्यांनी पालक आणि इतर शिक्षकांचे सहभागाबद्दल आभार मानले आणि त्यांच्या समर्थन व सहकार्याबद्दल प्रशंसा केली.







# वन्यजीव संवर्धनावर आधारित पोस्टर व छायाचित्र स्पर्धा

## पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात वन्यजीव सप्ताह

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात ३ ते ७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. "लोक आणि पृथ्वी यांना जोडणे: वन्यजीव संवर्धनात डिजिटल नवोन्मेषाचा अभ्यास" या थीमधर वन्यजीव सप्ताहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने वन्यजीव संवर्धनावर आधारित पोस्टर व छायाचित्र स्पर्धा घेण्यात आली.

वन्यजीव संवर्धन करण्यास प्रोत्साहन देणे. त्याचप्रमाणे विविध विविध प्रजातींना समोर येणारी आव्हाने याची माहिती देणे आणि संवर्धन कार्यात समाजाची सहभागीता वाढविणे हा या कार्यक्रमामागील उद्देश होता. कार्यक्रमाचे आयोजन संयोजक प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. (श्रीमती) व्ही. टी. धुर्वे आणि संघटन सचिव डॉ. एस. सी. मसराम यांच्या नेतृत्वात करण्यात आले. कार्यक्रमास श्री. पवन चंकापूरे, डॉ. आशिक नगवांशी व अंकिता शर्मा यांनी मदत केली. गुरुवार, दिनांक ३ ऑक्टोबर रोजी डॉ. (श्रीमती) व्ही. टी. धुर्वे आणि डॉ. एस. सी. मसराम यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले आणि वन्यजीव संवर्धनाबद्दल महत्त्वपूर्ण भाषण दिले.

डॉ. आशिककुमार नागवंशी यांनी वन्यजीव संवर्धनावर चर्चा केली. या कार्यक्रमानंतर, एम. एस्सी. विद्यार्थ्यांसाठी वन्यजीव संवर्धनावर आधारित पोस्टर व छायाचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आकर्षक दृश्यात्मक सादरीकरणांद्वारे आपली सर्जनशीलता प्रदर्शित केली. पोस्टर स्पर्धेत प्राची लेंडे, प्रेरणा लंजेवार आणि अमर खुरपडे यांना प्रथम पारितोषिक मिळाले, तर छायाचित्र स्पर्धेत प्रेरणा लांजेवार आणि जितेंद्र राठोड यांनी दुसरे स्थान प्राप्त केले. शुक्रवार दिनांक ४ ऑक्टोबर २०२४ रोजी, प्रसिद्ध व्यक्तींकडून दोन अतिथी व्याख्याने आयोजित करण्यात आली. मुख्य वनसंरक्षक डॉ. के. एस. मानकर (IFS) यांनी वन्यजीव संवर्धनातील आव्हानांचे आणि धोरणांचे महत्व स्पष्ट केले. महाराष्ट्र राज्य रेशीम संचालनालयाचे उपनिदेशक श्री. एम. बी. धवळे यांनी रेशीम कलेच्या महत्वाबद्दल चर्चा केली. शनिवार दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ रोजी, एम.एस्सी. विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण सत्र आयोजित करण्यात आले.

ज्यामध्ये नागपूर वन विभाग, श्रीष्टी पर्यावरण मंडळ आणि हेरिटेज कन्झर्वेशन सोसायटीचा सहभाग होता. यानंतर, नागपूर वन विभागाच्या ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटरला (TTC) अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला.

सोमवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी, "बदलत्या जगात वन्यजीव: संवर्धनासाठी डिजिटल साधने" या विषयावर वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली. अमर खुरपडे, वैभवी खोंड आणि निकिता छोटोराय यांना प्रथम पारितोषिक मिळाले, सृष्टी बोरकर यांनी प्रोत्साहन पर पुरस्कार जिंकला. यानंतर वन्यजीव संरक्षण विषयावर एक बहुपर्यायी प्रश्नोत्तरी स्पर्धा झाली. यात विद्यार्थ्यांना त्यांचे ज्ञान तपासण्याची आणि संवादात्मक पद्धतीने शिकण्याची संधी मिळाली. या प्रश्नोत्तरी स्पर्धेत श्रेतांश शहारे, शाजिना खान आणि साक्षी बाजैत विजेते ठरले. अमर खुरपडे यांनी प्रोत्साहन पर पुरस्कार प्राप्त केला.

समारोप कार्यक्रमाचे संचालन अंकिता शर्मा यांनी केले. पुरस्कार वितरण समारंभासह वन्यजीव सप्ताह कार्यक्रमाचे समापन झाले. पवन चंकापूरे यांनी वन्यजीव सप्ताह कार्यक्रमाचा संपूर्ण अहवाल वाचला. डॉ. व्ही.टी. धुर्वे आणि डॉ. एस. सी. मसराम यांनी विजेत्यांना प्रमाणपत्रे देऊन सन्मानित केले. डॉ. आशिकुमार नागवंशी यांनी आभार मानले.

## १४ दिवसात १४ परीक्षांचे निकाल
## हिवाळी २०२४ परीक्षांच्या निकालास सुरुवात

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या हिवाळी २०२४ परीक्षांचे १४ दिवसात १४ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहे. १५ ऑक्टोबर २०२४ पासून सुरुवात झालेल्या पहिल्या टप्प्यातील परीक्षांचे निकाल घोषित करण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. संजय कवीश्वर यांनी दिली. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी हिवाळी २०२४ परीक्षांचे सूक्ष्म नियोजन करण्याबाबत परीक्षा विभागाला सूचना दिल्या आहेत. सोबतच परीक्षा विषयी संबंधित कामकाज तसेच निकालाबाबत माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. बोकारे यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा होत आहे. विद्यापीठ परिक्षेत्रातील एकूण १३६ परीक्षा केंद्रांवर सत्र २, ४, ६ आणि ८ मधील माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षांना मंगळवार, दि. १५ ऑक्टोंबर पासून सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यातील या परीक्षांचे निकाल घोषित होण्यास सुरुवात झाली आहे. हिवाळी परीक्षेबाबत प्राचार्य व केंद्राधिकारी यांची पूर्व तयारी बैठक परीक्षा भवन येथे आयोजित करीत सर्व प्रकारची दक्षता घेण्याचे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. संजय कवीश्वर यांनी केले होते. बुधवार दिनांक ३० ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित करण्यात आलेल्या १४ परीक्षांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन तसेच मानव विज्ञान शाखांच्या विविध अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

## स्वातंत्र्याने मिळाला न्याय, समता, बंधुत्वाचा अधिकार
## स्वातंत्र्य सेनानी लीलाताई चितळे यांचे प्रतिपादन
### पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात व्याख्यान



स्वातंत्र्याने न्याय, समता, बंधुत्व आणि स्वातंत्र्याचा अधिकार दिला असल्याचे प्रतिपादन स्वातंत्र्य संग्राम सेनानी लीलाताई चितळे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात शनिवार, दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ रोजी "गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमाची प्रासंगिकता" या विषयावर व्याख्यान देताना त्या बोलत होत्या. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून स्वातंत्र्य संग्राम सेनानी लीलाताई चितळे, सर्वोदय आश्रमाचे सचिव रविभाऊ गुळदे उपस्थित होते. लीलाताई चितळे यांनी आपल्या संवादाची सुरुवात "बाबा-बापू अमर रहे " हा नारा देऊन केला. संवाद साधताना लीलाताईनी अस्वस्थ आणि आशावादी म्हणून स्वतःला संबोधित केले. आजची राजकीय आणि आर्थिक परिस्थितीमुळे मी अस्वस्थ आहे आणि तुमच्या सारख्या युवकामुळे याच परिस्थितीवर मात करून बदल घडवून आणण्याचा आशावाद बाळगत असल्याचे त्या म्हणाल्या. ९५ वर्षांच्या लीलाताई चितळे यांनी न्याय, समता, बंधुत्व व स्वातंत्र्य हे चार अंगवस्त्र देशाने दिलेले असून यांचे ज्ञान असू द्या, असे विद्यार्थ्यांना पटवून दिले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी रविभाऊ गुळदे यांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र, समता, न्याय सोबतच बंधुता सर्वात महत्त्वपूर्ण घटक असल्याचे प्रतिपादन केले. महात्मा गांधीजींच्या जीवनावर आधारित गीते प्रस्तुत केली. विभाग विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण अखेरच्या व्यक्ती पर्यंत पोहोचविणे म्हणजेच अहिंसा प्रस्थापित करणारी यंत्रणा राबविणे होय, असे सांगितले. जोपर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण होत नाही, तो पर्यंत लोकशाही मूल्य प्रस्थापित होऊ शकत नाही असे त्यांनी अध्यक्षीय भाषणातून सांगितले. कार्यक्रमाचे संचालन अंजली खडाटे हीने केले तर आभार प्रा. किशोर नैताम यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इशिका पिंपळकर, पंकज सोमकुवार आणि विभागातील सर्व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.



# स्व-संरक्षण शिबिरात आत्मरक्षणाचे धडे

## पदव्युत्तर शारीरिक शिक्षण व विज्ञान संस्थेचे आयोजन

विद्यार्थिनींकरिता स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर शनिवार, दिनांक ५ ऑक्टोंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग, शासकीय विज्ञान संस्था आणि महिला विकास सेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात विद्यार्थिनींना आत्मरक्षणाचे धडे देण्यात आले.

शासकीय विज्ञान संस्थेमध्ये आयोजित स्वसंरक्षण शिबिरात ब्लॅक बेल्ट टेन ४ कराटे असोसिएशनचे अध्यक्ष श्री विजय गिजरे व त्यांच्या चमूने विद्यार्थिनींना आत्म संरक्षणाबाबत माहिती दिली. प्रात्यक्षिकांद्वारे विविध उदाहरणांद्वारे आत्मसंरक्षणाचे कौशल्य शिकविले. यावेळेस शासकीय विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे, विद्यापीठाच्या पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर, डॉ. नक्की सिद्धीकी, डॉ. सीमा कुरळकर, डॉ. अरुणा कावडकर, डॉ. सुनील कापगते, वृषाली देशमुख, रोशनी खोब्रागडे, निकिता वैष्णव, शुभम सैनिक, जस्सी सिंग यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले.

# पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील उपक्रम

## रसायनशास्त्र विभागात 'केमिस्ट्री सोसायटी' उद्‌घाटित





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता 'केमिस्ट्री सोसायटी'चे गठन करण्यात आले. विभागातील सभागृहात हा कार्यक्रम मंगळवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडला. शिक्षक व विद्यार्थ्यांचा या सोसायटीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ. एन. एन. करडे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सीएसआयआर निरी येथील सॉलिड अँड हॅजर्डस वेस्ट डिव्हिजनचे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. रमेश कुमार, विशेष अतिथी म्हणून प्रा. डब्ल्यू. बी. गुरूनुले यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. गुरूनुले यांनी विद्यार्थ्यांना निश्चित ध्येयाचा पाठलाग करण्यासाठी परिश्रम करण्याचे आवाहन केले. वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रमेश कुमार यांनी केमिस्ट्री सोसायटीचे जागतिक आणि राष्ट्रीय पातळी वरील महत्त्व समजावून सांगितले. सोबतच याविषयी महत्त्वपूर्ण सादरीकरण केले. दुसऱ्या वर्षातील विद्यार्थिनी युक्ती पटेल हिने विभागातील तिला आलेले अनुभव वर्णन केले. यामध्ये पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग कडून विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या उत्कृष्ट सुविधा, पायाभूत सुविधा आणि विभागातील उत्कृष्ट शैक्षणिक वातावरणाबाबत तिने माहिती दिली. डॉ. विजय तांगडे यांनी २०२४-२५ शैक्षणिक सत्रासाठी केमिस्ट्री सोसायटीचे गठन तसेच मागील सत्रात सोसायटीकडून आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

प्रमुख अतिथी डॉ. रमेश कुमार यांना २०२२-२३ या शैक्षणिक क्षेत्रात सीएसआयआर-एनईईआरआयमध्ये सर्वोत्कृष्ट शास्त्रज्ञ मान मिळाल्याने त्यांचा विभाग प्रमुख डॉ. करडे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. डब्ल्यू. बी. गुरूनुले यांचा देखील सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी केमिस्ट्री सोसायटीचे उद्‌घाटन डॉ. रमेश कुमार यांनी बोर्डवर सोडियम हायड्रॉक्साइड फवारत केले. बोर्डवर सोडियम हायड्रॉक्साइड फवारल्याने फिनोलफ्थेलिनसोबत ॲसिड-बेस प्रतिक्रिया घडली आणि सोसायटीचे नाव प्रकट झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार मिळाल्याने विभाग प्रमुख डॉ. एन. एन. करडे यांना डॉ. रमेश कुमार यांच्या शुभहस्ते शॉल आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचा समारोप उपाध्यक्ष ज्योती पिल्लाई यांनी आभार मानून केले, तर अमृता रुपचंदानी आणि मनीषा ठाकूर यांनी सुरेखपणे संचालन केले. रसायनशास्त्र विभागातील विविध शाखांचे सुंदर चित्रण करणाऱ्या रांगोळ्या विद्यार्थ्यांनी साकारल्या होत्या त्यामुळे एक वेगळ्याच उत्सवाची छटा या कार्यक्रमाला आली होती. या कार्यक्रमामुळे विभागातील विद्यार्थ्यांमध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## केमिस्ट्री सोसायटीचे गठन

केमिस्ट्री सोसायटीचे प्रभारी शिक्षक म्हणून डॉ. विजय तांगडे, अध्यक्ष म्हणून युक्ती पटेल, उपाध्यक्ष म्हणून ज्योती पिल्लाई, सचिव म्हणून अमृता रुपचंदानी, सहसचिव म्हणून आकाश कुमार भारती, कोषाध्यक्ष म्हणून श्रुती पवार, सह-कोषाध्यक्ष म्हणून अंचल चौधरी, सदस्य म्हणून पृथा देवईकर, प्रतीक भगत, विभा ताटेड, अर्पिता गडधने, नेहा सिंग यांचा समावेश आहे.

## विभागातील नेट-सेट उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

रसायनशास्त्र विभागातील नेट, सेट आणि गेट परीक्षा उत्तीर्ण केलेल्या उत्कृष्ट विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रज्वल उडान, निकिता पटले, अपूर्वा बंबल, जानवी धोते, स्नेहा बँकर, वैभव जयस्वाल यांचा समावेश आहे.







## पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागात एनपीटीईएल लोकल चाप्टर कार्यान्वित २ सुवर्ण, १४ रौप्यपदक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी २ सुवर्ण व १४ रौप्यपदके एनपीटीईएल प्लॅटफॉर्मवरून प्राप्त केली. त्यामुळे रसायनशास्त्र विभागाला जानेवारी-एप्रिल २०२४ सत्रासाठी पुन्हा एकदा एनपीटीईएलचा 'सक्रिय लोकल चाप्टर' म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. सलग दुसऱ्यांदा विभागाला हा बहुमान प्राप्त झालेला आहे. हा बहुमान म्हणजे एनपीटीईएलच्या उपक्रमांना मुख्य शिक्षणात समाविष्ट केल्याचे द्योतक आहे.

एनपीटीईएल लोकल चाप्टर स्वंयम प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांनी उपलब्ध अभ्यासक्रमासाठी नोंदणी करावी म्हणून प्रोत्साहित करीत असतो. या प्लॅटफॉर्मवरील ऑनलाईन अभ्यासक्रम आयआयटी (IITs) आणि आयआयएससी (IISc) या राष्ट्रीय शिक्षण संस्थांमधील मधील तज्ञ शिक्षकांच्या नेतृत्वात तयार करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विषयांची मौल्यवान माहिती सहज उपलब्ध होते. या सत्रात पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील ३४ विद्यार्थ्यांनी रसायनशास्त्राशी संबंधित विविध अभ्यासक्रमांचे एनपीटीईएल ऑनलाईन प्रमाणपत्र यशस्वीरित्या पूर्ण केले. विशेषत: २०२३-२४ सत्र ४ मध्ये लक्ष्मी रविदास आणि चैतन्य गाडेकर यांनी गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त करीत अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्यपदक मिळविले. याशिवाय, आदित्य नारनवरे, करुणा शाहाणी, अपूर्वा बांबल, प्राची खोब्रागडे आणि शैलेश डोंगरे या पाच विद्यार्थ्यांना त्याच सत्रात किमान ४ परीक्षा पूर्ण केल्याबद्दल 'NPTEL Believer' म्हणून मान्यता मिळाली. एकूण १४ विद्यार्थ्यांना १०० पैकी ७५-८९ गुण मिळाल्याबद्दल रौप्यपदक मिळाले. रौप्य पदक प्राप्त करणाऱ्यात वैष्णवी गोमासे, चैतन्य गाडेकर, स्नेहा बनकर, सौम्या पांडे, कोमल पटेल, फाल्गुनी सदावर्ते, सृष्टी वाघमारे, खुशबू कोल्हे, लक्ष्मी रविदास, ऋतु भायानी आणि मयुरी जैन यांचा समावेश आहे. चैतन्य गाडेकर याला हा पुरस्कार दोनदा मिळवला, एनपीटीईएल या प्लॅटफॉर्मवरील ऑनलाइन अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थी सहभागी व्हावेत म्हणून विभागाच्या वतीने प्रत्येक सत्रापूर्वी याबाबत जागरूकता कार्यशाळा आयोजित केली जाते. विभाग प्रमुख डॉ. एन. एन. करडे विद्यार्थ्यांना एनपीटीईएलच्या परिक्षांसाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून स्वतः त्या परीक्षेसाठी नोंदणी करून विद्यार्थ्यांसोबत त्या परीक्षांची तयारी करतात . प्रा. करडे यांनी १० एनपीटीईएल ऑनलाइन प्रमाणपत्र प्राप्त केले असून, चार सुवर्ण आणि पाच रौप्य पदके मिळवली आहेत. तसेच सात परीक्षांमध्ये देशभरातून ते सर्वप्रथम आहेत.

डॉ. नंदकिशोर करडे लोकल चाप्टर साठी 'एक संपर्क बिंदू (SPOC)' म्हणून कार्य करीत आहेत. आगामी सत्रांमध्ये विद्यार्थ्यांचा अधिकाधिक सहभाग आणि यश मिळवण्याचे रसायनशास्त्र विभागाचे लक्ष्य असून त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी रसायनशास्त्र विभाग कटिबद्ध आहे.

## एनपीटीईएल सत्र जानेवारी-एप्रिल २०२४ मधील प्रमुख उपलब्धी

- २ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक
- ३ विद्यार्थी टॉपर
- १४ विद्यार्थ्यांना रौप्य पदक
- ३४ विद्यार्थी एनपीटीईएल ऑनलाइन प्रमाणपत्र यशस्वीरित्या पूर्ण.
- प्रा. एन. एन. करडे यांना ४ सुवर्ण पदके, ५ रौप्य पदके आणि ७ परीक्षांत टॉपर यासह एकूण १० प्रमाणपत्रे प्राप्त




## गांधींपासून पत्रकारांनी प्रामाणिकपणा आत्मसात करावा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांचे प्रतिपादन

### जनसंवाद विभागात "गांधी ॲज अ कम्युनिकेटर" विषयावर परिसंवाद

पत्रकारांनी महात्मा गांधींच्या जीवनातील सत्य, तळमळ, प्रामाणिकपणा आणि समाजसेवा ही मूलभूत मूल्ये आत्मसात केली पाहिजेत, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी केले. महात्मा गांधी जयंतीनिमित्त विद्यापीठ पदव्युत्तर जनसंवाद विभागात आयोजित परिसंवादात ते बोलत होते. विभाग प्रमुख डॉ. मोईज मन्नान हक यांनी प्रास्ताविक केले.

महात्मा गांधी यांनी लंडन-आधारित 'द व्हेजिटेरियन'साठी लेख लिहिले आणि नंतर १९०३ पासून त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील "इंडियन ओपिनियन" मध्ये योगदान दिले, असे अधिष्ठाता डॉ. कडू यांनी १८८८ पासून गांधींच्या पत्रकारितेच्या कार्याचा शोध घेतला नंतर पुढे बोलताना सांगितले. महात्मा गांधीजींची वैयक्तिक मूल्ये आणि तत्त्वे आणि त्यावेळचे त्यांचे ध्येय या लिखाणातून कसे प्रतिबिंबित होते यावर त्यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन केले. भारतात परतल्यावर ते "यंग इंडिया" आणि "नवजीवन" चे संपादक झाले. त्यांनी राजकारण आणि सामाजिक परिवर्तनावर लक्ष केंद्रित केले. डॉ. कडू यांनी आठवण करून दिली की १९३३ मध्ये त्यांनी "हरिजन" हे वृत्तपत्र सुरू केले. ज्यामध्ये त्यांनी अस्पृश्यता आणि ग्रामीण विकास यासारखे मुद्दे मांडले. सेमिनारला विभागातील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.



## अभिजात दर्जासोबतच मराठी संवर्धनाची जबाबदारीही वाढली

### मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आवलगावकर यांची अपेक्षा

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा मोठा आनंद आहे. या दर्जासोबतच मराठीजण म्हणून आपणा सर्वांचीच या भाषेच्या संवर्धनाप्रतीची जबाबदारी वाढली आहे, अशी अपेक्षा अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे होत असलेल्या मराठी भाषा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक डॉ. अविनाश आवलगावकर यांनी शनिवार, दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ रोजी व्यक्त केल्या. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाला भेट दिली असता त्यांनी या भावना व्यक्त केल्या. डॉ. आवलगावकर यांनी पुढे बोलताना मराठी भाषेची प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारीही आपणा सर्वांना पेलवावी लागेल, असे आवाहन केले. अभिजात मराठी भाषेच्या सन्मानाला साजेशी अभिजात साहित्य निर्मितीवर आपल्याला भर द्यावा लागेल असे ही ते म्हणाले. यावेळी पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांच्या हस्ते शाल, बुके आणि ग्रंथभेट देऊन डॉ. आवलगावकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सोमलवार महाविद्यालयाच्या प्रा. नीता खोत, प्रा. सायली लाखे-पिदळी, प्रा. सपन नेहरोत्रा, विभागातील प्राध्यापक डॉ. प्रज्ञा निनावे, प्रा. अमित दुर्योधन, प्रा. समीर कुमरे, प्रा. प्रज्ञा दुधे यांची उपस्थिती होती.




# पदव्युत्तर एमबीजीई विभागात सोसायटी उद्घाटित

## डॉ. भरत सूर्यवंशी व सिद्धार्थ खोब्रागडे यांचे व्याख्यान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर आण्विक जीवशास्त्र आणि अनुवंशिक अभियांत्रिकी विभागात (एमबीजीई) सोसायटी उद्घाटन कार्यक्रम मंगळवार, दिनांक १ आक्टोंबर २०२४ रोजी पार पडला. या अनुषंगाने पेटंट आणि डिझाईनचे सहाय्यक नियंत्रक डॉ. भरत सूर्यवंशी व श्री सिद्धार्थ खोब्रागडे यांचे अतिथी व्याख्यान पार पडले.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. दयानंद गोगले यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, पेटंट कार्यालय नागपूर येथील पेटंट आणि डिझाइन सहायक नियंत्रक डॉ. भरत सूर्यवंशी, महात्मा ज्योतिबा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे नागपूर जिल्हा व्यवस्थापक श्री सिद्धार्थ खोब्रागडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सहाय्यक नियंत्रक डॉ. भरत सूर्यवंशी यांनी पेटंट कार्यालयाच्या स्पर्धा परीक्षेविषयी माहिती दिले. सोबतच पेटंट व डिझाईनच संबंधित विविध विषयांवर त्यांनी व्याख्यान दिले. श्री. सिद्धार्थ खोब्रागडे यांनी एमबीजीई सोसायटीचे उद्घाटन करीत विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे भाषण केले. जीवन जगण्याच्या विविध शैलीने विषयी त्यांनी त्यांच्या भाषणातून मार्गदर्शन केले.

मेहनती आणि गुणवत्ताधारक विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय उभा करताना दिसतात, असे एमबीजीई, सोसायटीचे अध्यक्ष तथा विभाग प्रमुख डॉ. दयानंद गोगले म्हणाले. एमबीजीई सोसायटीने विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी अनेक कार्यक्रम आयोजित केले असल्याचे ते म्हणाले.

एमबीजीई सोसायटीचे सचिव श्री सुमित वडभुडे यांनी विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी वर्षभरात आयोजित केलेल्या कार्यशाळा, सेमिनार, प्रशिक्षण सत्र, अतिथी व्याख्याने आणि व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम यासह केलेल्या कामगिरी देत कार्यक्रमांचा आढावा घेतला. यात दोन विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळाली. एकाला परदेशात पीएचडी करण्यासाठी आणि दुसऱ्याला बंगलोरच्या केंद्रीय संस्थेत शिष्यवृत्ती प्राप्त झाली. अनेक विद्यार्थ्यांनी एमएस- सिईटी परीक्षा उत्तीर्ण केली तर दोन विद्यार्थ्यांना महाज्योती फेलोशिप पुरस्कार प्राप्त झाला. आठ विद्यार्थ्यांनी विद्यापीठात शिक्षक आणि कार्यालय सहाय्यक पदे मिळविली. काही विद्यार्थ्यांनी मौखिक आणि पोस्टर शोध निबंध सादरीकरणात आणि भिंत चित्रकला स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविले. या प्रसंगी प्रा. रुचि वासनिक, डॉ. माधुरी ठाकरे, रेनुका व्यवहारे, डॉ. स्वाती गोडघाटे, डॉ. प्रज्ञा अनासने, श्री क्षितिज शहारे आणि नेहा कोहपेरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विभागातील अतिथी प्रा. डॉ. प्रमोद रामटेके यांना 'द लॅन्सेट' मध्ये ९८ पेक्षा अधिक प्रभाव घटक असलेल्या शोधपत्राच्या प्रकाशनाबद्दल सन्मानित केले गेले.

### एमबीजीई सोसायटीची निवड

या वर्षी एमबीजीई सोसायटीच्या विविध पदांसाठी खालील सदस्यांची निवड करण्यात आली. सोसायटी सचिव म्हणून श्री सुमित वडभुडे, संयुक्त सचिव- श्रद्धासुमन करहाडे, कार्यक्रम व्यवस्थापक- साक्षी पाटील, संयुक्त कार्यक्रम व्यवस्थापक- अदिती साबळे, कोषाध्यक्ष सोनसखळी तलांडे, संयुक्त कोषाध्यक्ष मोहित गोडे, मासिक संपादक - सुश्री सुनीता साहू, संयुक्त मासिक संपादक हर्ष पवार यांचा समावेश आहे. वैष्णवी गुप्ता आणि कोमल धावडे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले, तर संयुक्त सचिव श्रद्धासुमन करहाडे यांनी आभार मानले.

## निवड-नियुक्ती-सुयश

# अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. निशिकांत राऊत सादर करणार संशोधन पेपर

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान



डॉ. निशिकांत राऊत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील प्राध्यापक तथा आयआयएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत हे अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय परिषदेत दोन संशोधन पेपर सादर करणार आहे. डॉ. निशिकांत राऊत यांना अमेरिकन असोसिएशन ऑफ फार्मास्युटिकल सायंटिस्ट्स यांच्या वतीने आयोजित "२०२४ फार्मसाय ३६०" या आंतरराष्ट्रीय परिषदेकरिता निमंत्रित करण्यात आले आहे. अमेरिकेत ही परिषद २० ते २३ ऑक्टोबर २०२४ दरम्यान झाली.

'ट्रान्सक्रिप्टोमिक ॲनालिसिस रिव्हिल्स दॅट निंफेया ओडोराटा एक्सट्रॅक्ट अँड फ्रॅक्शन्स अपरेग्युलेट दी ॲपोप्टोसिस, ऑटोफेजी, ॲण्ड अनफोल्डेड प्रोटीन कॅनॉनिकल पाथवेज् इन एमसीएफ-७ सेल्स' आणि नोवेल काम्बिनेशन ॲप्रोच टू इनहॅन्स सोल्यूबिलीटी ॲण्ड पर्मिबिलीटी ऑफ पाझोपॅनिब युझिंग फॉस्पोलिपीड कॉम्प्लेक्स ॲण्ड ए बायोएन्हान्सर' असे डॉ. निशिकांत राऊत यांच्या संशोधन पेपरचे विषय आहेत. औषधी विज्ञान क्षेत्रातील डॉ. निशिकांत राऊत यांचे संशोधन आणि महत्वपूर्ण कार्य यामुळे अमेरिकेत होत असलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे त्यांना निमंत्रण प्राप्त झाले आहे. या संशोधना सोबतच डॉ. निशिकांत राऊत हे युनिव्हर्सिटी ऑफ इलिनॉयज ॲट शिकागो आणि सेंट जॉन फिशर युनिव्हर्सिटी, रोचेस्टर येथे सहचार्याच्या संधींचा शोध घेण्यासाठी देखील भेट देणार आहेत. या भेटीमुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि या प्रतिष्ठित संस्थांमध्ये अर्थपूर्ण भागीदारी आणि ज्ञानाचे आदानप्रदान साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये संशोधन आणि नवोन्मेषेचे कार्य उत्कृष्टपणे होत असल्याचे डॉ. राऊत यांना अमेरिकन असोसिएशन ऑफ फार्मास्युटिकल सायंटिस्ट्स या संस्थेने निमंत्रित केल्याने दिसून येत आहे. सोबतच डॉ. राऊत यांचे औषधी निर्माण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाचे महत्त्व देखील अधोरेखित करते. डॉ. निशिकांत राऊत यांनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल त्यांना विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक व शिक्षकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



# डॉ. संजय ढोबळे यांच्या संशोधन समूहाचे ३ महिन्यात तब्बल १७ पेटंट

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे व त्यांचे संशोधक विद्यार्थी यासह संशोधक सहयोगी यांनी संयुक्तपणे काम करून त्यांच्या १७ पेटंटला मागील ३ महिन्यात मान्यता प्राप्त झाली आहे. डॉ. संजय ढोबळे व त्यांच्या संशोधक सहयोगींनी ल्युमिनिसेन्स मटेरियल विषयात संशोधनास लागणारे व समाजपयोगी कार्यावर नवकल्पनांना प्रोत्साहित करीत तब्बल १७ पेटंट प्राप्त केले आहे.

भौतिक शास्त्रासह आंतर विषयांमध्ये भौतिक शास्त्राची उपयोगिता सांगत वर्षानुवर्ष संशोधनाची कल्पना व त्यावर विचारपूर्वक कार्य करून त्यांनी एकूण १७ पेटंटला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला संशोधनाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी उत्कृष्ट कार्य केले आहे. डॉ. ढोबळे यांचे एकूण ८० पेटंट असून त्यापैकी ४७ पेटंटला मान्यता मिळाली आहे, हे विशेष. त्यांच्या १७ पेटंटमध्ये त्यांचे सहकारी संशोधक व संशोधक विद्यार्थ्यांमध्ये डॉ. शामली गुप्ते, डॉ. अमित बंसोड, प्रियल चौधरी, सागर पवार, डॉ. यातिश परवाह, राहुल पवार, डॉ. नयना शिरभाते, प्रतिक तायडे, डॉ. वैशाली पिंपळे,

डॉ. सीमा निम्बारते, डॉ. नीरजा हरदास, डॉ. अर्चना कुलकर्णी, प्रीती डोंगरे, डॉ. प्रशांत शिंदे, डॉ. चंद्रशेखर डोईफोडे, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. रूपाली महाखोंडे, डॉ. अतुल येरपुडे, डॉ. राकेश रॉय, डॉ. श्वेता पार्वे, चंद्रहास नंदनवार, डी. एम. परशुरामकर, आर.एस. मेश्राम, डॉ. निरुपमा ढोबळे, डॉ. विभा चोपडा, डॉ. आरती मुळे, डॉ. स्वाती बिश्नोई, डॉ. शरद देशमुख यांनी कार्य केले आहे. डॉ. ढोबळे यांनी आतापर्यंत ९५९ शोधनिबंध स्कोपसवर प्रकाशित केले असून त्यांचे सायटेशन १३,८६६ आहे व एच इंडेक्स ४८ आहे. त्याप्रमाणे गुगल स्कॉलरवर त्यांचे सायटेशन १६,९५३ असून ए-इंडेक्स ५४ तर आय-टेन इंडेक्स ४५६ आहे. वरील संशोधनाचा त्यांचा अनुभव बघता त्यांना नुकतेच नॅचर या प्रतिष्ठित जनरलसाठी संपादकीय मंडळावर घेण्यात आले आहे हे विशेष. भौतिकशास्त्र विभागातील शिक्षक व त्यांच्या संशोधक सहकाऱ्यांनी तब्बल १७ पेटंट मिळवीत यश प्राप्त केल्याने विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर सर्व शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



## आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रतीक्षा ब्रम्हे हिच्या नावीन्यपूर्ण संशोधनास प्रथम क्रमांक
### विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागाला मिळाला बहुमान

मथुरा येथील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल रिसर्च जीएलए युनिव्हर्सिटी येथे ४ व ५ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील विद्यार्थिनी प्रतीक्षा ब्रम्हे हिने सादरीकरण केलेल्या संशोधन कार्यास प्रथम क्रमांक मिळाला आहे. आंतरराष्ट्रीय परिषदेत संशोधन पेपर सादरीकरणात प्रतीक्षाला प्रथम क्रमांक मिळाल्याने औषधी निर्माणशास्त्र विभागाला बहुमान प्राप्त झाला आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल रिसर्च - GLA युनिव्हर्सिटी, मथुरा येथे "केमिकल, बायोलॉजिकल आणि फार्मास्युटिकल सायन्सेसमधील नवकल्पना" या विषयावरील चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या आंतरराष्ट्रीय परिषदेत ८०० पेक्षा अधिक संशोधक सहभागी झाले होते. यामध्ये "3D बायोप्रिंटिंगसाठी पॉलीमेरिक बायोमटेरियल हायड्रोजेलचा विकास आणि मूल्यमापन" या विषयावर प्रतीक्षाने संशोधन पेपर सादर करीत अव्वल क्रमांक प्राप्त केला. प्रतीक्षाने संशोधनकार्य प्रा. डॉ. प्रफुल्ल एम. साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेत ८०० पेक्षा अधिक संशोधक विद्वानांनी रासायनिक, जैविक आणि औषधी विज्ञान क्षेत्रातील संशोधन कार्याचे सादरीकरण केले. थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानावरील तिचे संशोधन हे औषध विज्ञान विषयातील नाविन्यपूर्ण संशोधन आहे. तिने तिच्या यशाचे श्रेय विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक, संशोधन मार्गदर्शक डॉ. प्रफुल्ल साबळे, डॉ. प्रमोद खेडेकर आणि तिच्या पालकांना दिले आहे. प्रतीक्षाचे 3D बायोप्रिंटिंग तंत्रज्ञान संशोधनावर आधारित दोन संशोधन लेख नुकतेच अत्यंत प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहे.

# प्रतिष्ठित डॉ. एम के पारिख स्मृती पुरस्काराने डॉ. प्रकाश ईटणकर सन्मानित




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. प्रकाश इटनकर यांना २०२४ साठीच्या प्रतिष्ठित डॉ. के. एम. पारिख स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भारतीय पारंपारिक आशियाई औषध अभ्यास संघटना (IASTAM-India) यांच्या वतीने आयुर्वेदिक तत्त्वे आणि निसर्गाच्या नियमांवर आधारित नैसर्गिक उत्पादने आणि पद्धती स्थापित करण्यात उत्कृष्ट योगदान दिल्याने डॉ. इटनकर यांना हा मान्यताप्राप्त पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. के. एम. पारिख स्मृती पुरस्कार हा आयुर्वेदिक औषध संशोधन आणि विकासामध्ये एक दूरदर्शी असलेल्या डॉ. के. एम. पारिख यांच्या स्मरणार्थ दिला जातो. डॉ. पारिख हे IASTAM-India चे संस्थापक आणि कोषाध्यक्ष होते. डॉ. इटनकर यांना पारंपरिक ज्ञानाचा आधुनिक औषध पद्धतींसह सांगड घालून वैज्ञानिक संशोधनाद्वारे आयुर्वेदिक ज्ञानाचा प्रचार केल्यामुळे हा सन्मान मिळाला आहे. नैसर्गिक उत्पादनांच्या संशोधन आणि विकासात, विशेषतः आयुर्वेदातील वैज्ञानिक पायाभूत तत्त्वे यामध्ये डॉ. इटनकर यांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. आयुर्वेदाच्या तत्त्वज्ञानाचे समजून घेण्यास आणि त्याचा वापर करण्यास प्रगतीच्या दिशेने त्यांचे प्रयत्न आहे. पारंपरिक पद्धती आणि आधुनिक औषध यांच्या दरम्यानचे अंतर कमी करण्यात त्यांच्या कार्याचा प्रभाव शिक्षण क्षेत्र आणि आरोग्य सेवा क्षेत्रात स्पष्टपणे दिसून येत आहे. आयुर्वेदिक विज्ञानाचे जतन आणि प्रचाराचे समर्पण तसेच आजच्या आरोग्यसेवा क्षेत्रात नैसर्गिक उत्पादनांना अधिक सुलभ आणि वैज्ञानिक मान्यता मिळवण्यासाठी त्यांचे अतुलनीय कार्य असल्याने डॉ. इटनकर यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. पुरस्कार मिळाल्याने विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक, माजी विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर यांच्यासह शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# भौतिकशास्त्र विभागाच्या सतनामला दोन पुरस्कार वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेत मिळविला पुरस्कार



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थिनी सतनाम कौर मट्टू हिने वक्तृत्व स्पर्धेत दोन पुरस्कार प्राप्त केले आहे. विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन लेडी इंटरप्रिंनर विंग आणि बॅरिस्टर शेषराव वानखडे ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दिवंगत कुसुमताई वानखेडे स्मृती वादविवाद स्पर्धेचे आयोजन ३ ते ७ ऑक्टोंबर २०२४ दरम्यान करण्यात आले होते. वादविवाद स्पर्धेत प्रथम तर स्वयंस्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक सतनामने प्राप्त केला.

नागपूर येथील कुसुमताई वानखेडे हॉल येथे 'उपाय: सोल्युशन टू बिझनेस चॅलेंजेस' या विषयावर आयोजित वादविवाद स्पर्धेत सतनाम कौर मट्टू हिने प्रथम क्रमांक पटकाविला. वादविवाद स्पर्धेत एकूण ३० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. याच ठिकाणी आयोजित 'रॅपिड फायर बिजनेस माईंड' या या थीमवर आयोजित वक्तृत्व स्पर्धेत सतनामने 'पृथ्वीला वाचवा' या विषयावर स्वयंस्फूर्त भाषण देत तृतीय क्रमांक प्राप्त केला. एकाच स्पर्धेत दोन पुरस्कार प्राप्त करीत सतनामने पदभ्युत्तर भौतिकशास्त्र विभागाचा बहुमान वाढविला आहे. सतनामने तिच्या यशाचे श्रेय विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर, डॉ. अभय देशमुख व आई-वडिलांना दिले आहेत.

## डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांचा गुरुकुंज येथे सन्मान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांचा गुरुकुंज मोझरी येथे सन्मान करण्यात आला. ग्रामगीतेच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे ग्राम विकासाची संकल्पना सुंदर पद्धतीने अध्यासन विभागाकडून राबविली जात आहे. त्यात अंध व अनिष्ट रूढी, कर्मकांड, व्यसनमुक्ती अभियान, स्त्री शिक्षणाचे महत्त्व यावर समाज जागृतीचे कार्य अध्यासनाकडून होत आहे. या कार्याची दखल घेत, वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवात या कार्याबद्दल केंद्रीय प्रचार विभाग श्रीक्षेत्र गुरुकुंज आणि पद्मश्री फाउंडेशन नागपूर तसेच साक्षी कथ्थक डान्स अकॅडमी वर्धा यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यस्तरीय श्री गुरुदेव जीवन गौरव पुरस्कार सन २०२४ डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांना प्रदान करण्यात आला. श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम मोझरी येथे २१ ऑक्टोंबर २०२४ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. पुरस्कार प्राप्त झाल्याने डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांचे विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व सर्व शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.



## रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय-राज्यस्तर परीक्षेत यश तब्बल ११ विद्यार्थी सेट परीक्षेत उत्तीर्ण


Harshal Sonkusale


Aishwarya Mhaiskar


Bhagyashri Watkar


Dhanshri Watkar


Janhvi Dhote


Nikita Patle


Sapana Donadkar


Apurva Bambal


Prajwal Udan


Sneha Bankar


Vaibhav Jaiswal

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील महत्त्वपूर्ण परीक्षांमध्ये उत्कृष्ट यश संपादन केले आहे. सीएसआयआर-नेट (CSIR-NET) परीक्षेत विभागातील विद्यार्थी संपूर्ण भारतातून तिसरी रँक प्राप्त केली असून प्रतिष्ठित ज्युनिअर रिसर्च फेलोशिप देखील मिळविली आहे. सोबत ११ विद्यार्थ्यांनी सेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३ मधील प्रतिभावान विद्यार्थी प्रज्वल उडान याने सीएसआयआर-नेट (CSIR-NET) परीक्षेत प्रज्वल उडान याने संपूर्ण भारतातून तिसरी रँक प्राप्त केली असून प्रतिष्ठित ज्युनिअर रिसर्च फेलोशिप (JRF) मिळविली आहे. प्रज्वल हा वर्धा जिल्ह्यातील अकोली गावातील शेतकरी कुटुंबातील मुलगा आहे. त्याच्या यशामुळे विभागासाठी हा अभिमानास्पद क्षण ठरला आहे. प्रज्वलने यावर्षी सेट (SET) आणि गेट (GATE) परीक्षाही उत्तीर्ण केल्या. या यशातून प्रज्वलचे शैक्षणिक क्षेत्रात असलेले समर्पण दिसून येत आहे. आयआयटी (IIT) किंवा आयआयएससी

(IISc) बेंगलोर सारख्या सर्वोच्च संस्थांमध्ये संशोधन कार्य (Ph.D.) करण्याचा त्याचा मानस आहे. पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागाच्या ६० वर्षांच्या इतिहासातील हे यश मैलाचा दगड ठरणारे आहे. गाव खेड्यातील विद्यार्थी देखील उच्च शिक्षणात यशोशिखर गाठण्यात मागे नसल्याचे प्रज्वलाच्या यशाने दाखवून दिले आहे. विभागाला मिळालेले यश राष्ट्रीय पुरस्कारापेक्षा कमी नाही. विभागातील ११ विद्यार्थ्यांनी वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक असलेली प्रतिष्ठित महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा (M-SET) उत्तीर्ण केली. शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रात यशस्वी होण्याचा बीजमंत्र विभागाकडून मिळत असल्याचे या याच्यावरून दिसून येते.

## सेट (SET) उत्तीर्ण विद्यार्थी

✦ अपूर्वा बांबल ✦ स्नेहा बनकर ✦ जान्हवी धोटे ✦ सपना दोनडकर ✦ वैभव जयस्वाल ✦ ऐश्वर्या म्हैसकर
✦ निकिता पटले ✦ हर्षल सोनकुसळे ✦ प्रज्वल उडान ✦ धनश्री वाटकर ✦ भाग्यश्री वाटकर

रासायनिक सोसायटी उद्घाटन कार्यक्रमात सेट व नेट परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. स्वायत्त पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग झपाट्याने बदलत असलेल्या काळात अद्यावत अभ्यासक्रम देत विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर टाकत आहे. त्याचप्रमाणे समस्यांची सोडवणूक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. विभागाकडून करण्यात आलेले महत्त्वपूर्ण बदल विद्यार्थ्यांच्या दृष्टीने त्यांची स्पर्धा परीक्षाच नव्हे तर भविष्यकालीन करिअरच्या दृष्टीने देखील महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे विभाग प्रमुख डॉ. एन. एन. करडे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील शिक्षकांचे मोठे योगदान आहे. यामध्ये विभाग प्रमुख प्रा. एन. एन. करडे, प्रा. आर. एम. जुगादे, प्रा. श्रीमती एम. आर. लांजेवार, प्रा. आर. एस. डोंगरे, आणि डॉ. व्ही. एम. तांगडे यांचा समावेश आहे.

## महत्त्वाचे मुद्दे

✦ प्रज्वल उडान याने CSIR-NET मध्ये भारतात तिसरी रँक मिळवित ज्युनिअर रिसर्च फेलोशिप प्राप्त केली.
✦ प्रज्वल उडान याने SET आणि GATE परीक्षाही उत्तीर्ण केल्या.
✦ विभागातील ११ विद्यार्थ्यांनी M-SET उत्तीर्ण केले.
✦ विद्यार्थ्यांचा सन्मान २०२४-२५ रासायनिक समाजाच्या उद्घाटनाच्या वेळी करण्यात आला.



## बुद्ध धम्माचा स्वीकार केलेला समाज सतत प्रगतीवर मार्गस्थ लेखक डॉ.देवीदास घोडेस्वार यांचे प्रतिपादन

### पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात व्याख्यान

बुद्ध धम्माचा स्वीकार केलेला समाज सतत प्रगतीवर मार्गस्थ असल्याचे प्रतिपादन लेखक तथा सामाजिक कार्यकर्ता डॉ. देविदास घोडेस्वार यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने अशोक विजयादशमी व ६८ व्या धम्मचक्क परिवर्तन दिनाच्या निम्मित्याने अतिथी व्याख्यान मंगळवार दिनांक ८ ऑक्टोंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले. यावेळी डॉ. घोडेस्वार मार्गदर्शन करीत होते. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी भूषविले. व्याख्याते म्हणून लेखक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. देविदास घोडेस्वार यांची उपस्थिती होती. "सामाजिक बदलामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतर चळवळीची भूमिका" या विषयावर पुढे बोलताना डॉ. घोडेस्वार यांनी भारतरत्न डॉ. बाबाबसाहेब आंबेडकर यांचा बहीष्कृत भारत ते प्रबुद्ध भारत दरम्यान काळातील घडामोडींची मांडणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालीन साक्षात्कारी धर्म नाकारून अविष्कारी बुद्ध धम्माचा स्वीकार केला. जो धर्म स्वातंत्र, समता आणि बंधुता या मानवी मूल्यांचा स्वीकार करतो. तसेच बुद्ध धम्म स्वीकारने व आचरणात आणणे ही निरंतर प्रकिया आहे. याचा परिणाम म्हणून आज या समाजात मोठा बदल आपण अनुभवतो, असे घोडेस्वार म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना डॉ. विकास जांबुळकर यांनी भारतीय इतिहासाला उजळणी देताना 'कायदा विरहित कायदा' अशी परिस्थिति समाजात दिसत होती. त्याची स्विकारहर्ता होती, असे सांगितले. त्या संबंध परिस्थितीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतावादी बुद्ध धम्म स्वीकार केला आणि या समाजात मोठा बदल झालेले दिसतो, असे डॉ. जांभुळकर म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रज्ञानंद यांनी केले तर आभार सिमरन थूल हिने मानले. या प्रसंगी प्रा. प्रमोद कानेकर, प्रा. किशोर नैताम ,भूपेंद्र घरात, सचिन चापके, सुनिल अखंडे, उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राची वासनिक, प्रियंका गावंडे, यांनी परिश्रम घेतले.

## सामाजिक दायित्व





# 'एटापल्ली ते वॉशिंग्टन'चे अडथळे मार्गदर्शिका करेल दूर

### प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांचे प्रतिपादन

### धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विद्यापीठ मार्गदर्शिकेचे निःशुल्क वितरण

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेली मार्गदर्शिका 'एटापल्ली ते वॉशिंग्टन डीसी' पर्यंत अडथळे दूर करेल, असे प्रतिपादन माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व मागासवर्गीय कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे माहिती व मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन व निःशुल्क वितरणाचा कार्यक्रम शनिवार, दिनांक १२ ऑक्टोंबर २०२४ रोजी पार पडला. केंद्र उद्‌घाटनिय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. बोकारे मार्गदर्शन करीत होते.

दीक्षाभूमी परिसरातील सुंदरलाल चौक येथे आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी भूषविले. कार्यक्रमाला उद्‌घाटक म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर (भावसे), प्रमुख उपस्थितीमध्ये गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. पुरणचंद्र मेश्राम, डॉ. मनोज शंभरकर (युएसए), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री दिनेश दखणे यांची उपस्थिती होती. उपक्रम सुरू करणे सोपे आहे. मात्र, सातत्याने २४ वर्षांपासून उपक्रम सुरू ठेवणे कठीण असून हा कार्यक्रम अद्वितीय आणि अवर्णनीय असल्याचे डॉ. बोकारे पुढे बोलताना म्हणाले. अशा उपक्रमातून समाज मागील ६०-७० वर्षात विकसित झाला. मार्गदर्शिकेच्या माध्यमातून विविध योजना अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्यास अधिक वेगाने समाज विकसित होईल, असे डॉ. बोकारे म्हणाले. इंग्लंडच्या संसदेत १९४५ मध्ये विस्टन चर्चिल यांनी देश चालविण्यात भारतीय अक्षम असून त्यांना प्रशासनाचा अनुभव नाही, असे भाकीत केले होते. ७०-८० वर्षात लोकशाही देश म्हणून उभाच राहिला नाही, तर जगात ५ वी आर्थिक महासत्ता बनत भारताने चर्चिल यांचे भाकीत खोटे ठरवले आहे. संविधानाने दिलेली स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही मूल्ये कागदावरच न राहता भारतीयांनी जीवनात उतरविली. जगाच्या पाठीवर परिवर्तन इतक्या संयमाने कोठेच घडले नाही. रशिया, चीन या ठिकाणी रक्तपाताने परिवर्तन घडले. मात्र, कोणताही रक्तपात न करता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा मार्ग स्वीकारत परिवर्तनाचा नवीन संदेश दिला आहे. मार्गदर्शिकेचा उद्देश आज जाणविणार नाही. मात्र, १०० वर्षांनी जेव्हा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा या क्षणाची नोंद सुवर्ण अक्षरांनी होईल, असे डॉ. बोकारे म्हणाले.

माहिती व मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन करताना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी हा आनंदाचा क्षण असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त अशा संपूर्ण योजनांचा अभ्यास, संकलन, पुस्तक तयार करीत विमोचन करणे सोपे नाही. याला फार मेहनत लागते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे कार्य करीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांच्या विचारांमध्ये साम्य आढळते. कोणी अतिथी विद्यापीठाला भेट देतात तेव्हा या दोन महापुरुषांचा एकत्रित असलेला फोटो मी त्यांना आवर्जून दाखवितो, त्यातून प्रेरणा मिळत असल्याचे डॉ. बारहाते म्हणाले. कुलगुरू म्हणून रुजू झाल्यानंतर अधिसभेत संविधान शिल्पाची उभारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रत्येक महाविद्यालयात २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिवस म्हणून साजरा करण्याचे निर्देश दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या उद्देशाने संविधान लिहिले आणि

संत गाडगेबाबा यांनी दशसूत्री दिली. त्या मार्गाने चाललो तर त्यांचा उद्देश सफल होईल. या उपक्रमातून त्यांचे स्वप्न साकार करू शकतो तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ देखील अशा प्रकारची मार्गदर्शिका काढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर यांनी ही मार्गदर्शिका म्हणजे विद्यार्थ्यांसाठी विविध शासकीय योजनांबाबत माहिती देणारे गुगल असल्याचे सांगितले. आसान्या फाउंडेशनच्या माध्यमातून उच्च शिक्षण घेणाऱ्या २७ विद्यार्थ्यांना दत्तक घेतले असल्याचे त्यांनी सांगितले. संत गाडगेबाबा यांनी महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश आदी विविध भागात फिरत गौतम बुद्धाचा मार्ग सांगितला. गाडगेबाबांचे सचिव यांनी त्यांचे कार्य लिहून ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र, गाडगेबाबांनी ते जाळून टाकले. यामुळे या विषयावर अधिक संशोधन होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. व्हिएतनाम येथे गेले असताना तेथील व्यक्तीने गौतम बुद्धाच्या देशातून आलो असल्याने कशाप्रकारे आदरतिथ्य केले याची माहिती त्यांनी दिली. डॉ. मनोज शंभरकर यांनी अमेरिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उभारलेला पुतळा, स्टडी सेंटर सुरू करण्याबाबत विविध संघटना करीत असलेल्या कार्याबाबत माहिती दिली. माजी कुलसचिव डॉ. पूरणचंद्र मेश्राम यांनी संपूर्ण भारतात केवळ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठच अशा प्रकारची मार्गदर्शिका प्रकाशित करीत समाज परिवर्तनाचे कार्य करीत असल्याचे सांगितले. सामाजिक न्यायाची भूमिका घेत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय शिक्षणातून देत नवीन पिढीला प्रेरित करण्याचे कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ करीत असल्याचे त्यांनी सांगितले. जगात सर्वात मोठे दान हे विद्यादान असल्याचे गौतम बुद्ध म्हणत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने मार्गदर्शिका पुस्तक विद्यार्थ्यांसाठी लढाईचे शस्त्र म्हणून उपलब्ध करून दिले आहे. संविधानाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे कार्य विद्यापीठ करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्याकडून प्रेरणा घेत ही मार्गदर्शिका गोंडवाना विद्यापीठ देखील काढत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री दिनेश दखणे यांनी कार्यक्रमाच्या आयोजना मागील भूमिका सांगितली. विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती या मार्गदर्शिका पुस्तकात असल्याने त्यांनी याचे वाचन करावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचलन संघटनेचे महासचिव डॉ. चंद्रमणी सहारे यांनी केले तर आभार दर्पण गजभिये यांनी मानले. कार्यक्रमाला भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन डोंगरवार, मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे, कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. राहुल खराबे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री राजेश नानवटकर, मनोज इंगळे, शरद बागडे, विलास बनसोड, धम्मा धाबर्डे, मनीष फुलझेले, आकाश भगत, शैलेश फुलझेले, मनोज धुर्वे, नरेश कांबळे, अजय शंभरकर, प्रफुल्ल भोवते, महेंद्र पाटील यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.






## भारतात जातिवाद व अमेरिकेत वंश-वर्णवाद सारखाच

### साउथ कॅरोलिना स्कूल ऑफ लॉचे शिक्षक डॉ. केविन ब्राउन यांचे प्रतिपादन

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व विचारधारा विभागात व्याख्यान

भारतातील जातिवाद तर अमेरिकेत वंशवाद व वर्णवाद सारखाच असल्याचे प्रतिपादन साउथ कॅरोलिना स्कूल ऑफ लॉचे शिक्षक डॉ. केविन ब्राऊन यांनी केले. केंद्रीय सामाजिक न्याय विभाग अंतर्गत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनच्या तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व विचारधारा विभागाच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमाला शनिवार, दिनांक १२ ऑक्टोंबर २०२४ रोजी पार पडली. व्याख्यानमालेत डॉ. केविन ब्राऊन मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमालेत 'आफ्रिकन-अमेरिकन समुदाय आणि भारतीय उपखंडावरील दडपशाही यांच्यातील ऐतिहासिक संबंध' या विषयावरील व्याख्यानात डॉ. केबिन ब्राऊन यांनी पुढे बोलताना अमेरिका आणि आफ्रिकेतील कृष्णवर्णीय आणि गोरे यांच्यातील संघर्ष आणि

भारतातील जातिवाद तर अमेरिकेत वंशवाद व वर्णवाद सारखाच असल्याचे प्रतिपादन साउथ कॅरोलिना स्कूल ऑफ लॉचे शिक्षक डॉ. केविन ब्राऊन यांनी केले. केंद्रीय सामाजिक न्याय विभाग अंतर्गत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनच्या तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व विचारधारा विभागाच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमाला शनिवार, दिनांक १२ ऑक्टोंबर २०२४ रोजी पार पडली. व्याख्यानमालेत डॉ. केविन ब्राऊन मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमालेत 'आफ्रिकन-अमेरिकन समुदाय आणि भारतीय उपखंडावरील दडपशाही यांच्यातील ऐतिहासिक संबंध' या विषयावरील व्याख्यानात डॉ. केबिन ब्राऊन यांनी पुढे बोलताना अमेरिका आणि आफ्रिकेतील कृष्णवर्णीय आणि गोरे यांच्यातील संघर्ष आणि भारतातील जातीयवाद यात बरेच साम्य असल्याचे सांगितले. तेथे काळ्या लोकांना नोकरीच्या बाबतीत त्रास दिला जातो. आता वंशवाद आणि रंगवादाबरोबरच अमेरिकेत जातीवादाचे प्राबल्य ही वाढत आहे. भारताप्रमाणे तेथे ही जातींनी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे अमेरिकेत जातीवादाच्या विरोधात कायदा करण्याची मागणी होत आहे, असे डॉ.केविन ब्राउन म्हणाले. या काळात डॉ. केविन ब्राउन यांनी भारत आणि आफ्रिकन-अमेरिकेत झालेल्या संघर्षांमधील साम्यांची उदाहरणे दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेत केलेल्या अस्पृश्यांच्या वकिलीला त्यांनी आफ्रिकन-अमेरिकेतील कृष्णवर्णीय लोकांच्या संघर्षाशी जोडले. त्यांनी पुणे कराराचे उदाहरण ही दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व अध्यसन विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी अध्यक्षीय भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांचा प्रश्न गोलमेज परिषदेत मांडल्याचे सांगितले. प्रास्ताविक डॉ. गौतम कांबळे यांनी केले. संचालन विजय बडोदेकर यांनी केले तर आभार मिलिंद वालदे यांनी मानले.




## दर्जेदार वाचनासाठीचा सलग अवकाशच हरवला

### वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात डॉ. शैलेंद्र लेंडे यांची खंत

दर्जेदार वाचनासाठीचा सलग अवकाशच हरवला असल्याची खंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी व्यक्त केली. माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस वाचन प्रेरणादिन म्हणून पदव्युत्तर मराठी विभागात मंगळवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी साजरा करण्यात आला. या अभिवाचन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. लेंडे बोलत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी भूषविले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विभागातील प्रा. डॉ. प्रज्ञा निनावे, प्रा. अमित दुर्योधन, प्रा. प्रज्ञा दुधे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना 'आज तंत्रज्ञानाच्या युगात मोबाइलमुळे आपण एकमेकांच्या संपर्कात असणे सहजसोपे झाले असले, तरी त्यातील संदेश माहिती देण्यापुरते मर्यादित आहेत, माणसाच्या मन आणि मेंदूला ऊर्जितावस्था देणारे नाहीत, असे डॉ. लेंडे म्हणाले. वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात विभागातील विद्यार्थी दिनेश बांडेबुचे, वैशाली फुले, सीमा हटवार, हेमलता वानखेडे, मानसी रामटेके, ऐश्वर्या शिंदे यांनी विविध पुस्तकांतील निवडक उताऱ्यांचे वाचन केले. प्रा. डॉ. निनावे यांनी आपल्या मार्गदर्शनात वाचनामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास घडत असल्याचे सांगितले. प्रास्ताविक करताना प्रा. दुर्योधन यांनी दर्जेदार वाचन माणसाच्या चिंतनात, त्याच्या समाज व्यवहारात त्याला संवेदनशील व्यक्ती म्हणून घडविते, असे सांगितले. संचालन विद्यार्थिनी विशाखा पवार हिने केले, तर वैशाली फुले हिने आभार मानले. कार्यक्रमाला विभागातील विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.






# प्राचीन भारतीय वनऔषधी संवर्धनावर मंथन

## ऑरा संवर्धन पार्क येथे कार्यशाळेचे आयोजन

भारतीय प्राचीन वनऔषधीची लागवड, संवर्धन तसेच जागरूकता निर्माण व्हावी म्हणून तीन दिवसीय कार्यशाळा कोंढाळी येथील ऑरा संवर्धन पार्क येथे पार पडली. प्राचीन वनऔषधींचे गुणधर्म आणि महत्व देशाच्या विविध भागातील ४० तज्ञांनी कार्यशाळेत सहभागी होत जाणून घेतले. अखिल भारतीय पारंपरिक औषधी वैद्य महासंघ, आयुर्वान फाऊंडेशन आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा औषधी निर्माणशास्त्र यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

नागपूरच्या कोंढाळीतील ऑरा संवर्धन पार्कमध्ये ८०० पेक्षा अधिक औषधी वनस्पतींच्या लागवडी, संवर्धन आणि जागरूकता निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या कार्यशाळेतून करण्यात आले. प्राचीन वनऔषधी ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचे मिश्रण असलेल्या या कार्यक्रमाचा उद्देश आयुर्वेदाबद्दल जागरूकता वाढवणे आणि दुर्मिळ व धोक्यात असलेल्या औषधी वनस्पतींच्या प्रजातींच्या वाढीस प्रोत्साहन देणे हा होता. पारंपरिक वन औषध महासंघाचे श्री अनिलभाई पटेल, श्री राजेंद्र डेकट आणि त्यांच्या चमूने पारंपरिक वन औषधांचे संरक्षण आणि पुनरुत्थान करण्याची तातडीची गरज व्यक्त केली. या कार्यशाळेत देशभरातील ४० प्रसिद्ध औषधी निर्माण शास्त्रज्ञ आणि शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. त्यांनी चर्चासत्रात आपल्या विचारांची देवाणघेवाण केली. अखिल भारतीय पारंपरिक औषधी वैद्य महासंघ महाराष्ट्र सरकारच्या कायदा क्र. १८६०, निती आयोग, भारत सरकारच्या राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालय आणि भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि जलवायू बदल मंत्रालयात नोंदणीकृत आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील डॉ. प्रकाश ईटणकर यांनी या औषधी वनस्पतींचे संरक्षण किती महत्त्वाचे आहे आणि त्या आधुनिक आरोग्यसेवेत कशा प्रकारे योगदान देऊ शकतात याबाबत शास्त्रीय माहिती दिली. डॉ. जे. एन. पुरोहित यांनी "नाडी ज्ञान" या विषयावर आपले विचार व्यक्त केले. मध्य प्रदेशातील वैद्य निर्मल भृगु व वैद्य शंकरलाल राजपूत, हरियाणामधील वैद्य बालकृष्ण ठाकूर, उत्तराखंड मधील वैद्य महेश कुशवाहा, ओडिशातील वैद्य देवानंद साहू, गुजरातमधील वैद्य प्रफुल पटेल, उत्तर प्रदेशातील वैद्य नवीनचंद्र नायडा आणि एनसीआरचे अध्यक्ष हरीश खटाना यांनी औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पतींच्या धोक्यात असलेल्या प्रजातींबद्दल विचारांची देवाणघेवाण केली आणि त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

औषधी वनस्पतींच्या संवर्धन आणि लागवडीत महत्त्वाची भूमिका बजावणारे श्री अम्ब्रिश घटाटे हे ऑरा पार्कमध्ये ८०० हून अधिक औषधी प्रजातींची लागवड आणि उत्पादन करण्याच्या उपक्रम राबवित आहे. भारताच्या विविध भागांतून गोळि केलेल्या मूल्यवान वनस्पती प्रजातींच्या संवर्धनात त्यांचे काम महत्त्वाचे ठरले आहे. ही कार्यशाळा आयुर्वेदाचा समृद्ध वारसा पुनरुत्थान करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरले. प्राचीन काळापासून चालत आलेल्या वन औषधींचा गुणधर्म आणि ज्ञानाने पुढील पिढ्या लाभ घेऊ शकतील असा आशावाद कार्यशाळेत उपस्थित तज्ञांनी व्यक्त केला. आयुर्वेदाला एक शाश्वत आणि आरोग्य सेवा व्यवस्थेचा एक अविभाज्य घटक बनविण्यासाठी पुढील प्रयत्न करण्यासाठी एकत्र येण्याचे वचन यावेळी सर्वांनी दिले.



## महाभारताचे तत्त्वज्ञान प्रत्येक पिढीला मार्गदर्शक
### कर्नाटक केंद्रीय विद्यापीठाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. रवी खंगई यांचे प्रतिपादन
### पदव्युत्तर इतिहास विभागात अतिथी व्याख्यान




महाभारताचे तत्त्वज्ञान येणाऱ्या प्रत्येक पिढीला मार्गदर्शन करणारे आहे, असे प्रतिपादन कर्नाटक केंद्रीय विद्यापीठ येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. रवी खंगई यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभागात सहकार्यक्रम अंतर्गत शनिवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी डॉ. खंगई मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभाग प्रमुख तथा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. व्याख्याते म्हणून कर्नाटक केंद्रीय विद्यापीठाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. रवी खंगई यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. खंगई यांनी महाभारताच्या तत्त्वज्ञानातून मानवाला जीवन सुसंगत करण्याची दिशा मिळते, असे सांगितले. महाभारतातील अनेक प्रसंगांचे साम्य वर्तमान काळातील मानवी समाजात दिसून येतात. समाजातील अनेक समस्यांचे निराकरण या महाकाव्यांच्या तत्त्वज्ञानात दिसून येते. वेगवेगळ्या कालखंडात महाभारताचा अभ्यास झाला आहे. याच काळात संस्कृत भाषेला फार महत्त्वाचे स्थान होते. किंबहुना संस्कृत भाषेकरिता हा सुवर्णकाळ होता. महाभारत आणि रामायण या दोन्ही महाकाव्यातील पटकथा ह्या गोष्टी रूपाने पिढी दर पिढी एकमेकांपर्यंत पोहोचत आहे. यातील महत्त्वाच्या भूमिकांची चर्चा जनमानसात गोष्टी रूपाने चर्चिल्या जातात, असे त्यांनी सांगितले. महाभारतातून मानवी समाजाला प्रगतीकडे नेणारा एक व्यापक दृष्टिकोन आपल्याला दिलेला आहे. महाभारतातून स्त्रियांच्या अनेक भूमिकांविषयी आपल्याला सहज माहिती मिळते. सदैव स्त्रियांचा आदर करावा. कुठल्याही कालखंडात स्त्रियांना अपमानित करू नये अशी शिकवणच जणू या महाकाव्यातून आपल्याला आजपर्यंत मिळत आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी आपल्या भाषणात समाजाला नवी दिशा देण्याची ताकद महाकाव्यातील तत्त्वज्ञानात आहे, असे सांगितले. मानवी जीवनाच्या उन्नतीकरिता महाभारत आणि रामायण हे दोन्ही ग्रंथ महत्त्वाचे आहे. या दोन्ही ग्रंथाचे वाचन करून ते आत्मसात करावे, ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि वक्त्याचा परिचय डॉ. रामभाऊ कोरेकर यांनी केला. कार्यक्रमाचे संचालन प्रा.अडागे यांनी केले, तर आभार प्रा. नेहा अफरीन यांनी मानले.



## 'मोहजाल'च्या सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध
### युवकांमधील नशेच्या सवयीबाबत जनजागृती

युवकांमध्ये वाढत चाललेल्या 'ड्रग्स एडिक्शन'वर जनजागृती करण्यासाठी अंबाझरी रोडवरील गुरुनानक भवन येथे 'मोहजाल' ही नाटिका मंगळवार, दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी सादर करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित या नाटिकेचे सादरीकरण राधिका क्रिएशनच्या माध्यमातून करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माननीय कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. संजय कवीश्वर, विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या नाटकाची निर्मिती राधिका क्रिएशन व रंजन कला मंदिर नागपूर-पुणे यांच्याकडून करण्यात आली. नाटकाचे दिग्दर्शक संजय पेंडसे, लेखक प्रसन्ना शेंबेकर, निर्मिती सारिका पेंडसे तर नृत्य दिग्दर्शन सौरभ मसराम यांचे आहे. २५ मिनिटांच्या या नाटकाच्या माध्यमातून युवकांमध्ये वाढत असलेल्या 'ड्रग्स एडिक्शन' बाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपस्थित प्रेक्षकांनी देखील या नाटकाला भरभरून दाद दिली.



## विद्यार्थ्यांना दिली कल्याणकारी योजनांची माहिती समर्थ महाविद्यालयात जिल्हास्तरीय कार्यशाळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने राष्ट्रीय शिक्षण संस्था द्वारा संचालित समर्थ महाविद्यालय लाखनी येथे विद्यार्थी कल्याणकारी योजनांची माहिती देण्याबाबत कार्यशाळा शनिवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडली. विद्यार्थ्यांकरीता असलेल्या विविध कल्याणकारी योजनांबाबत कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ, सिनेट सदस्य श्री मनीष वंजारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांची उपस्थिती होती. कार्यशाळेला लाभलेले प्रमुख मार्गदर्शक डॉ. विजय खंडाळ यांनी 'विद्यार्थी विकास विभाग जीवनाच्या सर्व क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी सतत कार्यरत असतो, असे सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सूप्त कलागुणांना व्यासपीठ मिळण्याकरता विविध विद्यार्थीभिमुख कार्यक्रम या विभागाद्वारे राबवले जातात. विद्यार्थी केंद्रित योजनांचा विद्यार्थ्यांना कसा लाभ घेता येईल, विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना दिली. सिनेट सदस्य मनीष वंजारी यांनी 'ग्रामीण भागातील विद्यार्थी योजनांपासून कसा उपेक्षित राहतो. विद्यार्थ्यांनी येणाऱ्या अडचणींवर मात करून आपला सर्वांगिण विकास साध्य करावा असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'जोपर्यंत विद्यार्थी स्वतः योजना बद्दल जागरूक राहणार नाही. तोपर्यंत त्याला योजनांचा लाभ घेता येणार नाही. विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेऊन आपले कौशल्य जास्तीत जास्त प्रमाणात विकसित करावे व शैक्षणिक प्रगती करण्यासाठी कार्यतत्पर रहावे असे मत व्यक्त केले. या कार्यशाळेला जवळपास १५ महाविद्यालयाचे विभाग प्रमुख व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अर्थशास्त्र विभागाचे प्रा. युवराज जांभुळकर यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय विद्यार्थी विकास विभागाच्या जिल्हा संयोजिका प्रा. डॉ. संगीता हाडगे यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. धनंजय गभने यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व घटकांचे सहकार्य मिळाले.






## आकर्षक वस्तूंसह खमंग खाद्य पदार्थांची मेजवानी

### पदव्युत्तर गृहविज्ञान विभागात उद्योजकता आणि आरोग्य प्रदर्शनी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर गृहविज्ञान विभागाच्या वतीने बुधवार, दिनांक २३ ऑक्टोंबर २०२४ रोजी आयोजित उद्योजकता आणि आरोग्य प्रदर्शनीत गृहपयोगी आकर्षक वस्तूंसह खमंग खाद्य पदार्थांच्या मेजवानीने सर्वांना आनंदीत केले. मानवी शरीराकरिता पोषक असलेल्या खाद्यपदार्थांची माहिती व्हावी तसेच नव उद्योजकांना चालना मिळावी या उद्देशाने या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठात डॉ. प्रशांत माहेश्वरी यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य व गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. वंदना धवड यांची उपस्थिती होती. उद्योजकता आणि आरोग्य प्रदर्शनामध्ये विभागातील विद्यार्थिनींनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल प्रदर्शित केले. यामध्ये प्रामुख्याने शरीराकरिता पोषक असलेल्या खाद्यपदार्थांचा समावेश होता. खाद्यपदार्थांसोबतच आकर्षक असे हस्तकलेच्या पणत्या, इन्व्हलप, सुती चादर, आकाश दिवे, साडी पासून तयार केलेल्या बॅग-पाऊच, लाकडापासून तयार केलेले किचेन, सुकामेवा, दिवाळी सणाकरिता आवश्यक

असलेले वर्मी कंपोस्ट खत यांचा प्रदर्शनात दुकाने थाटण्यात आली होती. सोबतच प्रदर्शनीत भेट देणाऱ्या व्यक्तींची बोन मिनरल डेन्सिटी आणि बॉडी फॅट तपासणी देखील करण्यात आली. गृहविज्ञान विभागात आयोजित या प्रदर्शनाच्या यशस्वीतेकरिता विभागातील डॉ. शुभदा जांभुळकर, डॉ. प्राजक्ता नांदे, डॉ. तुलिका खरे, मीनाक्षी सुरपांडे, रेवती सुकळीकर, कल्याणी देशमुख, नयना महाडिक, अधिसभा सदस्य याकूब शेख यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी, संशोधक विद्यार्थी यांनी सहकार्य केले.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे विधी जर्नल प्रकाशित

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ विधी जर्नलच्या प्रथम आवृत्तीचे प्रकाशन माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या शुभहस्ते बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आले. जर्नल प्रकाशन शुभारंभाला कुलसचिव डॉ. राजू हिवसे, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विधी जर्नलच्या सल्लागार मंडळात जागतिक स्तरावरील कायदे तज्ज्ञांचा समावेश आहे. पहिल्या अंकात भारतातील प्रसिद्ध तज्ञांचे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. या जर्नलचा उद्देश युवा शास्त्रज्ञ आणि संशोधकांमध्ये आंतरशिस्तीय संवाद आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे आहे. ज्यामुळे कायदा आणि समाजावर प्रभाव टाकणाऱ्या विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी एक स्वतंत्र मंच तयार होईल. या जर्नलचे मुख्य संपादक डॉ. पायल ठावरे आहेत, तर व्यवस्थापक संपादक म्हणून डॉ. विजयता भलावे आणि डॉ. गिरीश कुलकर्णी काम पाहत आहेत. प्रकाशन सोहळ्यात संपादकीय टीमचे सदस्य अबिद खान, ऋचा कोचर, तारीक खान, झैनब फातिमा, आरती पाचखेड़े, जुही चौधरी आणि अन्नपूर्णा पारधी उपस्थित होते.

## प्लेसमेंट



## विद्यापीठात हेक्सावेअर टेक्नॉलॉजीचा प्लेसमेंट ड्राईव्ह

### विविध पदाकरिता विद्यार्थ्यांनी दिल्या मुलाखती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात हेक्सावेअर टेक्नॉलॉजीस लिमिटेड मिहान या कंपनीचा प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आला. महाराज बाग चौक स्थित विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात बुधवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये विविध पदांकरिता विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. विद्यापीठाचे माननीय कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मुलाखतीकरिता आलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

हेक्सावेअर टेक्नॉलॉजीस कंपनीकडून डाटा प्रोसेसिंग एक्झिक्यूटिव्ह या पदाकरिता ही निवड प्रक्रिया राबविली. याकरिता औषधी निर्माण शास्त्र पदविका तसेच पदवी धारण केलेले विद्यार्थी पात्र होते. अनुभवी तसेच नवीन विद्यार्थ्यांना मुलाखतीकरिता संधी देण्यात आली. या पदाकरिता एकूण २५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी बहुतांश विद्यार्थ्यांनी मुलाखतीला उपस्थिती दर्शविली. विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाकडून हा प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आला. यावेळी रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, हेक्सावेअर टेक्नॉलॉजीस कंपनीच्या टीम कोच तथा वरिष्ठ अधिकारी ऋतुजा पवार, सीनियर एक्झिक्यूटिव्ह निखिल यादव, तय्यबा खान, एक्झिक्यूटिव्ह राजप्रीत बगाडे यांच्यासह गुरुनानक कॉलेज ऑफ फार्मसीचे डॉ. शेखर वाईकर यांची उपस्थिती होती.




## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्लेसमेंट ड्राईव्ह

### दीक्षांत सभागृहात आयोजित मेळाव्यात ५ कंपन्यांचा समावेश

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाराज बाग स्थित छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात शुक्रवार, दि. २५ ऑक्टोबर २०२४ रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह पार पडला. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये एकूण पाच विविध कंपन्यांचा समावेश होता.

त्रिमूर्ती नगर येथील हुरा टेक्नॉलॉजी कंपनीकडून डिजिटल मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, कस्टमर ऑनबोर्डिंग एक्झिक्युटिव्ह व बिझनेस डेव्हलपमेंट असोसिएट्स या पदाकरिता मुलाखती घेतल्या. मानेवाडा येथील श्री शिवशक्ती एज्युकेशन सोसायटीच्या वतीने टेक सपोर्ट एक्झिक्यूटिव्ह या पदाकरिता मुलाखती घेण्यात आल्या. स्कॉलरट्युड वेब एज्युकेशन कंपनीच्या वतीने बिझनेस डेव्हलपमेंट असोसिएट या पदाकरिता मुलाखती घेण्यात आल्या. टेझ टेक सोल्युशन कंपनीच्या वतीने सॉफ्टवेअर डेव्हलपर, मोबाईल ॲप डेव्हलपर, डिजिटल मार्केटिंग एक्झिक्यूटिव्ह, ग्राफिक डिझायनर, ॲनिमेटर, व्हिडिओ एडिटर, ई-कॉमर्स एक्झिक्यूटिव्ह, एसइओ एक्झिक्यूटिव्ह तर जस्ट डायल कंपनीकडून देखील विविध पदांकरिता मुलाखती घेण्यात आल्या.

या प्लेसमेंट ड्राईव्ह करिता एकूण २५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. मुलाखत प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी ८० पेक्षा अधिक विद्यार्थी प्लेसमेंटस्थळी उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाचे ज्ञान स्त्रोत केंद्र संचालक तथा विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड मॅनेजमेंट कॉलेजच्या टीपीओ डॉ. मोनिका जैन, डॉ. पी. व्ही. तंबोली, पीडीआयएमटीआरच्या टीपीओ डॉ. कविता पाटील, प्रियदर्शनी महाविद्यालयाच्या टीपीओ स्नेहल तरोडे, युनिक कनेक्टचे फाउंडर श्री शुभम पाटील यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



### महापुरुषांचे जयंती महोत्सव

## जमनालाल बजाज भवन येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवन येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीदिनी आयोजित कार्यक्रमात माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार यांच्या शुभहस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सर्वश्री मनोज मोरे, कवडू भोयर, नरेंद्र पवार, आसिफ शेख यांच्यासह अन्य उपस्थित होते.





## विद्यापीठात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जयंती कार्यक्रम उत्साहात पार पडला. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात मंगळवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमात प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली आस्थापना विभागाचे उपकुलसचिव श्री संजय बाहेकर यांच्या शुभहस्ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार, अधीक्षक राकेश कोपुलवार, यूडीसी शैलेश राठोड, जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, सर्वश्री राधेलाल मिश्रा, मनोज मोरे, कवडू भोयर, आसिफ शेख, अनिल खरे, कार्तिक हरडे, प्रदीप झोडे, नरेंद्र पवार, विजय बिनकर, आनंद मेश्राम, आनंद घोंगडे यांच्यासह शिक्षक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात गुरुवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमात प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली आस्थापना विभागाचे उपकुलसचिव श्री संजय बाहेकर यांच्या शुभहस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार, यूडीसी शैलेश राठोड, जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर यांच्यासह सर्वश्री मनोज मोरे, कवडू भोयर, रुपेश आतराम, संदिप थापा, आसिफ शेख, अनिल खरे, कार्तिक हरडे, प्रदीप झोडे, नरेंद्र पवार, अतूल इरपाची शिक्षक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विद्यापीठ ज्ञान स्त्रोत केंद्रात वाचन प्रेरणा दिवस

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. व्हि. बी. उपाख्य भाऊसाहेब कोलते ज्ञान स्त्रोत केंद्रात माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून मंगळवार, दिनांक १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी साजरी करण्यात आली.

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे भारताचे माजी राष्ट्रपती तसेच लाखो लोकांसाठी प्रेरणादायी व्यक्तीमत्व होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांचा जन्मदिवस हा वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. ज्ञान स्त्रोत केंद्राने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यावर आधारित आणि त्यांचे लेखन असलेल्या पुस्तकांचे एक विशेष प्रदर्शन आयोजित केले. ज्ञान स्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला हारार्पण करून त्यांना आदरांजली अर्पण केली. राष्ट्रीय विकासासाठी केलेल्या त्यांच्या अमूल्य योगदानाबाबत त्यांनी श्रद्धांजली अर्पित केली. या प्रदर्शनात डॉ. कलाम यांच्या कार्यांचा समावेश असलेल्या समृद्ध संग्रहाचे प्रदर्शन करण्यात आले, ज्यात त्यांच्या प्रसिद्ध पुस्तकांचा समावेश होता. "विंग्ज ऑफ फायर" आणि "इग्नाइटेड माइंड्स," तसेच त्यांच्या जीवनावर आणि उपलब्धींवर आधारित अनेक चरित्रात्मक कार्येही प्रदर्शित करण्यात आली. या प्रसंगी डॉ. व्हि. बी. उपाख्य भाऊसाहेब कोलते ज्ञान स्त्रोत केंद्रातील कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रीय एकता दिवस शपथ कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात माजी प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी राष्ट्रीय संकल्प दिवस तर सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस कार्यक्रम गुरुवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता पार पडला.

जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात झालेल्या कार्यक्रमात माननीय कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या हस्ते माजी प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करण्यात आले. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ दिली. याप्रसंगी राष्ट्रीय एकता दिवसाच्या शपथेचे सामूहिक वाचन करण्यात आले. वरील कार्यक्रमाला विविध प्राधिकारणींचे सदस्य, सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, विविध शैक्षणिक विभागांचे प्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## कर्तव्यपूर्ती






## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कर्तव्यपूर्ती सोहळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा कर्तव्यपूर्ती सोहळा गुरुवार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडला. माननीय प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांच्या अध्यक्षतेखाली जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात झालेल्या कार्यक्रमात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल यांची उपस्थिती होती. माननीय प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल यांच्या शुभहस्ते ३० सप्टेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झालेल्या पुनर्मूल्यांकन विभागातील निम्न श्रेणी लिपिक श्रीमती माया सोमेश्वर गोस्वामी, सामान्य परीक्षा विभागातील चपरासी श्री संजय उत्तमराव घारडे, विद्यापीठ विकास विभागातील चपरासी मोहन दयाराम कार्लेकर तर ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झालेले प्र-कुलगुरू कार्यालयातील वरिष्ठ लघुलेखक श्रीमती प्रतिमा दिलीपकुमार पंडा, बॅरि. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालयातील निवड श्रेणी लिपिक श्री विजय महादेवराव शिरभाते, विद्यापीठ आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळा परिचर श्री प्रकाश शंकरराव घोषीकर, शिष्यवृत्ती कक्षातील चपराशी श्री अशोक चंपतराव तिरमारे आणि सेवा संपुष्ट आल्याने अभियांत्रिकी विभागातील एकत्रित वैतनिक नंदलाल संगुलाल डोंगरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील एकत्रित वैतनिक शोभा मधुकर कडू यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुढील आयुष्याकरिता तसेच दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन श्री दीपक घोडमारे यांनी केले तर उपस्थित यांचे आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला विविध प्राधिकारणींचे सदस्य, सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, विविध शैक्षणिक विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# क्रीडा व सांस्कृतिक



## विद्यापीठाचा पुरुष कबड्डी संघ घोषित

### झुंझुनू येथील पश्चिम क्षेत्रिय आंतरविद्यापीठ स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पुरुष कबड्डी संघ घोषित करण्यात आला आहे. झुंझुनू येथील श्री जगदीशप्रसाद छाबरमल तिब्रेवाला विद्यापीठात आयोजित पश्चिम क्षेत्रिय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विद्यापीठाचा संघ सहभागी होणार आहे. श्री जगदीशप्रसाद छाबरमल तिब्रेवाला विद्यापीठात ही स्पर्धा शनिवार, दिनांक १९ ऑक्टोबर ते गुरुवार, दिनांक २४ ऑक्टोंबर २०२४ दरम्यान होणार आहे.

पुरुष कबड्डी संघामध्ये वंश मुदलियार, संकेत शेंडे, गणेश गायधने, आदित्य पांगूळ, तेजस सुर्यवंशी, रितिक सावरकर, संकेत आदमाने, पार्थ नागरे, प्रज्वल कंगाळे, एन. चिन्नम नायडू, सुधांशू चौधरी, महेश ढोले यांचा समावेश आहे. विद्यापीठाचे प्रशिक्षक म्हणून डॉ. भरत मेहता, संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. नितीन गुल्हाणे काम बघणार आहे. आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. विशाखा जोशी, विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ. संजय चौधरी आणि प्रा. मनोज अंबाडकर यांनी संघाला शुभेच्छा दिल्या आहेत.

## महिला व्हॉलीबॉल स्पर्धेत जीएस कॉलेज वर्धा विजयी

### आंतर महाविद्यालयीन महिला व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिलांच्या आंतर महाविद्यालयीन वॉलीबॉल स्पर्धा शासकीय विज्ञान संस्था नागपूर येथे पार पडल्या. या स्पर्धांमध्ये अंतिम सामन्यात जीएस कॉलेज वर्धा संघाने रामदेवबाबा संघाचा २५-१९ व २५-१२ असा पराभव केला.



जीएस कॉलेज वर्धा कडून श्रुती डुमणे, कांचन रहागाटे, दीक्षा भोंगाडे यांचा खेळ उत्कृष्ट झाला तर रामदेवबाबा कॉलेजकडून श्रुती व माहीने उत्कृष्ट कामगिरी केली. अंतिम सामन्याला प्रमुख पाहुणे म्हणून एसीपी शालिनी शर्मा व ॲड. भाग्यश्री चावजी या दोन्ही वॉलीबॉलच्या राष्ट्रीय खेळाडू उपस्थित होत्या. शासकीय विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे, विद्यापीठाच्या पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. तृतीय स्थान केडीके महाविद्यालय नागपूर यांनी पटकावले तर हरिभाऊ आदमने कॉलेज सावनेर यांना चतुर्थ स्थान प्राप्त झाले. रसिका व पूर्वा यांनी केडीके कॉलेजमधून उत्कृष्ट खेळल्या तर हरिभवत बने कॉलेजमधून सुहानी व मीनल यांचा खेळ उत्कृष्ट झाला. स्पर्धा यशस्वी करण्याकरिता डॉ. सुनील कापगते, वृषाली देशमुख, लॉर्डन टू नाईट शुभम सैनी, रोशनी खोब्रागडे, रजनी मुरकुटे यांनी





# सौरव तिवारी, तेजस्विनी लामकाने 'अव्वल'

## आंतर महाविद्यालय क्रॉस कंट्री स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा रविवार, दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रोजी रवी नगर स्थित सिंथेटिक ट्रॅकवर पार पडली. क्रॉस कंट्री स्पर्धेत एस. बी. सिटी महाविद्यालयाचा विद्यार्थी सौरव तिवारी आणि विद्यापीठाच्या पदव्युत्तर शारीरिक 'अव्वल' ठरले.

अमरावती मार्गावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर प्रारंभ व सिंथेटिक ट्रॅकवर समाप्त पुरुषांची १० किलोमीटर स्पर्धा सौरवने ३१ मिनिटे २६.४२ सेकंदांत पूर्ण करीत विजेतेपद पटकाविले. गौरव खोडकर दुसऱ्या आणि रितिक पंचबुद्धे तिसऱ्या स्थानी राहिले. महिलांची १० किलोमीटरची स्पर्धा सुरुवातीपासून आघाडी घेणाऱ्या तेजस्विनीने ३५ मिनिटे ५८.०३ सेकंदांत पूर्ण करीत विजेती ठरली. आरती भगत ही दुसऱ्या आणि मिताली भोयर ही तिसऱ्या स्थानी राहिली. पुरुष गटात भारसिंगी येथील अरविंदबाबू देशमुख महाविद्यालयाने लागोपाठ चौथ्या वर्षी सांघिक विजेतेपद पटकाविले.

याप्रसंगी राज्यपाल नामीत विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, अधिसभा सदस्य श्री दिनेश शेराम, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, डॉ. नितीन जंगीतवार, डॉ. विजय दातारकर व पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर यांची उपस्थिती होती. स्पर्धेला व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड यांनी हिरवी झेंडी दाखविली. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड व अधिसभा सदस्य श्री दिनेश शेराम यांनी क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंचे मनोबल वाढवत त्यांना शुभेच्छा दिल्या. पुरुष व महिला गटात पहिल्या तीन स्थानांवरील धावपटूंना व विजेत्या संघाला व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड व अधिसभा सदस्य श्री दिनेश शेराम यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. संचालन डॉ. आदित्य सोनी यांनी केले.

## निकाल

### (सहा स्थानावरील) पुरुष (१० किलोमीटर :

सौरव तिवारी (एस.बी. सिटी कॉलेज-३१ मि. २६.४२ से.), गौरव खोडतकर (आर्ट, कॉमर्स नाइट कॉलेज-३१ मि. ४३.२२ से.), रितिक पंचबुद्धे (आयडीसीपीई-३१ मि. ५९.५९ से.), समीत टोंग (एस.बी. सिटी कॉलेज-३२ मि. ३८.१३ से.), मनीष पाठे (एडी कॉलेज भारसिंगी ३२ मि. ४८.५३ से.), प्रणय माहुर्ले (आर्ट, कॉमर्स नाइट कॉलेज -३२ मि. ५३.६६ से.).

### महिला (१० किलोमीटर) :

तेजस्विनी लामकाने (पीजीटीडी- ३५ मि. ५८.०३ से.), आरती भगत (सी.जे. पटेल कॉलेज तिरोडा-३९ मि. ०५.३० से.), मिताली भोयर (चक्रपाणी कॉलेज-४० मि. ०८.१४ से.), सरस्वती सिंग (जेसीपीई-४० मि. ३४.२८ से.), शालू (साकेत शा.शि. कॉलेज गोंदिया-४२ मि. ०४.९३ से.), चैताली बोरेकर (चक्रपाणी कॉलेज-४२ मि. ५५.४३ से.)

## विद्यापीठाच्या महिला कबड्डी संघाची घोषणा

### पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला कबड्डी संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी केली आहे. महिला कबड्डी संघ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे आयोजित पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहे. संघामध्ये एसएसएनजे देवळी येथील क्षितिजा साखरकर, साक्षी त्रिवेदी, हर्षिता निलेकर व ऋतुजा वावगे, जेसीपीई नागपूर येथील प्रांजल, विधी जोत्स्ना, प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील श्वेता रत्नपारखी, एचए आदमने महाविद्यालय सावनेर येथील संतोष, कला महाविद्यालय सिओरा येथील मंगला ढबाले, एसबीसीटी नागपूर येथील झरना आगाशे व अजित वाडेकर नागपूर येथील शशी यांचा संघात समावेश आहे. यावेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य डॉ. नितीन जांगिटवार, निवड समितीचे अध्यक्ष डॉ. आदित्य सोनी, प्रशिक्षक प्रा. मनोज अंबाडकर, व्यवस्थापक डॉ. धनराज मुंगल यांची उपस्थिती होती. निवड झालेल्या संघाला विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सर्व सदस्य यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाला विजेतेपद

### आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग पुरुष व महिला स्पर्धा




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेचे दि. २४ ते २६ ऑक्टोबर २०२४ रोजी सी. पी. अँड बेरार महाविद्यालयाच्या नवनिर्मित बॉक्सिंग रिंगवर रेशीमबाग क्रीडांगणावर यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. या बॉक्सिंग स्पर्धेत ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपट पटकावले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग पुरुष व महिला स्पर्धेचे उद्घाटन सी.पी. अँड बेरार कॉलेज, रेशीमबाग मैदान येथे झाले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी सी.पी. अँड बेरार शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अॅड. अशोकराव बनसोड, प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण संस्थेचे श्री विजयराव बनसोड, विशेष अतिथी चीटनवीसपुरा को-ऑ. बँकेचे अध्यक्ष अजय लांबट, संचालक श्री उल्हास दुरुगकर, श्री गणेश पुरोहित, नागपूर महानगर पालिका बॉक्सिंग संघटना सचिव श्री अरुण भुते, नागपूर बॉक्सिंग संघटना सचिव श्री पोरूस कोतवाल, तर सी.पी. अँड बेरार कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरविंद जोशी, उपप्राचार्य डॉ. जे. के. महाजन, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. निशांत तिपटे उपस्थित होते. संचालन डॉ. प्रज्ञा निनावे यांनी केले.

### विजेत्या खेळाडूचे नावे खालील प्रमाणे

**मुली :-** वजन गट (४५-४८) संध्या सर्नागत, पोरवाल महाविद्यालय (५०-५२) वंशिका, जोतीबा महाविद्यालय (५२-५४) अंजली पिलवार, हिस्लॉप महाविद्यालय (५४-५७) हेमंती भुजाडे, ईश्वर देशमुख महाविद्यालय. (५७-६०) श्रुती झाडे, सी पी & बेरार महाविद्यालय.(६०-६३) तनिशा, राणी अग्निहोत्री महाविद्यालय. (६३-६६) युक्तिका गोतेफोडे, एस.एन मोर तुमसर. (६६-७०) मानसी निमजे, साब्या महाविद्यालय. (७०-७५) वैदही डिबे, मोहता विज्ञान महाविद्यालय. (७५-८१) शिबा दांडेकर, एस.एन मोर, तुमसर (८१ +) यशश्री शाखरे ईश्वर देशमुख महाविद्यालय. Best Boxer श्रुती झाडे, Best Challenger सायो मारुफी ईश्वर देशमुख महाविद्यालय

**मुले :-** (४६ -४८) सिद्धांत मोरे, संत गाडगेबाबा महाविद्यालय भुसावळ. (४८-५१) तेजस गोडसे जे. ए. ती, (५१-५४) तुषार भोयर, एस. बी. सिटी महाविद्यालय. (५४-५७) विशाल, जोतीबा महाविद्यालय (५७-६०) एकनाथ वरखाडे, एस.एन मोर, तुमसर (६०-६३.५ ) अश्मित नेगी, जोतीबा महाविद्यालय (६३.५-६७) राजेश तरारे बा. वानखेडे, (६७-७१) सूर्यदेव, जोतीबा महाविद्यालय. (७१-७५) करण, जोतीबा महाविद्यालय (७५-८०) सोनू त्यागी, जोतीबा महाविद्यालय.(८०-८६) तुषार ठकरान, वैनगंगा महाविद्यालय, साकोली. (८६-९२) राजेश, एम. जे. एफ उमरेड (९२+) जय तुशीर जोतीबा महाविद्यालय. Best Boxer तेजस गोंडसे, Best Challenger लकी श्रीवास्तव, चक्रपाणी महाविद्यालय.



## विद्यापीठाचा महिला कबड्डी संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र

### पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ स्पर्धेत पटकावला तृतीय क्रमांक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा महिला कबड्डी संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे पार पडलेल्या पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला आहे.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या कबड्डी संघामध्ये देवळी येथील क्षितिजा साखरकर, साक्षी त्रिवेदी, हर्षिता निलेकर व ऋतुजा वावगे, जेसीपीई नागपूर येथील प्रांजल, विधी जोत्स्ना, प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील श्वेता रत्नपारखी, एचए आदमने महाविद्यालय सावनेर येथील संतोष, कला महाविद्यालय सिओरा येथील मंगला ढबाले, एसबीसीटी नागपूर येथील झरना आगाशे व अजित वाडेकर नागपूर येथील शशी यांचा संघात समावेश आहे. विद्यापीठाच्या संघाने पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ स्पर्धेत पहिल्या सामन्यापासूनच पकड मजबूत ठेवली. पहिल्या सामन्यात गुजरात राज्यातील वल्लभ विद्यानगर येथील सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठाचा ५३-१४ असा मोठ्या फरकाने पराभव केला. दुसऱ्या सामन्यात इंदोर येथल देवी अहिल्या विद्यापीठाचा ४३-३२ असा पराभव केला. तिसऱ्या सामन्यात पाटण येथील उत्तर गुजरात विद्यापीठाचा ४३-१६ फरकाने, चौथ्या सामन्यात बिकानेर येथील महाराजा गंगासिंह विद्यापीठाचा ४१-२२ असा तर पाचव्या सामन्यात मुंबई विद्यापीठाचा २४-२३ असा पराभव करीत अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी आपले स्थान पक्के केले. पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये संघातील प्रांजल, साक्षी त्रिवेदी, श्वेता रत्नपारखी, क्षितिजा साखरकर, ऋतुजा वावगे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. अंतिम सामन्यात नांदेड संघाला ४३-२२ असे नमवत स्पर्धेत तृतीय स्थान प्राप्त केले. प्रशिक्षक म्हणून प्रा. मनोज अंबाडकर, व्यवस्थापक म्हणून डॉ. धनराज मुंगल यांनी जबाबदारी पार पाडली. विजयी संघाला विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. विशाखा जोशी, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, डॉ. नितीन जांगिटवार, निवड समितीचे अध्यक्ष डॉ. आदित्य सोनी तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सर्व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## विद्यापीठाचा हॉलीबॉल महिला संघ घोषित

### हनुमानगड येथील पश्चिम क्षेत्रीय स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हॉलीबॉल महिला संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी केली आहे. हनुमानगड येथील श्री खुशाल दास विद्यापीठ येथे २७ ते ३० ऑक्टोबर २०२४ दरम्यान आयोजित पश्चिम क्षेत्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत ही चमू सहभागी होणार आहे.

विद्यापीठ व्हॉलीबॉल संघामध्ये जीएच रायसोनी विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नागपूरची खेळाडू लक्ष्मी घुगुस्कर, वर्धा येथील जीएस वाणिज्य महाविद्यालयाची कांचन रघाटाटे, केडीके अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूरची आकांक्षा फरकाडे, अनिरुद्ध देशमुख महाविद्यालय भारसिंगी येथील अहिंसा सोमकुंवर, एलएडी महिला महाविद्यालयाची सुरभी पाठक, रामदेवबाबा अभियांत्रिकी महाविद्यालयाची माही तिवारी, देवळी येथील ज्ञानभारती महाविद्यालयाची भूमी रिठे, नबीरा महाविद्यालय काटोल येथील देव्यांनी वाळके, तुळशीराम गायकवाड अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रियंका बगेकर, सावनेर येथील डॉ. हरिभाऊ आदमने महाविद्यालयाची कशिश बागडे, कमला नेहरू महाविद्यालय नागपूर येथील भूमी कुर्जेकर तर वसंतराव नाईक शासकीय कला व सामाजिक ज्ञान विज्ञान संस्था नागपूर येथील प्रिया डोंगरे यांचा समावेश आहे. राखीव खेळाडूंमध्ये प्राची धोटे, प्रिया मेश्राम, ज्योती लोखंडे, उन्नती बागडे, रितीशा धांडे, तन्वी गोतमारे, सुहानी बिरबल, प्रेरणा मेंढेकर, देलिमा प्रसाद, जाई भोयर, माधुरी अंबादे, मानसी लाडे यांचा समावेश आहे. विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी निवड झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

# विद्यापीठाच्या हॉकी (महिला व पुरुष) संघाची घोषणा

## जयपूर येथील पश्चिम क्षेत्रीय स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हॉकी (महिला व पुरुष) संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी केली आहे. जयपूर येथील सुरेश ज्ञान विहार विद्यापीठात ८ ते ११ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित पश्चिम क्षेत्रीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत विद्यापीठाचे दोन्ही संघ सहभागी होणार आहे. निवड झालेल्या दोन्ही संघातील खेळाडूंना विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सर्व सदस्य यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**पुरुष संघ** : जवाहरनगर कला व वाणिज्य महाविद्यालयातील आयुष बांते, तुषार गायधने, तन्मय चाटोडे, अभिषेक विठोले व रोहन कानतोडे, नागपूर शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथील गोपाल कृष्णन, अंकित कुमार सिंह, रौणक चौधरी व अमित चौधरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मधील हर्षल पोटफोडे, ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील भानू व रवी, ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील सुरेश कुमार यादव, मनाफ खान व महेश मांडवे, एम. तिडके स्मृती शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील महावीर मंडा, राणीबाई अग्निहोत्री महाविद्यालय वर्धा येथील आदित्य प्रताप सिंह, जे. एम. पटेल महाविद्यालय भंडारा येथील रुपेश बांगडे तर राखीव खेळाडूंमध्ये हिस्लॉप महाविद्यालय नागपूर येथील शुभम तिवारी, विद्यापीठ पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागातील पियुष खोडे, प्राचार्य अरुणराव कलोडे महाविद्यालय नागपूर येथील नीरज द्विवेदी, नागपूर शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथील अमितेश देवेडी, ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील रितेश व जवाहरनगर कला व वाणिज्य महाविद्यालयातील ओमकार बांते यांचा समावेश आहे.

**महिला संघ** : ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील वंदना टिंम्मा, सोनाली शर्मा, प्रियंका दास, शशिता बेंग्रा, मनीषा झाल्झ व, रुबी अँधोत्रा, डॉ. बाबासाहेब इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर येथील शर्वरी कुंभारे व तनिषा सेंगर, धरमपेठ एम. पी. देव विज्ञान महाविद्यालयातील जागृती फुलवालकर, जे. एम. पटेल महाविद्यालय भंडारा येथील रुचिका हटवार व काजल मते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय नागपूर येथील जागतिका बोडके, जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ सीएसटी नागपूर येथील ओषण बनसोड, राजकुमार केवलरामानी महाविद्यालय नागपूर येथील रोशनी हरीरामानी व लक्ष्मी पासवान, धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर येथील ईशा चौधरी व सृष्टी निघोट, महिला महाविद्यालय नागपूर येथील प्रियंका पानतावणे तर राखीव खेळाडूंमध्ये धनवटे नॅशनल कॉलेज येथील भूमिका बिरहा, प्रियदर्शनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथील क्षितिजा वारडीलवार, राजकुमार केवलरामानी महाविद्यालयातील पूजा नेवारे व कृतिका पटेल यांचा समावेश आहे.

# विद्यापीठाचा फेन्सिंग (महिला व पुरुष) संघ घोषित

## जम्मू येथील अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या फेन्सिंग (महिला व पुरुष) संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी केली आहे. जम्मू येथील जम्मू विद्यापीठात ६ ते १० नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित अखिल भारतीय फेन्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत विद्यापीठाचा संघ सहभागी होणार आहे.

**महिला संघ** – आरएस मुंडले महाविद्यालयातील हर्षदा दमकोंडवार, जेएम पटेल महाविद्यालय भंडारा येथील मंजिरी तांबे, नंदिनी राहाकडे, भिवापूर महाविद्यालयातील हिमानी घोडमारे, निलोफर पठाण व तनु डोमधरे, नाशिकराव इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर येथील सई राजपूत, एसपी कॉलेज गोंदिया येथील मेघा गिरडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय नागपूर येथील श्रुती जोशी, जीएस महाविद्यालय नागपूर येथील वेदिका कुंभलकर, रामदेवबाबा अभियांत्रिकी महाविद्यालयातील दिशा शर्मा, ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथील सोनाली तर राखीव खेळाडूंमध्ये एलईडी महिला महाविद्यालयाची अंजुम शेख, अंजुमन अभियांत्रिकी महाविद्यालयाची इलहन अख्तर, प्रियदर्शनी महिला महाविद्यालय वर्धा येथील साक्षी बोरसरे व अंजुमन महिला महाविद्यालयातील इसरत पठाण यांचा समावेश आहे.

**पुरुष संघ** – जेएम पटेल महाविद्यालय भंडारा येथील जय भोयर, तन्मय लांजेवार व रोहित वाकेकर, भिवापूर महाविद्यालयातील भूषण नागोसे, चेतन वाकेकर व प्रीतम हलदर, बॅरि. शेषराव वानखेडे शिक्षण महाविद्यालयातील जीवनदीप क्षीरसागर, प्रियदर्शिनी महाविद्यालयातील पंकज चन्नोर, इंदुताई मेमोरियल कॉलेज पिईडी नागपूर येथील आयुष साहू, केआयटीएस कॉलेज रामटेक येथील तेजस कुरंजेकर, रामकृष्ण वाघ महाविद्यालय बोखारा येथील पारस मांडवकर, महात्मा गांधी कॉलेज पाठशिवणी येथील मयूर निमजे यांचा तर राखीव खेळाडूंमध्ये जेएम पटेल कॉलेज भंडारा येथील प्रणय मुळे, भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथील निखिल कोहाड, जीएस कॉलेज वर्धा येथील विष्णू वाडे तर अंजुमन अभियांत्रिकी महाविद्यालयातील काझी मोहम्मद अकताब जफर यांचा समावेश आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पुरुष बॅडमिंटन संघ घोषित

### भोपाल येथील पश्चिम क्षेत्रीय स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पुरुष बॅडमिंटन संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी केली. पुरुष बॅटमिंटन संघ भोपाळ येथील संजीव अग्रवाल ग्लोबल एज्युकेशन युनिव्हर्सिटी येथे १२ ते १६ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित पश्चिम क्षेत्रिय स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहे.

बॅडमिंटन पुरुष संघामध्ये हिस्लॉप महाविद्यालयातील ओजस गेडाम, जीवा पिल्लई, चुनेरमित सिंग सोखी, अनिमेष घाटे व अमय माकोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील शशांक कुलल आणि धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर येथील रोहन सिंग यांचा तर राखीव खेळाडूंमध्ये वायसीसी अभियांत्रिकी महाविद्यालयातील सन्विक चौधरी, ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथील अनुप कडवे, जीएच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर येथील सारंग वाळके व हिस्लॉप महाविद्यालयातील रोहित देशपांडे यांचा समावेश आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या टेनिस (महिला व पुरुष) संघाची घोषणा

### पाटण येथील उत्तर गुजरात विद्यापीठ येथील पश्चिम क्षेत्रिय स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या टेनिस (महिला व पुरुष) संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी केली. विद्यापीठाचा महिला संघ गुजरात राज्यातील पाटण येथील हेमचंद्राचार्य उत्तर गुजरात विद्यापीठ येथे २५ ते २७ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणार आहे. तर पुरुषांचा संघ ग्वालियर येथील आयटीएम विद्यापीठात ७ ते ११ नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित स्पर्धेत सहभागी होणार आहे. निवड झालेल्या संघाला प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**महिला संघ :** स्व. बी. एन. शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूरची भूमिका दहिया, तायवाडे महाविद्यालय कोराडी येथील कल्याणी सोमेवार, रामदेव बाबा अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर येथील राधा गिरडकर व मृण्मयी कुऱ्हाडे तर राखीव खेळाडू म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय नागपूर येथील आस्था कुमार यांचा समावेश आहे.

**पुरुष संघ :** धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर येथील राज बागडी, डॉ. एम. वासनिक पीडब्ल्यूएस महाविद्यालय नागपूर येथील हर्षल पाटील, गुरु नानक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी नागपूर येथील तेजस पाल, तिरपुडे महाविद्यालय येथील तरुण फुले, रामदेव बाबा अभियांत्रिकी महाविद्यालय येथील आनंद मराठे तर राखीव खेळाडू म्हणून इंदिरा गांधी महाविद्यालयातील मनीष बिंझाडे यांचा समावेश आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा बास्केटबॉल पुरुष संघ घोषित

### ग्वालियर येथील आयटीएम विद्यापीठात आयोजित पश्चिम क्षेत्रिय स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पुरुष बास्केटबॉल संघ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी घोषित केला. ग्वालियर येथील आयटीएम विद्यापीठात १५ ते २० नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ स्पर्धेत संघ सहभागी होणार आहे.

संघामध्ये धनवटे नॅशनल कॉलेज येथील सिद्धेश कुलकर्णी, हिमांशू शेंडे, शुभम राऊत, इलाईट कॉलेज सावनेर येथील राजेश्वर परदेशी, पियुष पिढेकर, जी. एच. अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर येथील तारण कक्कड, सिद्धेश बुराडे, हिस्लॉप महाविद्यालयातील प्रथम गुप्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय नागपूर येथील सार्थक धुलधुळे, ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील तन्मय चौधरी, नागपूर शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथील शाम खेडेकर, रामदेव बाबा अभियांत्रिकी महाविद्यालयातील पार्थ बोरकुटे तर राखीव खेळाडूंमध्ये जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील वल्लभ त्रिवेदी, हिस्लॉप महाविद्यालयातील रवी चौधरी, यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालयातील वंशवर्धन सोरटे, सेंट वीसेंट अभियांत्रिकी महाविद्यालय परीक्षीत दातीर, धनवटे नॅशनल कॉलेजचा सारंग उमाटे तर कला व वाणिज्य विज्ञान महाविद्यालय वर्धा येथील आदर्श मोहर्ले यांचा समावेश आहे.





# विद्यापीठाच्या पुरुष कराटे संघाची घोषणा

## भोपाळ येथील विद्यापीठात आयोजित दक्षिण पश्चिम क्षेत्रिय स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष कराटे संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी यांनी केली आहे. विद्यापीठाचा कराटे संघ भोपाळ येथील एलएनसीटी विद्यापीठात १६ ते २० नोव्हेंबर २०२४ दरम्यान आयोजित दक्षिण-पश्चिम क्षेत्रिय कराटे पुरुष स्पर्धेत सहभागी होणार आहे. निवड झालेल्या संघाला माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### कराटे (पुरुष) वैयक्तिक कुमिते

या प्रकारात रामकृष्ण वाघ महाविद्यालय बोखारा येथील आर्यन खोब्रागडे (५० किलो वजन गट), चिंतामणी शारीरिक शिक्षण महाविद्यालय वर्धा येथील वैभव साखरकर (५५ किलो वजन गट), यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूरचा आर्यन गायधने (६० किलो वजन गट), श्री माथूरदास मोहता विज्ञान महाविद्यालय नागपूरचा मोहनीश बोरकर (६७ किलो वजन गट), धनवटे नॅशनल कॉलेजचा ऋतिक मुदलीयार (७५ किलो वजन गट), नागपूर शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथील मृत्यूंजयसिंग एन. खांडीय (८४ किलो वजन गट), जी. एच. अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर येथील मानव इंगळे (८४ किलो पेक्षा जास्त वजन गट) तर राखीव खेळाडूंमध्ये ओसिस महाविद्यालय बेला भंडारा येथील बादल धांडे (५० किलो वजन गट), प्रेरणा महाविद्यालय नागपूर येथील सौम्य रेवते (५५ किलो वजन गट), सिटी प्रीमियर महाविद्यालयाचा साहिलसिंग पवार (६० किलो वजन गट), के. डी. पवार शारीरिक शिक्षण महाविद्यालय सावनेर येथील दर्शन लोणारे (६७ किलो वजन गट),तुळशीराम गायकवाड शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथील प्रसन्न पुस्बी (७५ किलो वजन गट), डी. आर. बी. सिंधू महाविद्यालय नागपूर येथील लोकेश विश्वकाशी यांचा समावेश आहे.

### कराटे पुरुष संघ कुमिते

साकेत शारीरिक शिक्षण महाविद्यालय गोंदिया येथील हर्ष, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील तन्मय मेटांगळे, श्री क्रिनदास महाविद्यालय वर्धा येथील सुजल रंगारी, जीएचआरसीईई नागपूर येथील ओम पेशाने, जे. व्ही. एम. देवग्राम येथील अविनाश मानेकर, के. आर. पांडव महाविद्यालय नागपूर येथील अमीर मलधारी, सिटी प्रीमियर कॉलेज नागपूर येथील साहिलसिंग पवार तर राखीव खेळाडू म्हणून प्रेरणा महाविद्यालय नागपूर येथील भूमन रेवते, झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी नागपूर येथील तेजस गोंडसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय येथील मीत मिश्रा, के. आर. पांडव महाविद्यालय नागपूर येथील अमीर मलधारी, के. डी. पवार शारीरिक शिक्षण महाविद्यालय सावनेर येथील दर्शन लोणारे, जी.एस. वाणिज्य महाविद्यालय नागपूर येथील अनिरुद्ध मोरे व विपुल पटेल यांचा समावेश आहे.

### पुरुष काता वैयक्तिक

जी.एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर येथील मानस राऊत तर राखीव मध्ये ज्योतिबा फुले शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथील भूषण भक्ते, संताजी महाविद्यालय नागपूर येथील उदय लेंडे व जवाहरलाल नेहरू महाविद्यालय वाडी येथील प्रांजल मांडवगडे यांचा समावेश आहे.

### पुरुष संघ (काता)

झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी नागपूर येथील मनीष नार्वेकर, जी.एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर येथील मानस राऊत व कौस्तुभ बिसने तर आरक्षित खेळाडू म्हणून रामकृष्ण वाघ महाविद्यालय बोखरा येथील आर्यन खोब्रागडे यांचा समावेश आहे.



# सांस्कृतिक स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांची निवड

## आंतर विद्यापीठ सांस्कृतिक स्पर्धांमध्ये होणार सहभागी

आंतर विद्यापीठ सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या चमूचे गठन करण्यात आले आहे. दीक्षांत सभागृह येथे १९ ते २१ सप्टेंबर २०२४ या कालावधीत घेण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणीतून या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

संगीत, नृत्य, नाटक, साहित्यिक आणि ललित कला अशा ५ विभागातून २६ कला प्रकाराकरिता विद्यार्थ्यांची निवड चाचणी मधून करण्यात आली आहे. यामध्ये क्लासिकल व्होकल सोलो प्रकारात आर.एस. मुंडले महाविद्यालयाची राधा ठेंगडी, सेमीक्लासिकल सोलो प्रकारात वसंतराव नाईक शासकीय समाज विज्ञान संस्था येथील तेजस्विनी खोडतकर, क्लासिकल इन्स्ट्रुमेंटल पर्स्युसन प्रकारात वसंतराव नाईक शासकीय समाज विज्ञान संस्था येथील सुयोग देवळकर, क्लासिकल इन्स्ट्रुमेंटल नॉनपर्स्युसन प्रकारात हिस्लॉप कॉलेजची निधी भालेराव, लाईट व्होकल सोलो प्रकारात एलईडी महाविद्यालयाची आयुशी देशमुख तर ग्रुप सॉंग इंडियन प्रकारात राधा ठेंगडी, तेजस्विनी खोडतकर, आयुषी देशमुख, इंद्रायणी इंदुरकर, निधी रानडे, निधी इंगोले, सुयोग देवळकर, निधी भालेराव यांची निवड करण्यात आली आहे.

वेस्टन व्होकल सोलो प्रकारात सेंट व्हिन्सेंट पलोटी कॉलेजचा क्षितिज मेश्राम, वेस्टन इन्स्ट्रुमेंटल सोलो प्रकारात हिस्लॉप कॉलेजचा जोश लाल, फोक आर्केस्ट्रा प्रकारात वसंतराव नाईक शासकीय समाज विज्ञान संस्था येथील सुयोग देऊळकर व समीक्षा परचाके, हिस्लॉप कॉलेजची निधी भालेराव, श्री रामदेव बाबा कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचा याद्दिक भंगाळे, सिटी प्रीमियर कॉलेजचा मधुर बक्षी, ग्रुप सॉंग वेस्टन या प्रकारात सेंट व्हिन्सेंट पलोटी कॉलेजचा क्षितिज मेश्राम, श्री रामदेव बाबा कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे आदी रिंगे व अनुज गुप्ता, हिस्लॉप कॉलेजचे अमांडा सायमन्स, अक्सा बेंजामिन व जोश लाल, वसंतराव नाईक शासकीय समाज विज्ञान संस्थेची धनश्री यांचा समावेश आहे. क्लासिकल डान्स प्रकारात हिस्लॉप कॉलेजची कल्याणी चिकुलवार तिची निवड करण्यात आली आहे.

थिएटर कला प्रकारात व्हिएमव्ही कॉलेजचा शशांक रहांगडाले व युगलहंस मकराम, हिस्लॉप कॉलेजचा मोहित सरकार, चिराग शुक्ला व शिफा अन्सारी, विद्यापीठाच्या ललित कला विभागातील निधी नहाटे, जी. एस. कॉलेजची तानिया पंडित यांचा समावेश आहे. मिमिक्री कला प्रकारात हिस्लॉप कॉलेजचा ब्रायन डोंगरदिवे, डिबेट प्रकारात हिस्लॉप कॉलेजची मेहंदी शेख व विद्यापीठाच्या हिंदी विभागातील विशाल खर्चवाल यांची निवड करण्यात आली आहे. विज प्रकारात जीएस महाविद्यालयातील प्रथमेश लांजेवार, हिस्लॉप कॉलेजची अनुष्का नाग तर जी. एच. रायसोनी कॉलेजचा राहुल नायर यांची निवड करण्यात आली आहे. स्पॉट पेंटिंग प्रकारात शासकीय कला महाविद्यालयातील यश वानखेडे, पोस्टर मेकिंग प्रकारात रणजीत वानखेडे, कोलाज प्रकारात मृणाली कांबळे, कार्टूनिंग प्रकारात हर्षद लिखार, क्ले मॉडलिंग प्रकारात अपूर्वा ताकसांडे, रांगोळी प्रकारात सायली गडकरी, स्पॉट फोटोग्राफी प्रकारात प्रणय नेताम तर मेहंदी प्रकारात प्रियदर्शनी जेल कॉलेज ऑफ फार्मसीची विद्यार्थिनी गणेश्वरी निर्मळकर हिची निवड करण्यात आली, अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी दिली आहे.



TheHitavada
Nagpur City Line | 2024-10-01 | Page- 5
ehitavada.com

## 'People for whom Democracy was established are being ignored'

■ Staff Reporter



Dr Smita Acharya felicitating Justice R C Chavhan (Retd) in presence of Dr Payal Thaware and Ravindra Thakre.

"THE people, for whom the Democracy was established, are being ignored today," said Justice R C Chavhan (Retd), former judge of Bombay high court while delivering 'Mother Teresa lecture' on the topic 'Democracy and affirmative action' at Ramanujan auditorium, Jotiba Fule academic premises, Amravati Road.

The programme was presided over by Dr Smita Acharya, Director, Internal Quality Assurance Cell (IQAC). Ravindra Thakre, Additional tribal commissioner; and Dr Payal Thaware, Head, Post-graduate Law department were also present for the programme.

Justice Chavhan, in his address, ellaborated the history of discrimination in India, its types and current situation. He said, "Democracy was established in India 76 years ago. Before that British ruled for about 150 years. Kings were ruling different parts of India before the British. The social devide that existed that time exists even today."

He also expressed surprise over presence of only one justice in Supreme Court from Scheduled Caste community. Justice Chavhan also spoke about relevance of reservation.

Ravindra Thakre informed about various schemes run by Government for development of tribal community. He emphasised the importamce of active participation by society is vital along with the administration for development of tribal community. He also stated that education development is in community is a sign of change in society. Shikha Gupta hosted the programme while Dr Vijeta Uikey proposed a vote of thanks.

नवराष्ट्र

## लोकशाहीचा डोलारा विकासावरच अवलंबून

### रूमकी बसू : लोकप्रशासन विभागाच्या हीरक महोत्सवानिमित्त राष्ट्रीय परिषद




नागपूर, सिटी रिपोर्टर. देशातील लोकशाही ही प्रामुख्याने विकासावर अवलंबून आहे. लोकशाहीत तटस्थता असणे आवश्यक असून सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्थेला प्राधान्य असावे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील सार्वजनिक धोरण आणि सामाजिक विज्ञान सरकारी संस्था केंद्राच्या प्रमुख रूमकी बसू यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या लोकप्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था विभागाच्या हीरक महोत्सवानिमित्त आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत त्या बोलत होत्या.

उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरू दुधे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून दिल्ली येथील भारतीय लोकप्रशासन संस्थेचे सुरेश मिश्रा, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. ई. वायूनंदन, विद्यापीठ लोकप्रशासन विभाग प्रमुख जितेंद्र वासनिक उपस्थित होते. यावेळी बसू यांनी लोकशाहीकडून वास्तविक लोकशाहीकडे होत असलेल्या प्रक्रियेचे वर्णन केले.

यावेळी विभागाचा 75 वर्षांचा प्रवास उलगडणाऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. विभागाच्या सहायक प्राध्यापक सुप्रिया डेव्हिड यांनी प्रास्ताविक केले. संशोधक विद्यार्थिनी व इतर प्रतिनीधींचे मेघना मंडल यांनी आभार मानले. आयोजनात धर्मेंद्र तुरकर, प्रा. रमण शिवणकर, प्रा. अंकुश मराठे, प्रा. श्रीवर्धन केकतपुरे, जुही मिश्रा, लिंटा टॉमसन यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

#### नवे शिक्षण धोरण विद्यार्थी हिताचे : वायूनंदन

सुरेश मिश्रा यांनी भाषणातून लोकप्रशासनाच्या शिक्षणात आणि संशोधनात संतुलन राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. भारतीय लोकप्रशासन संस्थेच्या भूमिकेवर चर्चा करताना त्यांनी संस्थेच्या योगदानाचा उल्लेख केला. संस्थेला आवश्यक अनुदानाच्या तुलनेत केवळ 40 टक्के निधी मिळत असूनही संस्थेचे संस्थापक पंडित जवाहरलाल नेहरू यांचा वारसा संस्थेत कायम असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. ई. वायूनंदन यांनी नवे शिक्षण धोरण विद्यार्थी हिताचे असल्याचे सांगितले. विभागाच्या योगदानाबद्दल कौतूक केले आणि महाराष्ट्रातील आपणास आलेल्या अनुभवाची माहिती दिली. आयुष्यात प्रॅक्टिकल राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

Orange City Plus Edition
Oct 01, 2024 Page No. 4
Powered by: navbharatlive.com

## समांतर संस्कृतीतून लोकशाही मूल्ये रुजलीत

### विजय तांबे यांचे मत; विद्यापीठात गांधी जयंती सप्ताह

म. टा. प्रतिनिधी, नागपूर



कार्यक्रमात बोलताना वर्धा येथील सेवाग्राम आश्रमाचे सचिव विजय तांबे. व्यासपीठावर मान्यवर.

'महात्मा गांधी यांनी सर्जनशील विचार असलेली समांतर संस्कृती निर्माण करून स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता ही न्यायावर आधारलेली लोकशाही मूल्ये भारतात रुजवली', असे मत वर्धा येथील सेवाग्राम आश्रमाचे सचिव विजय तांबे यांनी व्यक्त केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर महात्मा गांधी विचारधारा विभागाच्यावतीने गांधी जयंती सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहांतर्गत 'तंत्र युगातील प्रश्न आणि गांधी उपाय' या विषयावर विजय तांबे यांचे व्याख्यान झाले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री बिंझाणी नगर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संदीप तुंडुरवार, गांधी विचारधारा विभागप्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांची उपस्थिती होती.

तांबे म्हणाले, 'महात्मा गांधी यांनी पाश्चिमात्य संस्कृतीला ठामपणे नकार देण्याचे धाडस केले, जे त्यांच्यापूर्वी कोणीच केले नव्हते. त्याचबरोबर सॉक्रेटिसनंतर त्या परंपरेतील चिकित्सापूर्ण चिंतनातून महात्मा गांधी यांनी अभूतपूर्व परिवर्तनाची सुरुवात आपल्याला करून दिली. महात्मा गांधींनी त्यांच्या रचनात्मक कार्यक्रमांमधून अनेक संस्था निर्माण केल्या आणि नवा भारत देश घडविला.'

डॉ. संदीप तुंडुरवार यांनी अध्यक्षीय संबोधनातून भारतातील संसाधने, गरजा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर काही उदाहरण देत सांगितला. तंत्रज्ञान हे नफेखोरीवर आधारित असून मानवी नैतिकता जपताना महात्मा गांधींना आपण विसरू शकणार नाही, असे ते म्हणाले. प्रास्ताविकात पदव्युत्तर गांधी विचारधारा विभागप्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांनी गांधी जयंती सप्ताहाच्या आयोजनामगील भूमिका विशद केली. युवाशक्तीला सन्मानपूर्वक जीवन जगता यावे, याकरिता योग्य मार्गदर्शन आणि चुकीच्या माहितीच्या मायाजालातून सावध करण्याचे प्रयोजन असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन लेखिका डॉ. मंजूषा सावरकर यांनी केले. आभार डॉ. अपरूप अडावदकर यांनी मानले.

देशोन्नती

## लोकशाही विकासावर अवलंबून:डॉ.रूमकी बसू

### लोकप्रशासन विभागाच्या हिरक महोत्सवानिमित्त राष्ट्रीय परिषद

देशोन्नती वृत्तसंकलन



नागपूर : देशातील लोकशाही ही प्रामुख्याने विकासावर अवलंबून आहे. लोकशाहीत तटस्थता असणे आवश्यक असून सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्थेला प्राधान्य असावे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील सार्वजनिक धोरण आणि सामाजिक विज्ञान सरकारी संस्था केंद्राच्या प्रमुख डॉ. रूमकी बसू यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या लोकप्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था विभागाच्या हिरक महोत्सवानिमित्त दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद कॅम्पसमधील डॉ. ए. के. डोरले सभागृहात शुक्रवार, दि. २७ व २८ सप्टेंबर रोजी पार पडली. यावेळी बीजभाषण करताना डॉ. बसू मार्गदर्शन करीत होत्या.

राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून दिल्ली येथील भारतीय लोकप्रशासन संस्थेचे डॉ. सुरेश मिश्रा, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन, दिल्ली येथील ... जितेंद्र वासनिक यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. बसू यांनी लोकशाहीकडून वास्तविक लोकशाहीकडे होत असलेल्या प्रक्रियेचे वर्णन केले.

डॉ. सुरेश मिश्रा यांनी भाषणातून लोकप्रशासनाच्या शिक्षणात आणि संशोधनात संतुलन राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विभागप्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक यांनी त्यानंतर विभागाचा इतिहास सांगितला. विभागाचे संस्थापक प्रा. एम.पी. शर्मा यांचा उल्लेख केला आणि या विभागाची आशियातील पहिली अशी ओळख कशी निर्माण झाली याचे वर्णन केले. त्यांनी विभागाच्या इतर महत्त्वपूर्ण प्रमुखांपैकी डी. एस. मूर्ती, एस. डब्ल्यू. ... नीलिमा देशमुख आणि डॉ. निर्मलकुमार सिंह यांचे विभागाच्या उभारणीत मोलाचे योगदान आहे असे सांगितले. यावेळी विभागाचा ७५ वर्षांचा प्रवास उलगडणाऱ्या ...

## 'हायकू' हा दृश्यअर्थाला कलाटणी देणारा काव्यप्रकार

### काव्यास्वाद : व्याख्यानसत्रा'त मेघना साने यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, नागपूर



'काव्यास्वाद : व्याख्यानसत्रा'त विचार व्यक्त करताना अतिथी वक्त्या कवयित्री-लेखिका मेघना साने. मंचावर कवयित्री-लेखिका हेमांगी नेरकर, मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे, प्रा. अमित दुर्योधन.

'हायकू' ही पहिल्या दोन ओळींनंतर तिसऱ्या ओळीत अर्थाला कलाटणी देणारी काव्याची रचनापद्धती आहे. पहिल्या दोन ओळींत समोरील दृश्याचे वर्णन आणि तिसऱ्या ओळीत त्या दृश्यअर्थाला देण्यात येणारी कलाटणी काव्यरूपाचा प्रभावी आणि वेगळा काव्यास्वाद देणारा आहे', असे प्रतिपादन मुंबईतील कवयित्री व लेखिका मेघना साने यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाच्यावतीने 'मराठी काव्यास्वाद : विशेष व्याख्यान सत्रां'तर्गत 'मराठी हायकू आणि त्याची वाटचाल' विषयावर अतिथी कवयित्री व लेखिका मेघना साने तसेच 'आरती प्रभू यांची कविता' विषयावर कवी आरती प्रभू (चि. त्र्यं. खानोलकर) यांच्या कन्या हेमांगी नेरकर (मुंबई) यांच्या विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले; त्यावेळी त्या बोलत होत्या. मराठी विभागात आयोजित या सत्रांच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे होते. व्याख्यानसत्राच्या सुरुवातीला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

मेघना साने यांनी 'हायकू' या जपानमध्ये १७व्या शतकात सुरु झालेल्या या काव्यप्रकाराच्या इतिहासाला उजाळा दिला. कवयित्री शिरीष पै यांनी हा काव्यप्रकार मराठी मातीत रुजविला. सोपे लिहून त्यातून जीवनाचा अर्थ काढणे कठीण आहे. हायकू हा काव्यप्रकार हाताळताना त्यात रिदम आणि त्यातील अर्थ जपला पाहिजे', अशी अपेक्षाही साने यांनी व्यक्त केली. तर, कवी आरती प्रभू (चि. त्र्यं. खानोलकर) यांच्या कन्या हेमांगी नेरकर यांनी वडिलांसोबतच्या आपल्या बालपणीच्या आठवणींचा पट उलगडला. अध्यक्षीय भाषणात डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी, मराठी कवितेचा विचार करताना त्याला दीर्घ रूपाची परंपरा असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक डॉ. अमृता इंदूरकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा. अमित दुर्योधन यांनी केले. प्रा. समीर कुमरे यांनी आभार मानले. या काव्यास्वाद व्याख्यानसत्राला विभागातील संशोधक विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

TheHitavada
Nagpur City Line | 2024-10-01 | Page- 6
ehitavada.com

## Pandit Deendayal Upadhyay Jayanti celebrated at RTMNU



Dr Prashant Bokare, Vice-Chancellor (RTMNU) paying tribute to Pandit Deendayal Upadhyay along with other office bearers at the Janmalal Bajaj premises.

■ Staff Reporter

RASHTRASANT Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) celebrated the birth anniversary of Pandit Deendayal Upadhyay, with a special ceremony organised recently at the Janmalal Bajaj premises.

Dr Prashant Bokare, Vice-Chancellor and Dr Sanjay Dudhe, Pro Vice-Chancellor along with Dr Raju Hiwase, Registrar paid their tributes by garlanding the image of Upadhyay.

The event witnessed participation from key officials including Premdas Wadkar, Public Relations Officer and staff members Shailesh Rathod, Manoj More, and others.

The celebration highlighted Upadhyay's contributions to society and emphasised the university's commitment to his ideals.

तरुण भारत
Apla Nagpur | 2024-10-05 | Page- 3
epaper.tarunbharat.net

## पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागात नवागतांचे स्वागत



◆ नागपूर, ४ ऑक्टोबर

राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात छायाला राऊत हिला मिसेस फ्रेशर व रक्षित रामटेके याला मिस्टर फ्रेशर हा पुरस्कार देण्यात आला. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी परिचय कार्यक्रम नुकताच पार पडला. तृतीय सत्राच्या विद्यार्थ्यांकडून प्रथम सत्र विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. टी. धुर्वे व डॉ. एस. सी. मसराम यांनी आपल्या भाषणात शैक्षणिक वर्षात यशस्वी होण्याची आशा व्यक्त केली. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांनी या विविध उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. यावेळी नवीन विद्यार्थ्यांनी स्वतःची ओळख करून दिली सोबतच विविध कार्यक्रमांचे आयोजन यावेळी करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

लोकसत्ता

## 'लोकशाहीचे निर्माण ज्यांच्याकरिता त्यांच्याकडेच दुर्लक्ष'

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर विद्यापीठाच्या व्याख्यानमालेत मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण यांनी 'लोकशाही आणि सकारात्मक कृती' या विषयावर मार्गदर्शन केले.



नागपूर : लोकशाही ज्यांच्याकरिता निर्माण झाली त्यांच्याकडेच दुर्लक्ष होत आहे, अशी खंत मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण यांनी व्यक्त केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पदव्युत्तर विधि विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील रामानुजन सभागृहात मदर टेरेसा व्याख्यानमाला पार पडली. यावेळी 'लोकशाही आणि सकारात्मक कृती' या विषयावर न्यायमूर्ती चव्हाण मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाला आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, आदिवासी अपर आयुक्त रवींद्र ठाकरे, विभाग प्रमुख डॉ. पायल ठाकरे यांची उपस्थिती होती. न्यायमूर्ती चव्हाण यांनी विषयावर बोलताना भारतातील भेदभावाचा इतिहास, प्रकार आणि सध्याच्या स्थितीवर चर्चा केली. देशात ७६ वर्षांपूर्वी लोकशाही प्रस्थापित झाली. त्यापूर्वी १५० वर्षे इंग्रजांनी राज्य केले. पूर्वी भारतीय शासकांचे राज्य होते. त्यावेळी भेदभावाने विभाजित समाज आज देखील तसाच आहे.

देशात लोकशाहीच्या ७६ वर्षांनंतर देखील आपण यामध्ये बदल घडवू शकलो का? खरा बंधुभाव निर्माण करण्याचा प्रयत्न झाला का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. लोकशाहीमुळे तळागाळातील समाजातील व्यक्ती मोठ्या पदावर जाऊ शकतात. मात्र, सामाजिक स्तर बदलत नाही. आपला समाज विभाजित ठेवायचा की एकत्र हे तुम्हाला ठरवायचे आहे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

रवींद्र ठाकरे यांनी आदिवासी समुदायाच्या विकासासाठी विभागाकडून होत असलेल्या विविध योजना व कार्याची माहिती दिली. प्रशासनासोबतच सक्रिय समुदायाचा सहभाग आदिवासी समाजाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे ठाकरे यांनी सांगितले.

डॉ. पायल ठाकरे यांनी समाजातील भेदभावामुळे मानवतेला भेडसावणाऱ्या समस्यांवर लक्ष केंद्रित करत बदलाची आवश्यकता व्यक्त केली. डॉ. विजेता उईके यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. शिखा गुप्ता यांनी संचालन केले.

लोकसत्ता




## पटोलेंनी राज्यपालांच्या अधिकारात हस्तक्षेप टाळला

### डॉ. ई. वायुनंदन यांच्याकडून कौतुक; लोक प्रशासन विभागाचा हीरक महोत्सव

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात विशिष्ट विचारांच्या कुलगुरू नियुक्तीचा विषय चर्चेला आला असता तत्कालीन विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांनी हा राज्यपालांच्या अखत्यारितील विषय असल्याचे सांगून त्यात हस्तक्षेप टाळला होता. आज ते प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. यावरून भिन्न पक्षाचे असतानाही त्यांनी दुसऱ्यांच्या अधिकारात हस्तक्षेप केला नाही. यावरून महाराष्ट्राची राजकीय आणि प्रशासकीय संस्कृतीचे दर्शन होते, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. ई. वायुनंदन यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या लोक प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य शासन विभागाच्या हीरक महोत्सवानिमित्त 'द सिंबायोसिस ऑफ डेमॉक्रसी अँड पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन इन इंडिया' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. विद्यापीठ परिसरातील डॉ. ए.के. डोरले सभागृहात ही परिषद घेण्यात आली. या परिषदेला भारतीय लोक प्रशासन संस्था नवी दिल्लीचे सुरेश मिश्रा, लोकनीती आणि शासकीय केंद्र, सामाजिक विज्ञान संस्था नवी दिल्लीच्या प्रो. रुमकी बासु, मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे आदींची उपस्थिती होती.

01/10/2024 | Nagpur | Page : 12
Source : https://epaper.loksatta.com

देशोन्नती

## राष्ट्र उभारणीसाठी रसायनशास्त्र महत्त्वाचे : डॉ. विजय तांगडे

देशोन्नती वृत्तसंकलन



काटोल : नबिरा महाविद्यालय काटोल येथे २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी केमिस्ट्री क्लब कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनीलकुमार नवीन हे होते. मुख्य वक्ता डॉ. विजय तांगडे यांनी 'एनईपी २०२० मधील समग्र दृष्टीकोन' या विषयावर वेगवेगळे उदाहरण देऊन प्रकाश टाकला व राष्ट्र उभारणीमध्ये रसायनशास्त्राचे अन्न, शेती, आरोग्य आणि औषध, सौंदर्य प्रसाधने, कपडे, उद्योग, नवीकरणीय ऊर्जा, पर्यावरणीय प्रभाव, संशोधन आणि विकासासाठी महत्त्वआहे, हे विशद केले.

यशस्वीतेसाठी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नीलेश गंधारे, प्रा. निलेश जाधव, प्रा. कैलास मोरे, रसायनशास्त्र क्लबचे अध्यक्ष पवन मुरूसकर, विभागातील सर्व प्राध्यापक, रसायनशास्त्र क्लबचे सदस्य आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन निशा ढोले यांनी तर दिशा गिरडकर यांनी आभार मानले.

Nagpur Edition
Oct 02, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

लोकसत्ता




## प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर इतिहास विभागात एम.ए. प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांशी त्यांची व्यवस्थित ओळख व्हावी आणि त्यातून त्यांच्याशी योग्य समन्वय निर्माण व्हावा या उद्देशाने स्वागताचा कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जातो, असे मत मानव विज्ञान शाखा अधिष्ठाता तथा इतिहास विभाग प्रमुख डॉ. शामराव कोरेटी यांनी व्यक्त केले.

मनोरंजनात्मक खेळांच्या स्पर्धांमधून मिस्टर फ्रेशर म्हणून एमए प्रथम वर्षाचा विद्यार्थी वेदांत चट्टे याची निवड करण्यात आली. मिस फ्रेशर म्हणून दामिनी सहारकर हिची निवड करण्यात आली. प्रास्ताविक विवेक ठाकरे, संचालन यश बलवी तर आभार अनुराग गायकवाड यांनी मानले.

नवराष्ट्र

## पहिली ते पदव्युत्तर मराठी अनिवार्य करा

### डॉ. आवळगावकर यांची अपेक्षा



नागपूर, मेट्रो रिपोर्टर. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. याबरोबरच भाषेच्या संवर्धनाबाबत नागरिकांसह सर्वांची जबाबदारीही वाढली आहे. मराठी भाषेची प्रतिष्ठा राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. असे मत रिद्धापूर येथील पहिल्या मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अविनाश आवळगावकर यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागात डॉ.आवळगावकर यांनी शनिवारी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. अभिजात मराठी भाषेचा आदर करण्यासाठी साहित्य निर्मितीवरही भर द्यावा लागेल, नमूद करीत ते म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत अभ्यासक्रमाचा मसुदा तयार केला जाणार आहे. इयत्ता पहिलीपासून पदव्युत्तरपर्यंत मराठीत शिक्षणाचे स्वरूप तयार करण्याची गरज आहे.

Orange City Plus Edition
Oct 06, 2024 Page No. 6
Powered by: navbharatlive.com

नवराष्ट्र

## विद्यापीठात डी. लक्ष्मीनारायण यांना वंदन

शैक्षणिक



नागपूर. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण दिवस कार्यक्रम 30 सप्टेंबर रोजी पार पडला. प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या



◆ नागपूर, ४ ऑक्टोबर

राष्ट्रकवी रामधारी सिंह 'दिनकर'रचित 'रश्मिरथी' या खंडकाव्यावर आधारित एकपात्री नाटकातून नरभूषण कर्णाच्या महाभारतातील वर्ग संघर्षाची कहाणी वर्णन करण्यात आली आहे. 'दिनकर' यांच्या पन्नासाव्या पुण्यस्मृती वर्षानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभाग आणि छंद मंदिराच्या वतीने या नाटकाचा प्रयोग गुरुनानक भवन येथे झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्याम कोरेटी, ललित कला विभाग विभागप्रमुख डॉ. संयुक्ता थोरात, डॉ. स्मिता आचार्य, अजय पाटील यांची उपस्थिती होती.

सुरभी बेगुसराय निर्मित 'रश्मिरथी'मध्ये अभिनेता-निर्देशक हरीश हरीऔध यांनी अभिनय, तर प्राक्कथन जयंत गडेकर यांनी केले. प्रकाशव्यवस्था लेखक आशीष कुलकर्णी यांनी सांभाळली. 'रश्मिरथी' या एकल प्रस्तुती कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता कलास्थानम बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कुणाल सोनटक्के, उपाध्यक्ष पवन गायधने, स्वप्निल समर्थ, ऋषिकेश पोहणकर, शैलेश वासनिक, रानू सोनटक्के, ममता समर्थ, अपर्णा शंभरकर, चारू साहू आदींनी परिश्रम घेतले.

Powered by iDocuments

## Nagpur University's PGTD of Law organises lecture series on 'democracy and action'



Post Graduate Teaching Department of Law (autonomous), **Nagpur University**, organized a lecture series on **'Democracy and Affirmative Action'** under NU's Mother Teressa memorial lecture series inititiave on September 28.

The lecture was attende by **Justice RC Chavan** (retd), Bombay High Court, as chief guest and **Ravindra Thakare,** additional tribal commissioner, Nagpur, as guest of honour and Smita Aacharya, director of IQAC, and professor, of department of physics, NU.

Head of the department, PGTD Law **Payal Thaorey** was the convenor. Thakare spoke about ground realities of the implementation of affirmative actions in favour of **marginalized tribal communities** with scope of sensitivity in law and policy. He said that **active community participation** can infuse confidence in tribal communities and holds key for attaining the expected welfare results.

Justice RC Chavan focused on education as the **most befitting and benefiting instrument** for successful affirmative actions. The dignitaries paid respects to late **Subhash Chaudhari**, former vice-chancellor of NU. Faculty **Shikha Gupta** coordinated and conducted proceedings of the session under the guidance of **Payal Thaorey**. She was assisted by **Tariq Khan**. Vijyeta Uikey proposed a vote of thanks.

World Heart Day cel

मटा विशेष

## बर्लिनच्या भिंतीचे अवशेष नागपुरात

### जर्मनीच्या एकत्रीकरणाची ३४ वर्षे पूर्ण

अविनाश महालक्ष्मे, नागपूर

बर्लिनची ती जगप्रसिद्ध भिंत अर्थात जर्मनीतच असणार, पण या भिंतीचे अवशेष त्या काळात विमानाने नागपुरात एका बॅगमध्ये आले होते.

जर्मनीचे पूर्व आणि पश्चिम असे विभाजन बर्लिन शहरातील त्या ऐतिहासिक भिंतीमुळे झाले होते. १९८९ सालच्या ९ नोव्हेंबरला बर्लिन शहरातील ही भिंत पाडून दोन्ही जर्मनीचे विलिनीकरण झाले आणि ३ ऑक्टोबर १९९० रोजी तशी अधिकृत घोषणा झाली. त्या घटनेचा वर्धापन दिन गुरुवारी आहे. त्या निमित्ताने त्याच काळात तेथे वास्तव्याला असलेले मोइझ हक यांनी त्यावेळच्या स्मृतींना उजाळा दिला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील जनसंवाद विभागात कार्यरत हक त्यावेळी पत्रकार होते आणि जर्मनीत इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर जर्नालिझममध्ये त्यांनी प्रवेश घेतला होता. भिंत पाडण्याच्या घटनेनंतर काही दिवसातच ते तेथे गेले होते, त्यामुळे या नव्या परिवर्तनाची जर्मनीतील स्पंदने त्यांना जवळून टिपता आली. विलिनीकरणानंतर जगभरातून पर्यटक येथे येऊ लागले. स्थानिक नागरिक या भिंतीचे तुकडे त्यांना विकायचे. एखाद्या पर्यटकाला विकत घ्यायचे नसेल तर भिंतीचा तुकडा तोडण्यासाठी हातोडा भाड्याने देण्याची व्यवस्थाही स्थानिकांनी केली होती.

भिंत असताना पश्चिमचे डॉइश मार्क, तर पूर्वचे ऑस्ट मार्क हे चलन होते. मात्र विलिनीकरणानंतर दोन्हीकडे एकच चलन ठेवण्याचा निर्णय झाला. प्रचंड दारिद्र्य, बेरोजगारी, गुन्हेगारी असलेल्या पूर्व जर्मनीच्या ऑस्ट मार्क या चलनाला आंतरराष्ट्रीय बाजारात काही किंमत नव्हती. त्यामुळे डॉइस मार्क हेच दोन्हीकडचे चलन ठरविण्यात आले. हा निर्णय झाला त्या दिवशी हक तेथेच होते. पूर्वेतील लोकांना चलन बदलता यावे म्हणून बँका रात्रभर सुरू ठेवण्यात आल्या होत्या. हक यांनीही या ऐतिहासिक भिंतीचे तुकडे विकत घेतले. आणि भारतात परत येताना त्यांनी ते आपल्या बॅगमध्ये ठेवले होते. मात्र ते बर्लिनवरून मुंबईला आले त्यावेळी विमानतळावर कस्टमच्या एका महिला अधिकाऱ्याने त्यांची बॅग तपासली. त्यातील ते भिंतीचे तुकडे पाहून त्या महिलेला संशय आला. तिने हातोडा बोलावून त्यातील दोन तुकड्यांचा भुगा केला. त्यात सोने किंवा अन्य मौल्यवान वस्तू दडलून तस्करीचा तिला संशय होता. मात्र काहीच न आढळल्याने हक यांनी उरलेल्या तुकड्यांसहच जाण्याची परवानगी देण्यात आली.

■ अनेकांची झाली होती ताटातूट

दुसऱ्या महायुद्धानंतर एका रात्रीत रशियाने बांधलेल्या या भिंतीमुळे बर्लिन व जर्मनीच नव्हे तर जगाला दोन भागात विभाजित करून टाकले. बर्लिन शहरात तर फारच विचित्र स्थिती निर्माण झाली. जे लोक घराबाहेर गेले होते ते भिंतीच्या ज्या बाजूला होते तिकडेच कायमचे अडकले. शाळेत गेलेली मुले, कर्मचारी, बाजारासाठी गेलेली बाया-माणसे यांची नेहमीसाठी घरापासून ताटातूट झाली. हजारो कुटुंबे तुटली. या भिंतीमुळे निर्माण झालेल्या पूर्व-पश्चिमपैकी पश्चिम भाग समृद्ध होता, पण रशियाच्या प्रभावाखालील पूर्व मात्र दरिद्रीच राहिला. ४५ वर्षांनंतर ही भिंत पाडण्याचा निर्णय झाला आणि जर्मनीत नव्या पर्वाचा उदय झाला. ही भिंत ओलांडून पश्चिम जर्मनीत जाण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. पण त्यातील अनेकांचा भिंतीवरून पडून तर कधी पोलिसांच्या गोळीने जीव गमवावा लागला होता.



मोइझ हक यांनी विमानातून आणलेला बर्लिनच्या भिंतीचा तुकडा.

## नवराष्ट्र

**आवाहन** • 'उच्च शिक्षणातील बदल आणि नॅक मूल्यांकन' विषयावर पोरवाल महाविद्यालयात चर्चासत्र

# एनईपीचा सहजतेने स्वीकार करा



कामठी, प्रतिनिधी. कामठी येथील सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयाच्या आयक्यूएसी द्वारे महाविद्यालयात 'एनईपी-2020 : उच्च शिक्षणातील बदल आणि नॅक मूल्यांकन' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. संयोजक डॉ.रतिराम चौधरी यांनी चर्चासत्राच्या उद्घाटन व समारोप सत्राची प्रस्तावना मांडली. प्राचार्य डॉ. विनय चव्हाण व माजी प्राचार्य डॉ.एस. एम. धोंडगे यांनी एनईपीने निर्माण केलेल्या आव्हानांचा सामना करून त्यांचे संधीत रूपांतर करण्यावर भर दिला. उद्घाटक रातुम नागपूर विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ.संजय दुधे यांनी एनईपीला ओझे न मानता सहजतेने स्वीकारण्याचा सल्ला दिला.

प्रथम सत्राचे प्रमुख वक्ते तथा डॉ.बी.आर.आंबेडकर विद्यापीठ इंदूरचे अधीष्ठाता सुनील गोयल यांनी 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणः शिक्षकांची भूमिका आणि आव्हाने' यावर तपशीलवार प्रकाश टाकला. सत्राचे अध्यक्ष अशोककुमार भाटिया यांनी संगणकमुळे कामगार कमी होणार नसून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. रातुम नागपूर विद्यापीठाचे विज्ञान विभागाचे अधीष्ठाता प्रशांत माहेश्वरी यांनी ऑनलाईन शिक्षणाद्वारे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिक्षित करण्याचे आवाहन केले. सत्राचे अध्यक्ष एस.बी. सिटी कॉलेज, नागपूरचे प्राचार्य डॉ.सुजित मैत्रे यांनी चर्चासत्राचे समर्थन केले. द्वितीय सत्रात नागपूर विद्यापीठाचे ह्युमॅनिटीज विभाग अधीष्ठाता प्रा. श्याम कोरेटी यांनी भारतीय ज्ञान प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती परत देण्याविषयी सांगितले. सत्राचे अध्यक्ष डॉ.योगेश भुते यांनी प्राचीन भारतीय शिक्षण व ज्ञान प्रणाली महत्वाची मानली. चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवसाच्या तिसऱ्या तांत्रिक सत्राचे प्रमुख वक्ते तथा शारदा विद्यापीठ, नोएडाचे कुलगुरु प्रा. शिवाराम खारा यांनी एआयच्या वापरावर भर दिला. अध्यक्ष तथा सांगाबा, अमरावतीचे माजी कुलगुरु डॉ.मुरलीधर चांदेकर यांनी व्यावसायिक व कौशल्य पूरक अभ्यासक्रमांचे महत्त्व विशद केले.

चौथ्या सत्रात शारदा कॉलेज, संगमनेरचे डॉ. श्रीहरी पिंगळे यांनी 'नॅक मूल्यांकन आणि मान्यताः भविष्यातील आव्हाने आणि संधी' या विषयावर उपयुक्त माहिती दिली. सत्राचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर महाविद्यालय, नागपूरचे डॉ. सुभाष सोमकुवार यांनी नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया शिक्षणासाठी महत्वाची असल्याचे सांगितले. संगाबा, अमरावतीचे डॉ. हेमंत देशमुख यांनी 'भारताचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 आणि 2040' या विषयावर आपले मत मांडले. सत्राचे अध्यक्ष पटेल महाविद्यालय भंडाराचे प्राचार्य देवराम नंदनवार यांनी एनईपी ही काळाची गरज असल्याचे सांगितले. चर्चासत्रातील वक्त्यांनी जिज्ञासू प्रतिनिधींच्या प्रश्नांना उत्तरे दिली. समारोप सत्रात डॉ. सतीश चाफले यांनी एनईपी भारतीय संस्कृतीच्या संवर्धनाशी निगडित असल्याचे स्पष्ट केले, डॉ. दत्तात्रय वाटमोडे यांनी एनईपीच्या फायद्यांची ओळख करून दिली. डॉ.श्रीकांत भोवते यांनी एनईपीमधील वाढत्या कामाच्या बोजाबाबत माहिती दिली. सत्राचे अध्यक्ष आयक्यूएसी समन्वयक डॉ.रेणू तिवारी यांनी 400 गुण पार करण्याचा नारा दिला. या चर्चासत्रात भारतातील विविध राज्यातील 400 प्रतिनिधी सहभागी झाले होते.

## लोकसत्ता

# 'सध्याच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीमुळे अस्वस्थता'

लोकसत्ता प्रतिनिधी

माणसांच्या विचारात फरक आहे, रक्तात नाही. जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी शरीरश्रम आणि आंतरजातीय विवाह महत्वाचे साधन आहे, असे मत लीलाताईंनी या कार्यक्रमात व्यक्त केले.



08/10/2024 | Nagpur | Page : 16

## तरुण भारत

Apla Nagpur | 2024-10-07 | Page- 1
epaper.tarunbharat.net

# आंतर महाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धा उद्घाटित

◆ नागपूर, ६ ऑक्टोबर

रातुम नागपूर विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय, रेशीमबाग मैदान येथे करण्यात आले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी सी. पी. ॲण्ड बेरार शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अधि. अशोक बनसोड, प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण संस्थेचे विजय बनसोड, डॉ. अरविंद जोशी, डॉ. जे. के. महाजन, डॉ. निशांत तिपटे उपस्थित होते. पहिल्या दिवसाच्या सामन्यांचे निकाल असे- ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने पीडब्ल्यूएस महाविद्यालयाला ३३-२१ गुणांनी पराभूत केले. (तभा वृत्तसेवा)

## TheHitavada

Nagpur City Line | 2024-10-10 | Page- 3
ehitavada.com

3

# University Winter exams to begin from October 15

■ Regular Winter exams to commence from November 16



Dr Sanjay Kavishwar addressing the meeting. Dr Navinkumar Mungle, Motiram Tadas, Nitin Kadbe, D S Pawar, Umesh Lohi are also seen.

■ Staff Reporter

RASHTRASANT Tukadoji Maharaj Nagpur University is conducting its Winter 2024 Examination from October 15. A pre-preparatory meeting of the Principal and the Center Officer regarding the winter examination was held at the Examination Bhawan on Wednesday.

At this time, Director-in-Charge of Board of Examinations and Evaluation Dr Sanjay Kavishwar said, "This examination will be conducted at a total of 136 examination centers in the university premises. Examinations of semesters 2, 4, 6 and 8 of ex-students will begin from October 15. We have planned to conduct winter regular examination from November 16".

At the college level, the regular examinations of the university semesters 1, 3, 5 and 7 will be conducted from November 16. The exam department is planning to declare the results of all these winter examinations before December 31. Dr Kavishwar said, "Since the admissions of professional courses are still underway their examinations will be held in January 2025. The centre in-charge have to ensure that the students do not face any kind of problem while writing the examinations. The entire examination should be conducted with focus on students."

Earlier, Deputy Registrar Navinkumar Mungle gave complete information about the examination. He explained to the audience about the old and new answer sheets, precautions to be taken after providing the answersheets to the students, etc. Deputy Registrar Motiram Tadas briefed about online examinations.

On this occasion Assistant Registrar D S Pawar, Umesh Lohi, Nitin Kadbe and others were present.

## देशोन्नती

# पदव्युत्तर एमबीजीई विभागात सोसायटी उद्घाटित

देशोन्नती वृत्तसंकलन

### डॉ. भरत सूर्यवंशी व सिद्धार्थ खोब्रागडे यांचे व्याख्यान

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर आण्विक जीवशास्त्र ...भियांत्रिकी (एमबीजीई) ...न कार्यक्रम ...या अनुषंगाने ...चे सहायक ...सूर्यवंशी व ...यांचे अतिथी ... विभागप्रमुख ...ते. तर प्रमुख ...सरकारच्या ...ग मंत्रालय, ...पूर येथील ...न सहायक ... सूर्यवंशी, महात्मा ज्योतिबा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे नागपूर जिल्हा व्यवस्थापक सिद्धार्थ खोब्रागडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सहायक नियंत्रक डॉ. भरत सूर्यवंशी यांनी पेटंट कार्यालयाच्या स्पर्धा परीक्षेविषयी माहिती दिली. सोबतच पेटंट व डिझाईनशी संबंधित विविध विषयांवर त्यांनी व्याख्यान दिले.

एमबीजीई सोसायटीचे सचिव सुमित वडभुडे यांनी विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी वर्षभरात आयोजित केलेल्या कार्यशाळा, सेमिनार, प्रशिक्षण सत्र, अतिथी व्याख्याने आणि व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम यासह केलेल्या कामगिरीची माहिती देत कार्यक्रमांचा आढावा घेतला. यात दोन विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळाली. एकाला परदेशात पीएचडी करण्यासाठी आणि दुसऱ्याला बंगलुरच्या केंद्रीय संस्थेत शिष्यवृत्ती प्राप्त झाली. अनेक विद्यार्थ्यांनी एमएस- सीईटी परीक्षा उत्तीर्ण केली. तर दोन विद्यार्थ्यांना महाज्योती फेलोशिप पुरस्कार प्राप्त झाला. आठ विद्यार्थ्यांनी विद्यापीठात शिक्षक आणि कार्यालय सहायक पदे मिळविली. काही विद्यार्थ्यांनी मौखिक आणि पोस्टर शोधनिबंध सादरीकरणात आणि भित्त चित्रकला स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविले.

या प्रसंगी प्रा. श्रीमती रुची वासनिक, डॉ. माधुरी ठाकरे, रेणुका व्यवहारे, डॉ. स्वाती गोडघाटे, डॉ. प्रज्ञा अनासने, क्षितिज शहारे आणि नेहा कोहपेरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विभागातील अतिथी प्रा. डॉ. प्रमोद रामटेके यांना 'द लॅन्सेट' मध्ये ९८ पेक्षा अधिक प्रभाव घटक असलेल्या शोधपत्राच्या प्रकाशनाबद्दल सन्मानित केले गेले. विभागप्रमुख डॉ. गोगले यांना शाल आणि रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले.

### नवीन कार्यकारिणी जाहीर

या वर्षी एमबीजीई सोसायटीच्या विविध पदांसाठी खालील सदस्यांची निवड करण्यात आली. सोसायटी सचिव म्हणून सुमित वडभुडे, संयुक्त सचिव- श्रद्धासुमन करहाडे, कार्यक्रम व्यवस्थापक- साक्षी पाटील, संयुक्त कार्यक्रम व्यवस्थापक- अदिती साबळे, कोषाध्यक्ष सोनसखळी तलांडे, संयुक्त कोषाध्यक्ष मोहित गोडे, मासिक संपादक - सुनीता साहू, संयुक्त मासिक संपादक हर्ष पवार यांचा समावेश आहे. वैष्णवी गुप्ता आणि कोमल धावडे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले, तर संयुक्त सचिव श्रद्धासुमन करहाडे यांनी आभार मानले.

Nagpur Edition

## LOKMAT TIMES

### Community News

# Journos must imbibe honesty from Gandhi, says Dr Kadu



Dr Prashant Kadu durign the seminar.

"Journalists must imbibe the basic values of truth, honesty, passion and service to society from the life of Mahatma Gandhi," said Dr. Prashant Kadu, Dean, Faculty of Interdisciplinary Studies, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

He was speaking at a seminar organized at the university's Department of Mass Communication to mark Gandhi Jayanti. Head of the Department, Dr. Moiz Mannan Haque, made the introductory remarks.

Dr. Kadu traced Gandhi's work as a journalist from 1888 when he wrote articles for the London-based 'The Vegetarian' and later from 1903 when he contributed to the 'Indian Opinion' in South Africa. He enlightened the students on how Gandhi's personal values and principles and his mission at the time were reflected in his writings.

Upon his return to India, he became the editor of 'Young India' and 'Navjivan' and focused on politics and social transformation. Dr. Kadu recalled that In 1933, he started the newspaper 'Harijan' in which he took up issues such as untouchability and rural development. The seminar was attended by students and teachers of the Department.

# 'अभिजात'मुळे वाढली संवर्धनाची जबाबदारी!

■ डॉ. अविनाश आवलगावकर यांचे मत; विद्यापीठाच्या मराठी विभागाला भेट

म. टा. प्रतिनिधी, नागपूर



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाला डॉ. अविनाश आवलगावकर यांनी भेट दिली. त्यांचे स्वागत करताना मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे व अन्य.

'मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद मोठा आहे. या दर्जामुळे आता मराठीजन म्हणून आपणा सर्वांचीच या भाषेच्या संवर्धनाची जबाबदारी वाढली आहे. अभिजात मराठी भाषेच्या सन्मानाला साजेशा अभिजात साहित्यनिर्मितीवर आपल्याला भर द्यावा लागेल', असे मत रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी येथे व्यक्त केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाला डॉ. आवलगावकर यांनी भेट दिली. मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन डॉ. आवलगावकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोमलवार महाविद्यालयाच्या प्रा. नीता खोत, प्रा. सायली लाखे-पिदळी, प्रा. सपन नेहरोत्रा, विभागातील प्राध्यापक डॉ. प्रज्ञा निनावे, प्रा. अमित दुर्योधन, प्रा. समीर कुमरे, प्रा. प्रज्ञा दुधे आदींची उपस्थिती होती.

## TheHitavada

Nagpur City Line | 2024-10-11 | Page- 5
ehitavada.com

# Tukadoji Maharaj's death anniversary to be observed today

■ Staff Reporter

...rsary of ...oji Maharaj ...Rashtrasant ...aj Nagpur ...0 am on October 11.

Dr Prashant Bokare, in-charge Vice-Chancellor, will garland the statue of Rashtrasant Tukadoji Maharaj at Jyotiba Fule ac...ises. A short fi... Tukadoji Maharaj will be shown at Post-graduate Teaching Department of Rashtrasant Tukadoji Maharaj Chair. Dr Raju Hiwase, Registrar, has

## LOKMAT TIMES

# Session on 'Democracy and affirmative action' organised



Justice R C Chavan (retd) during the addressing the participants.

Post Graduate Teaching Department of Law (Autonomous), RTMNU, hosted a session on 'Democracy and Affirmative Action' as part of the 'Mother Teresa Memorial Lecture Series' recently. The event featured Justice R C Chavan (Retd.) of the Bombay High Court as Chief Guest, alongside Ravindra Thakare, I.A.S., Additional Tribal Commissioner, Nagpur, and Smita Aacharya, Director, IQAC at RTMNU.

Dr. Payal Thaorey, Head of the Department and session convenor, highlighted the urgent need to address discrimination in society.

Ravindra Thakare emphasized the importance of community participation and bureaucratic engagement to enhance affirmative actions for marginalized tribal communities. He cited successful initiatives like 'Bolka Varg' to boost confidence among students.

Justice Chavan discussed the complexities of discrimination, the validity of reservations, and the need for effective action against social issues like beggary and bonded labor. He stressed education as a vital tool for affirmative action and urged the state to reclaim control over key sectors from private entities.

The event concluded with Dr. Vijyeta Uikey offering a vote of thanks, and the audience observing a moment of silence in memory of Late Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhary. The session garnered significant participation from students and faculty.

Nagpur First
Page No. 6 Oct 09, 2024
Powered by: erelego.com

## लोकमत

# अभिजात दर्जासोबतच मराठी संवर्धनाची जबाबदारीही वाढली

### मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आवलगावकर

लोकमत न्यूज नेटवर्क



डॉ. अविनाश आवलगावकर यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे.

नागपूर : मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा मोठा आनंद आहे. या दर्जासोबतच मराठीजन म्हणून आपणा सर्वांचीच या भाषेच्या संवर्धनाप्रतिची जबाबदारी वाढली आहे, अशी अपेक्षा अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे होत असलेल्या मराठी भाषा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू, ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक डॉ. अविनाश आवलगावकर यांनी येथे व्यक्त केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाला भेट दिली असता त्यांनी या भावना व्यक्त केल्या.

डॉ. आवलगावकर म्हणाले, मराठी भाषेची प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारीही आपणा सर्वांना पेलवावी लागेल. अभिजात मराठी भाषेच्या सन्मानाला साजेशा अभिजात साहित्य निर्मितीवर आपल्याला भर द्यावा लागेल. यावेळी पदव्युत्तर मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांच्या हस्ते शाल, बुके आणि ग्रंथभेट देऊन डॉ. आवलगावकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सोमलवार महाविद्यालयाच्या प्रा. नीता खोत, प्रा. सायली लाखे-पिदळी, प्रा. सपन नेहरोत्रा, विभागातील प्राध्यापक डॉ. प्रज्ञा निनावे, प्रा. अमित दुर्योधन, प्रा. समीर कु... उपस्थित हो...

Nagpur Main
Page No. 2 Oct 07, 2024
Powered by: erelego.com

# रसायनशास्त्र विभागात 'केमिस्ट्री सोसायटी'

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागात २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरिता 'केमिस्ट्री सोसायटी'ची स्थापना ...



जागतिक आणि राष्ट्रीय पातळी वरील महत्त्व समजावून सांगितले. डॉ. विजय तांगडे यांनी सोसायटीच्या स्थानेमागील भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थिनी युक्ती पटेल हिने विभागातील सुविधा आणि शैक्षणिक वातावरणाबाबत माहिती दिली. केमिस्ट्री सोसायटीचे उद्घाटन डॉ. रमेश कुमार यांनी बोर्डवर सोडियम हायड्रॉक्साइड फवारत केले. बोर्डवर सोडियम हायड्रॉक्साइड फवारल्याने फिनोलफ्थेलिनसोबत ॲसिड-बेस प्रतिक्रिया घडली आणि सोसायटीचे नाव प्रकट झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्यावतीने देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार मिळाल्याने विभागप्रमुख डॉ. करडे यांना सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन अमृता रुपचंदानी आणि मनीषा ठाकूर यांनी केले. उपाध्यक्ष ज्योती पिल्लई यांनी आभार मानले. केमिस्ट्री सोसायटीत शिक्षक डॉ. विजय तांगडे, अध्यक्ष युक्ती पटेल, उपाध्यक्ष ज्योती पिल्लई, सचिव अमृता रुपचंदानी, सहसचिव आकाशकुमार भारती, कोषाध्यक्ष श्रुती पवार, सह-कोषाध्यक्ष अंचल चौधरी यांचा, तर सदस्य म्हणून पृथा देवईकर, प्रतिक भगत, विभा ताटेड, अर्पिता गडधने, नेहा सिंग यांचा समावेश आहे. याशिवाय विभागातील नेट, सेट आणि गेट परीक्षा उत्तीर्ण प्रज्वल उडान, निकिता पटले, अपूर्वा बंबल, जानवी धोटे, स्नेहा बनकर, वैभव जयस्वाल यांना सन्मानित करण्यात आले.

## लोकसत्ता

*लोकमान्य लोकशक्ती*

# स्व-संरक्षण शिबिरात आत्मरक्षणाचे धडे

विद्यार्थिनींकरिता स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग, शासकीय विज्ञान संस्था आणि महिला विकास सेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात विद्यार्थिनींना आत्मरक्षणाचे धडे देण्यात आले. शासकीय विज्ञान संस्थेमध्ये आयोजित स्वसंरक्षण शिबिरात ब्लॅक बेल्ट टेन ४ कराटे असोसिएशनचे अध्यक्ष विजय गिजरे व त्यांच्या चमूने विद्यार्थिनींना आत्म संरक्षणाबाबत माहिती दिली. प्रात्यक्षिकांद्वारे विविध उदाहरणांद्वारे आत्मसंरक्षणाचे कौशल्य शिकवले. यावेळी शासकीय विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे, विद्यापीठाच्या पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर, डॉ. निक्की सिद्धीकी, डॉ. सीमा कुरळकर, डॉ. अरुणा कावडकर, डॉ. सुनील कापगते, वृषाली देशमुख, रोशनी खोब्रागडे, निकिता वैष्णव, शुभम सैनिक, जस्सी सिंग यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले.

09/10/2024 | Nagpur | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

## सकाळ

# 'बारोमास' आता नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

बुलडाणा, ता. १० : येथील साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक आणि बारोमासकार म्हणून ओळख असलेले डॉ. सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या नावाजलेल्या कादंबरीचा नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने आपल्या एम. ए. च्या अभ्यासक्रमात समावेश केला आहे. २०२३ -२४ पासून पुढील कालावधीसाठी ही कादंबरी अभ्यासली जाणार आहे. त्यामुळे देशमुखांच्या शिरपेचात पुन्हा एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

बारोमास ही कादंबरी पुणे येथील कॉन्टिनेन्टल प्रकाशन या संस्थेने प्रकाशित केलेली आहे. या कादंबरीचा इंग्रजी, हिंदी, मैथिली, उर्दू भाषेत अनुवाद झालेला आहे. सिंधी आणि गुजराती भाषेतील अनुवाद साहित्य अकादमी दिल्ली यांच्याकडून प्रकाशनाच्या वाटेवर आहे. या कादंबरीवर हिंदी चित्रपट आणि मराठी नाटकाची सुद्धा निर्मिती झालेली आहे.

ठाणे आर्ट गिल्ड या नाट्य संस्थेने मुंबई व कर्नाटक या राज्यात अनेक प्रयोग केले असून त्याला अनेक नाट्य पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. या कादंबरीला भारत सरकारच्या दिल्ली येथील साहित्य अकादमीचा पुरस्कार २००४ प्राप्त झालेला आहे. सदानंद देशमुख यांच्या तहान, बारा मास, चारोमेरा या कादंबऱ्यांचे आकाशवाणी जळगाव, अहमदनगर, नागपूर, अकोला, सोलापूर यांनी आपल्या केंद्रावरून प्रसारानही केलेले आहे. त्याचप्रमाणे या कादंबऱ्या पुणे, कोल्हापूर, नांदेड, मुंबई, अमरावती आणि आता नागपूर विद्यापीठाने आपल्या पदव्युत्तर व पदवी अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या आहेत. त्यांच्या अनेक कथा आणि कविता अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत.

> आपण आपले अनुभव आणि निष्ठा यांच्याशी प्रामाणिक राहून आपले सर्वच लेखन केले आहे. या ग्रामीण समाज जीवनाचे चित्रण असलेले आपले साहित्य नव्या पिढीतील विद्यार्थी अभ्यासत आहेत, याचा आपल्याला आनंद आहे. शेतकरी जीवन असता आदर आणि प्रेम निर्माण होईल. ग्रामीण जीवनाच्या समस्या नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना कळून येतील व त्यांच्याबद्दल आस्था वाढेल.
>
> -डॉ. सदानंद देशमुख, बुलडाणा.

Nagpur Main
11/10/2024 Page No. 102

## लोकसत्ता

*लोकमान्य लोकशक्ती*

# डॉ. ढोबळे यांना धरणीधर गांधी समाज शिक्षक पुरस्कार

लोकसत्ता प्रतिनिधी



नागपूर : डॉ. गिरीश गांधी फाऊंडेशनच्यावतीने देण्यात येणारा स्व. धरणीधर गांधी समाज शिक्षक पुरस्कार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे यांना जाहीर करण्यात आला आहे. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

स्व. धरणीधर गांधी यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील एका लहान गावात झाला. प्रारंभी शेती आणि त्यानंतर शिक्षण क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा निर्माण करणाऱ्या धरणीधर गांधी यांनी सामाजिक बांधिलकी जपत सामाजिक कार्य केले. त्यांच्या स्मृतीनिमित्त सामाजिक बांधिलकी स्वीकारून समाज प्रबोधनाचे काम करत आहे अशांना त्यांच्या स्मृतीनिमित्त पुरस्कार दिला जातो. यावर्षी प्रा. संजय ढोबळे यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. ढोबळे यांचा पदवी व पदव्युत्तर स्तरावर ३१ वर्षांचा अध्यायनाचा व ३० वर्षे संशोधनाचा अनुभव आहे. डॉ. ढोबळे यांची ७० पेटंट प्रकाशित केले आहेत. अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. धरणीधर गांधी यांच्या स्मृतीदिनी म्हणजेच ५ फेब्रुवारीला आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्यांना पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

09/10/2024 | Nagpur | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

## सकाळ

# विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षांना १५ ऑक्टोंबरपासून सुरुवात

### महाविद्यालयस्तरावर २, ४, ६ आणि ८ व्या सत्राचा समावेश



**अशा आहे तारखा**
- १५ ऑक्टोबर - माजी विद्यार्थी
- १६ नोव्हेंबर - १,३,५ व ७ सत्रातील नियमित विद्यार्थी
- ३१ डिसेंबर - निकाल

नागपूर, ता. ९ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन स्तरावरील हिवाळी परीक्षेला १५ ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे. त्यासाठी १३६ केंद्र तयार करण्यात आलेली असून, यामध्ये २, ४, ६ आणि ८ व्या सत्राचा समावेश आहे.

विद्यापीठाने परीक्षेसाठी ऑड-इव्हन पॅटर्न स्वीकारल्यावर संलग्नित असलेल्या महाविद्यालयामध्ये हिवाळी परीक्षा महाविद्यालयस्तरावर घेण्यात येतात. पहिल्या टप्प्यात माजी विद्यार्थ्यांची परीक्षा १५ ऑक्टोबरपासून होणार असून, नियमित परीक्षा १६ नोव्हेंबरपासून सुरू होईल. महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठाच्या सत्र १,३,५ व ७ च्या नियमित परीक्षा १६ नोव्हेंबरपासून सुरू होतील. यासर्व हिवाळी परीक्षांचे निकाल ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी लावण्याचे परीक्षा विभागाचे नियोजन आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश अद्याप सुरू असल्याने केवळ याच परीक्षा जानेवारी २०२५ मध्ये होतील.

### केंद्राधिकाऱ्यांनी घ्यावी दक्षता

परीक्षेचे संचालन करताना विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही, याची दक्षता केंद्राधिकाऱ्यांना घ्यावयाची आहे. संपूर्ण परीक्षा विद्यार्थी केंद्रित असावी. मात्र, अन्य सर्व बाबींबाबत दक्षता घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच परीक्षा नियमाबाबत विभागाकडून देण्यात आलेल्या सर्व सूचना पत्रकांचे वाचन करून त्यावर अंमल करावा असे आवाहन डॉ. संजय कवीश्वर यांनी केले.

यावेळी उपकुलसचिव नवीनकुमार मुंगळे, मोतीराम तडस, सहाय्यक कुलसचिव डी. एस. पवार, उमेश लोही, नितीन कडबे यांच्यासह प्राचार्य व केंद्राधिकारी यांची उपस्थिती होती.

Nagpur, Nagpur-Today
10/10/2024 Page No. 3

## देशोन्नती

# विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा १५ ऑक्टोबरपासून



देशोन्नती वृत्तसंकलन

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या हिवाळी २०२४ परीक्षेस मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४ पासून सुरुवात होत आहे. हिवाळी परीक्षेबाबत प्राचार्य व केंद्राधिकारी यांची पूर्व तयारी बैठक परीक्षा भवन येथे बुधवार, ९ ऑक्टोबरला पार पडली. यावेळी महाविद्यालयीन स्तरावरील विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा संचालनात सर्व प्रकारची दक्षता घेण्याचे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. संजय कवीश्वर यांनी केले.

विद्यापीठ परिक्षेत्रातील एकूण १३६ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यापीठाच्या सत्र २, ४, ६ आणि ८ मधील माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षांना मंगळवार, १५ ऑक्टोबर पासून सुरुवात होत आहे तर हिवाळी नियमित परीक्षा १६ नोव्हेंबर पासून घेण्याचे नियोजन परीक्षा विभागाने केले असल्याची माहिती डॉ. कवीश्वर यांनी यावेळी दिली. महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठाच्या सत्र १, ३, ५ व ७ च्या नियमित परीक्षा १६ नोव्हेंबर पासून घेतल्या जाणार आहे. या सर्व हिवाळी परीक्षांचे निकाल ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी लावण्याचे परीक्षा विभागाचे नियोजन आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश अद्याप सुरू असल्याने केवळ याच परीक्षा जानेवारी २०२५ मध्ये होतील, असे त्यांनी सांगितले.

### संगणक अत्याधुनिक असावे

उपकुलसचिव मोतीराम तडस यांनी ऑनलाइन परीक्षांबाबत माहिती दिली. ऑनलाइन प्रश्नपत्रिका कशाप्रकारे लॉगइन आयडी वरून डाऊनलोड करावी. सेंटर लिस्ट डाऊनलोड करीत तपासणी करून घेण्याची माहिती त्यांनी दिली. पदवी पदविका व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षांसंबंधी माहिती सर्व परीक्षा केंद्रांना ऑनलाइन पाठवली जाणार आहे. परीक्षांचे सर्व नियमन ऑनलाईन होणार असल्याने महाविद्यालयातील संगणक संच अत्याधुनिक असावा असे त्यांनी सांगितले. सोबत प्रश्नपत्रिका डाऊनलोड करतेवेळी घ्यावयाच्या सूचनांची माहिती त्यांनी दिली. यावेळी उपकुलसचिव सर्वश्री नवीनकुमार मुंगळे, मोतीराम तडस, सहाय्यक कुलसचिव डी. एस. पवार, उमेश लोही, नितीन कडबे यांच्यासह प्राचार्य व केंद्राधिकारी यांची उपस्थिती होती.

### परीक्षा संचालनात दक्षता बाळगा

परीक्षांचे संचालन करताना विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याची दक्षता केंद्राधिकाऱ्यांना घ्यावयाची आहे. संपूर्ण परीक्षा विद्यार्थी केंद्रित असावी, असे आवाहन डॉ. कवीश्वर यांनी केले.

तत्पूर्वी उपकुलसचिव नवीनकुमार मुंगळे यांनी परीक्षेबाबत संपूर्ण माहिती उपस्थितांना दिली. जुन्या व नवीन उत्तरपत्रिका, विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका उपलब्ध करून दिल्यानंतर घ्यावयाची दक्षता, किती गुणांसाठी किती वेळ परीक्षा, परीक्षा संचालनात शिक्षकांची मदत, उत्तर पत्रिका कशाप्रकारे विद्यापीठाकडे पाठवायची आदी विषयांबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

Nagpur Edition
Oct 10, 2024 Page No. 8
Powered by: erelego.com

TheHitavada
Nagpur City Line | 2024-10-15 | Page- 5
ehitavada.com

## RTMNU's Chemistry Deptt team bags 2 gold, 14 silver medals in NPTEL exams

■ Staff Reporter



Dr N N Karade



Laxmi Ravidas



Chaitanya Gadekar

THE team of Post-graduate Department of Chemistry, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) has bagged two gold and 14 silver medals at National Programme on Technology Enhanced Learning (NPTEL) platform resulting in recognition of the Department as 'Local Active Chapter' of NPTEL for second consecutive year. NPTEL local chapter encourages students to register for NPTEL courses available on Swayam platform. The courses provide valuable education of national and global level as the courses are designed under guidance of expert teachers from Indian Institute of Technology (IIT) and Indian Institute of Science (IISc).

Dr N N Karade, Head of Post-Geaduate Department of Chemistry is taking efforts for students to avail benefit of the NPTEL courses. He organised workshop at the start of the session and also prepared students for the evaluation.

Dr Karade's efforts have resulted in two students winning gold medals, three students coming out as toppers and 14 students bagging silver medals for the session four of session 2023-24. Total 34 students completed the courses.

Dr Karade himself bagged four gold medals, five silver medals. He has also secured all India top spot in seven examinations. For his contribution, NPTEL has reconginised as Single Point of Contact (SPOC).

Laxmi Ravidas has been awarded gold medal.

The student bagging silver medals include Chaitanya Gadekar, Vaishnavi Gomase, Sneha Bankar, Soumya Pande, Komal Patel, Falguni Sadavarte, Srushti Waghmare, Khushbu Kolhe, Rutu Bhayani, and Mayuri Jain.

Chaitanya Gadekar has won the silver medal twice.

NPTEL recognised five students as 'NPTEL Believer' for completing more than four exams. These include Aditya Narnaware, Karuna Shahani, Apurva Bambal, Prachi Khobragade, and Shailesh Dongre.

तरुण भारत
Nagpur Main | 2024-10-11 | Page- 7
epaper.tarunbharat.net

## विद्यापीठ परीक्षांवर सीसीटीव्हीची नजर

**कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यावर भर**

◆ नागपूर, १० ऑक्टोबर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्र परीक्षा १६ नोव्हेंबरपासून नियोजित आहेत. त्याचे संभाव्य वेळापत्रकही विद्यापीठाने तयार केले आहे. पण विधानसभा निवडणुकीच्या तारखा पाहून ते अंतिम केले जाणार आहे. विद्यापीठाशी संलग्नित उच्च महाविद्यालयांमधील सुमारे १ लाख विद्यार्थ्यांचे या वेळापत्रकाकडे लक्ष लागले आहे.

राज्यातील सर्वच विद्यापीठांच्या पहिल्या सत्र परीक्षा साधारणतः ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्येच होतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने हिवाळी परीक्षा १५ ऑक्टोबर २०२४ पासून सुरू होत आहेत. विद्यापीठ परिक्षेत्रातील एकूण १३६ परीक्षा केंद्रांवर या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठाच्या सत्र १, ३, ५ व ७ नियमित परीक्षा १६ नोव्हेंबरपासून घेतल्या जाणार आहेत. या सर्व हिवाळी परीक्षांचे निकाल ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी लावण्याचे परीक्षा विभागाचे नियोजन आहे.

दरम्यान, परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्या यासाठी देखील विद्यापीठाचे प्रयत्न आहेत. बहुतेक परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असल्याचा दावा विद्यापीठाने केला आहे. परीक्षा सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली होतील, असेही विद्यापीठाकडून सांगितले जात आहे. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी भरारी पथके देखील असणार आहेत. पेपर झाल्यावर लगेचच त्या-त्या विषयांच्या उत्तरपत्रिका तपासण्याची कार्यवाही केली जाणार असून, पारंपरिक अभ्यासक्रमांचे पेपर ऑफलाईन पद्धतीने, तर व्यावसायिक अभ्यासक्रमांचे पेपर ऑनस्क्रीन पद्धतीने तपासले जाणार आहेत. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालयातच होणार आहे. पण, त्यापुढील वर्गाच्या (द्वितीय, तृतीय किंवा अंतिम वर्ष) परीक्षा विविध महाविद्यालयांमध्ये घेण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

**वेळापत्रकानुसार परीक्षा घेण्याचे नियोजन**

विद्यापीठाच्या सत्र परीक्षा १६ नोव्हेंबरपासून नियोजित असून त्याचे संभाव्य वेळापत्रक करण्यात आले आहे. पण, विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यावर वेळापत्रकात बदल करायचा की आहे त्याच वेळापत्रकानुसार परीक्षा घ्यायच्या, याचा निर्णय होईल.

**दीक्षाभूमीवरील भाविकांना अजनी स्थानकावर उतरण्याची व्यवस्था**

नागपूर : मध्य रेल्वेच्या अजनी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ आणि ३ वर विविध विकासकामे केली जात आहेत. त्यामुळे अजनी स्टेशनचे दोन्ही प्लॅटफॉर्म तात्पुरते बंद करण्यात आले असले तरीही दीक्षाभूमीवरील भाविक रेल्वे स्थानकावर उतरू शकतील, अशी सूचना रेल्वेकडून देण्यात आली आहे. नागपूरला येणारे प्रवासी आणि भाविकांच्या सोईसाठी अजनी स्थानकावर उतरण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नागपूर रेल्वेस्थानकाच्या फलाट क्रमांक ८ वरून प्रवाशांना प्रवास करता येणार आहे. प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

## दीक्षाभूमि पर नागपुर विवि का मार्गदर्शन केंद्र

भास्कर संवाददाता। नागपुर.

68वें धम्मचक्र प्रवर्तन दिवस के अवसर पर राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय एवं पिछड़ा वर्ग कर्मचारी संगठन के सहयोग से दीक्षाभूमि पर सूचना एवं मार्गदर्शन केंद्र शुरू किया जाएगा। विद्यार्थियों के लिए उपयोगी सूचना एवं मार्गदर्शन केंद्र का उद्घाटन शनिवार, 12 अक्टूबर सुबह 11.30 बजे कृषि महाविद्यालय छात्रावास के पास दीक्षाभूमि परिसर में किया जाएगा। कार्यक्रम की अध्यक्षता प्रभारी कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे करेंगे। उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. मिलिंद बाराहाते के हस्ते होगा। राज्य के मुख्य वन संरक्षक डॉ. किशोर मानकर, कुलसचिव डॉ. राजू हिवसे और पूर्व रजिस्ट्रार डॉ. पूरणचंद्र मेश्राम की मुख्य उपस्थिति रहेगी। इस केंद्र के माध्यम से विद्यार्थियों को उपयोगी सूचना पुस्तिका वितरित की जाएगी। नागपुर विश्वविद्यालय और राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय पिछड़ा वर्ग कर्मचारी संघ पिछले 23 वर्षों से लगातार इस गतिविधि को क्रियान्वित कर रहा है। सफलतार्थ राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय पिछड़ा वर्ग कर्मचारी संगठन के अध्यक्ष दिनेश दखने, महासचिव डॉ. चंद्रमणि सहारे, दर्पण गजभिये, मनोज इंगले, शरद बागड़े, विलास बनसोड, आकाश भगत, मनीष फुलझेले प्रयासरत हैं।

दैनिक भास्कर
Sat, 12 October 2024
https://epaper.bhaskarhindi.com/c/76

## दीक्षाभूमी येथे विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे माहितीकेंद्र

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

माहिती व मार्गदर्शन केंद्र राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व मागासवर्गीय कर्मचारी संघटना यांच्यावतीने ६८व्या धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त येथे माहिती आणि मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे.

कृषी महाविद्यालय वसतिगृहाजवळ आज, शनिवारी सकाळी ११:३० वाजता हे उद्‌घाटन करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे राहतील तर उद्‌घाटक म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते उपस्थित राहतील. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे व माजी कुलसचिव डॉ. पूरणचंद्र मेश्राम यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी माहिती पुस्तिका वितरित केली जाणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेच्यावतीने हा उपक्रम मागील २३ वर्षांपासून सातत्याने राबविला जात आहे.

नवभारत

## विश्वविद्यालय शीतकालीन परीक्षाएं कल से

■ नागपुर, शहर संवाददाता. आरटीएम नागपुर विश्वविद्यालय शीतकालीन 2024 परीक्षाएं मंगलवार 15 अक्टूबर से शुरू हो रही है. शीतकालीन परीक्षा के संबंध में प्राचार्य एवं केंद्राधीक्षक की पूर्व तैयारी बैठक परीक्षा भवन में आयोजित की गई. परीक्षा एवं मूल्यांकन बोर्ड के प्रभारी निदेशक संजय कविश्वर ने मार्गदर्शन किया. परीक्षा कुल 136 परीक्षा केंद्रों पर आयोजित की जाएगी. विश्वविद्यालय के सत्र 2, 4, 6 और 8 के पूर्व छात्रों की परीक्षाएं मंगलवार को आयोजित की जाएगी. शीतकालीन नियमित परीक्षा 16 नवंबर से कराने की योजना बनायी है, जबकि इसकी शुरुआत 15 अक्टूबर से हो रही है. महाविद्यालय स्तर पर विश्वविद्यालय सत्र 1, 3, 5 एवं 7 को नियमित परीक्षाएं 16 नवंबर से आयोजित की जाएंगी. परीक्षा विभाग इन सभी शीतकालीन परीक्षाओं के नतीजे 31 दिसंबर से पहले जारी करने की योजना बना रहा है. उपकुलसचिव नवीनकुमार मुंगले ने उपस्थित लोगों को परीक्षा के संबंध में पूरी जानकारी दी. उपकुलसचिव मोतीराम तड़स ने ऑनलाइन परीक्षा के संबंध में जानकारी दी. इस अवसर पर सहायक रजिस्ट्रार डी. एस. पवार, उमेश लोही, नितिन कड़बे उपस्थित थे.

Nagpur Plus Edition
Oct 14, 2024 Page No. 4
Powered by: navbharatlive.com

TheHitavada
Nagpur City Line | 2024-10-16 | Page- 5
ehitavada.com

## Bramhe's research ranked first at international conference



IN an international conference held at Institute of Pharmaceutical Research GLA University, Mathura, Pratiksha Bramhe, a student of RTMNU's Department of Pharmaceutical Sciences, presented a research paper and was awarded 1st rank. The conference was on 'Innovations in Chemical, Biological and Pharmaceutical Sciences'. Pratiksha presented a paper on 'Development and Evaluation of Polymeric Biomaterial Hydrogel for 3D Bioprinting' and bagged top rank. She did her research under Prof Dr Prafulla Sable. She credits her success to Dr Prashant Bokare, Vice-Chancellor of RTMNU, Dr Raju Hiwase, Registrar, Dr Prashant Puranik, HoD - Pharmaceutical Sciences Dept., and her parents.

Powered by iDocuments

TheHitavada
Nagpur City Line | 2024-10-15 | Page- 2
ehitavada.com

## RTMNU pays respect to Rashtrasant Tukadoji Maharaj on death anniversary

■ Staff Reporter



Garland being put up on the statue of Rashtrasant Tukadoji Maharaj at RTMNU premises.

RTMNU paid obeisance to Rashtrasant Tukadoji Maharaj on his death anniversary, recently. A floral garland was offered to his statue at Mahatma Jyotiba Phule Educational Premises, RTMNU. A short film based on the life of Tukadoji Maharaj was also shown on the occasion.

Dr Prashant Bokare, Vice Chancellor of RTMNU; Dr Raju Hiwase, Registrar; Dr Prashant Maheshwari, Dean of Science and Technology; Dr Shamrao Koreti, Dean of History Department; Dr Prashant Kadu, Dean of Interdisciplinary Studies; Dr Harish Paliwal, Finance and Account Officer; Dr Smita Acharya, Director of IQAC; Dr Prafulla Sable, former Director of Examination and Evaluation; Dr Vijayalakshmi Thote, Head of Rashtrasant Tukadoji Maharaj Adhyasan; Dr Rajendra Kakde, Dr Moiz Mannan Haq, Dr Sanjay Doble, Dr Saroj Shamkuwar, Dr Sanyukta Thorat, Dr Rahul Kharabe were present.

Prof Manoj Vishnukar, Producer of the film, members of Shri Gurudev Seva Mandal including Deepak Ingale, Vitthal Kathole, Subhashrao Warhokar were also present.

तरुण भारत
Apla Nagpur | 2024-10-14 | Page- 4
epaper.tarunbharat.net

## विधि शाखा अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

◆ नागपूर, १३ ऑक्टोबर

विधि शाखेतील अभ्यासक्रमांना 'अच्छे दिन' आले असून, विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये जिल्ह्यातील अकराशेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी एलएल. बी. अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. यात मुलांप्रमाणे मुलींचेही प्रमाण लक्षणीय आहे.

विधि शाखेतील अभ्यासक्रम एलएल. बी.मध्ये तीन वर्षे व पाच वर्षे असे दोन पर्याय उपलब्ध आहेत. पाच वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रम प्रवेशासाठी इयत्ता बारावीपर्यंतची शैक्षणिक अर्हता आहे, तर तीन वर्षे एलएल. बी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पदवीनंतर प्रवेश संधी उपलब्ध असते. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी सेलतर्फे प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती. प्रवेश फेऱ्यांची प्रक्रिया नुकतीच पार पडली. प्राप्त आकडेवारीनुसार दोन्ही अभ्यासक्रम मिळून जिल्ह्यात सुमारे १५०० विद्यार्थ्यांनी एलएल. बी.च्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे. रिक्त जागांची संख्या शंभरपेक्षा कमी आहे. विधि शाखेकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असल्याचे निरीक्षण या क्षेत्रातील तज्ज्ञांनी नोंदविले.

सीईटी परीक्षेत कमी पर्सेंटाईल मिळालेल्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी व्यवस्थापन कोट्याच्या जागांवर प्रवेशासाठी प्रयत्न सुरू असल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे विधि महाविद्यालयांत विद्यार्थी पालकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या दिवसपर्यंत प्रवेशासाठी घाम गाळत असलेल्या विद्यार्थ्यांचे दृश्य पाहायला मिळाले. ◂(तभा वृत्तसेवा)

## RTMNU forms Chemistry Society for academic session 2024-25

■ Staff Reporter



Faculty and student members of Chemistry Society of Post Graduate Chemistry Department, RTMNU.

UNDER Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University's Post Graduate Chemistry Department, a 'Chemistry Society' is formed for the academic year 2024-25. Faculty members and students are the members of the Society.

The Society was formed in a formal ceremony held in the prominent presence of Dr Prashant Bokare, Vice Chancellor; Dr N N Karade, Head of Department; Dr Ramesh Kumar, Principal Scientist of Solid and Hazards Waste Divison, CSIR-NEERI; and Professor W B Gurnule.

Dr Ramesh Kumar explained the importance of Chemistry Society at global and national level. Yukti Patel, a second year student, informed about the facilities, infrastructure and academic environment provided to the students by the informed about the various activities organised by the Society in the previous session.

The members of Chemistry Society include Dr Vijay Tangde, Teacher Incharge; Yukti Patel, President; Jyoti Pillai, Vice President; Amrita Rupchandani, Secretary; Akash Shruti Pawar, Treasurer; Anchal Chaudhary, Jt Treasurer; and Prutha Devaikar, Prateek Bhagat, Vibha Tated, Arpita Gadhane, as members.

Amrita Rupchandani and Manisha Thakur conducted the proceedings and Jyoti Pillai, Vice President, delivered the



## प्रतीक्षाच्या नावीन्यपूर्ण संशोधनास प्रथम क्रमांक

नागपूर : मथुरा येथील इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटिकल रिसर्च जीएलए युनिव्हर्सिटी येथे ४ व ५ ऑक्टोबर रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील विद्यार्थिनी प्रतीक्षा ब्रह्मे हिने सादरीकरण केलेल्या संशोधन कार्यास प्रथम क्रमांक मिळाला आहे. मथुरा येथे 'केमिकल, बायोलॉजिकल आणि फार्मास्युटिकल सायन्सेसमधील नवकल्पना' या विषयावरील चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. यात आठशेहून अधिक संशोधक सहभागी झाले होते. यामध्ये 'थ्रीडी बायोप्रिंटिंगसाठी पॉलिमेरिक बायोमटेरियल हा... आणि मूल्यमापन' या विषयावर प्रतीक्षाने संशोधन पेपर सा... क्रमांक प्राप्त केला. तिला डॉ. प्रफुल्ल साबळे यांनी संशोधनासा... तिने तिच्या यशाचे श्रेय विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत ... डॉ. राजू हिवसे, फार्मसी विभागप्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक, संशो... प्रफुल्ल साबळे, डॉ. प्रमोद खेडेकर आणि तिच्या पालकांना ... थ्रीजी बायोप्रिंटिंग तंत्रज्ञान संशोधनावर आधारित दोन संशो... अत्यंत प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आ...

तरुण भारत
Apla Nagpur | 2024-10-15 | Page- 3
epaper.tarunbharat.net



## पर्यावरण संतुलनात वन्यजीवांची महत्त्वपूर्ण भूमिका

**मुख्य वनसंरक्षक किशोर मानकर यांचे प्रतिपादन | वन्यजीव सप्ताहानिमित्त प्राणिशास्त्र विभागात व्याख्यान**

◆ नागपूर, १४ ऑक्टोबर

पर्यावरणाचे संतुलन राखण्यात वन्यजीवांची महत्वपूर्ण भूमिका असल्याचे प्रतिपादन मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागात वन्यजीव सप्ताहानिमित्त आयोजित व्याख्यानात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या मार्गदर्शनात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. टी. धुर्वे होते. राज्य रेशीम संचालनालयातील उपसंचालक महेंद्र ढवळे यांची उपस्थिती होती. डॉ. मानकर पुढे यांनी, संघराज्य लोकसेवा आयोग परीक्षा, भारतीय वनसेवा परीक्षेबाबत माहिती दिली. वन्यजीवांचे संरक्षण तसेच संवर्धन करण्याबाबत त्यांनी माहिती दिली. वन्यजीवांचे जैवविविधतेतील योगदान आणि शेतीवर त्यांच्या प्रभावाबद्दल भारतीय संविधानाच्या कलम ५१ वर लक्ष केंद्रित करून त्यांनी नागरिकांच्या वन्यजीव संवर्धनाबाबत असलेल्या जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या. विविध वन्यजीव संरक्षण कायद्यांचा आढावा घेताना त्यांनी संकटात असलेल्या प्रजातींना आणि त्यांच्या अधिवासांचे संरक्षण करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना उत्तर देत वन्यजीव संरक्षणाच्या व्यावहारिक उपाययोजना आणि जनजागृतीच्या महत्त्वावर चर्चासत्र चालवले.

रेशीम संचालनालयाचे उपसंचालक ढवळे यांनी रेशीम शेतीबाबत संपूर्ण माहिती दिली. रेशीम किड्यांच्या जीवनचक्राचा उल्लेख त्यांनी केला. मलबरी झाडांच्या लागवडीपासून कच्च्या रेशमाच्या तंतूंच्या काढणीपर्यंतची प्रक्रिया स्पष्ट केली. त्यांनी रेशीम उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठीच्या संधींचा उल्लेख केला. भारतातील रेशीम उत्पादनाच्या स्थितीचा सखोल अभ्यास करताना त्यांनी रेशीम उत्पादनात देशाच्या समृद्ध वारशाबद्दल आणि त्याच्या संवर्धनासाठी चालू असलेल्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला. डॉ. आशिककुमार नागवंशी यांनी अतिथींचा परिचय करून दिला. विभाग प्रमुख डॉ. व्ही. टी. धुर्वे यांनी अतिथींना सन्मानित केले. यावेळी डॉ. एस. सी. मासराम उपस्थित होते. ◂(तभा वृत्तसेवा)

Powered by iDocuments



'ट्रान्सक्रिप्टोमिक अॅनालिसिस रिव्हिल्स दॅट निफेया ओडोराटा एक्स्ट्रॅक्ट अँड फ्रॅक्शन्स अपरेग्युलेट दी अॅपोप्टोसिस, ऑटोफेजी, अॅण्ड अनफोल्डेड प्रोटीन कॅनॉनिकल पाथवेज्इन एमसीएफ-७ सेल्स' आणि 'नोव्हेल कॉम्बिनेशन अॅप्रोच टू इनहॅन्स सोल्यूबिलीटी अॅण्ड पर्मिबिलीटी ऑफ पाझोपॅनिब यूझिंग फॉस्पोलिपीड कॉम्प्लेक्स अॅण्ड ए बायोएन्हान्सर' असे डॉ. निशिकांत राऊत यांच्या संशोधन पेपरचे विषय आहे. या संशोधनासोबतच डॉ. निशिकांत राऊत हे युनिव्हर्सिटी ऑफ इलिनॉयज अॅट शिकागो आणि सेंट जॉन फिशर युनिव्हर्सिटी, रोचेस्टर येथे सहचार्याच्या संधींचा शोध घेण्यासाठी देखील भेट देणार आहेत. या भेटीमुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि या प्रतिष्ठित संस्थांमध्ये अर्थपूर्ण भागीदारी आणि ज्ञानाचे आदानप्रदान साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सोबतच डॉ. राऊत यांचे औषधी निर्माण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाचे महत्त्व देखील अधोरेखित करते.

**नवराष्ट्र**

उपलब्धी • रातुम नागपूर विद्यापीठाची आंतरमहाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धा

## सौरव तिवारी, तेजस्विनी लामकाने अव्वल

नागपूर, शहर प्रतिनिधी. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची आंतरमहाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धा रविवार, 20 ऑक्टोबरला रविनगर स्थित सिंथेटिक ट्रॅकवर पार पडली. क्रॉसकंट्री स्पर्धेत एस. बी. सिटी महाविद्यालयाचा विद्यार्थी सौरव तिवारी आणि महिलांमध्ये तेजस्विनी लामकाने 'अव्वल' ठरले. अमरावती मार्गावर नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर प्रारंभ व सिंथेटिक ट्रॅकवर समाप्त पुरुषांची 10 किलोमीटर स्पर्धा सौरवने 31 मिनिटे 26.42 सेकंदांत पूर्ण करीत विजेतेपद पटकावले. गौरव खोडकर दुसऱ्या आणि रितिक पंचबुद्धे तिसऱ्या स्थानी राहिले. महिलांच्या 10 किमी स्पर्धेत सुरुवातीपासून आघाडी घेणाऱ्या तेजस्विनीने 35 मिनिटे 58.03 सेकंदांत पूर्ण करीत विजेतेपद पटकावले. आरती भगत दुसऱ्या आणि मिताली भोयर तिसऱ्या स्थानी राहिली. पुरुष गटात भारसिंगी येथील अरविंदबाबू देशमुख महाविद्यालयाने लागोपाठ चौथ्या वर्षी सांघिक विजेतेपद पटकावले.

यावेळी राज्यपाल नामीत विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बन्सोड, अधिसभा सदस्य दिनेश शेराम, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या प्रभारी संचालक डॉ. विशाखा जोशी, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, डॉ. नितीन जंगीटवार, डॉ. विजय दातारकर व पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर यांची उपस्थिती होती. पुरुष व महिला गटात पहिल्या तीन स्थानांवरील धावपटूंना व विजेत्या संघाला व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बन्सोड व अधिसभा सदस्य दिनेश शेराम यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. संचालन डॉ. आदित्य सोनी यांनी केले.



**निकाल (सहा स्थानावरील) पुरुष (10 किलोमीटर) :** सौरव तिवारी (एस.बी. सिटी कॉलेज-31 मि. 26.42 से.), गौरव खोडकर (आर्ट, कॉमर्स नाइट कॉलेज-31 मि. 43.22 से.), रितिक पंचबुद्धे (आयडीसीपीई-31 मि. 59.59 से.), समित टोंग (एस.बी. सिटी कॉलेज-32 मि. 38.13 से.), मनीष पाठे (एडी कॉलेज भारसिंगी 32 मि. 48.53 से.), प्रणय माहुर्ले (आर्ट, कॉमर्स नाइट कॉलेज -32 मि. 53.66 से.).

**महिला (10 किलोमीटर) :** तेजस्विनी लामकाने (पीजीटीडी- 35 मि. 58.03 से.), आरती भगत (सी.जे. पटेल कॉलेज तिरोडा-39 मि. 05.30 से.), मिताली भोयर (चक्रपाणी कॉलेज-40 मि. 08.14 से.), सरस्वती सिंग (जेसीपीई-40 मि. 34.28 से.), शालू (गोंदिया-42 मि. 04.93 से.), चैताली बोरेकर (42 मि. 55.43 से.).

Orange City Plus Edition
Oct 22, 2024 Page No. 5
Powered by: NavaRashtra.com

**पुण्य नगरी**

## विद्यापीठात महर्षी वाल्मीकी जयंती



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महर्षी वाल्मीकी जयंती साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात गुरुवारी आयोजित कार्यक्रमात प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनात संजय बाहेकर यांच्या हस्ते महर्षी वाल्मीकी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी गणेश कुमकुमवार, शैलेश राठोड, प्रेमदास वाडकर यांच्यासह प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

Nagpur Edition
Oct 19, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

**लोकसत्ता**

२ ऑक्टोबर २०२४ | लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM | ९ | नागपूर दिनांक

## दर्जेदार वाचनासाठीचा सलग अवकाशच हरवला - डॉ. लेंडे

लोकसत्ता प्रतिनिधी



नागपूर : दर्जेदार वाचनासाठीचा सलग अवकाशच हरवला असल्याची खंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी व्यक्त केली. माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस वाचन प्रेरणादिन म्हणून पदव्युत्तर मराठी विभागात साजरा करण्यात आला. या अभिवाचन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. लेंडे बोलत होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विभागातील प्रा. डॉ. प्रज्ञा निनावे, प्रा. अमित दुर्योधन, प्रा. प्रज्ञा दुधे यांची उपस्थिती होती. डॉ. लेंडे म्हणाले, 'आज तंत्रज्ञानाच्या युगात भ्रमणध्वनीमुळे आपण एकमेकांच्या संपर्कात असणे सहजसोपे झाले असले, तरी त्यातील संदेश माहिती देण्यापुरते मर्यादित आहेत, माणसाच्या मन आणि मेंदूला ऊर्जितावस्था देणारे नाहीत. वाचन प्रेरणादिन कार्यक्रमात विभागातील विद्यार्थी दिनेश बांडेबुचे, वैशाली फुले, सीमा हटवार, हेमलता वानखेडे, मानसी रामटेके, ऐश्वर्या शिंदे यांनी विविध पुस्तकांतील निवडक उताऱ्यांचे वाचन केले. प्रा. डॉ. निनावे यांनी आपल्या मार्गदर्शनात वाचनामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडत असल्याचे सांगितले. प्रास्ताविक करताना प्रा. दुर्योधन यांनी दर्जेदार वाचन माणसाच्या चिंतनात, त्याच्या समाज व्यवहारात त्याला संवेदनशील व्यक्ती म्हणून घडवते, असे सांगितले. संचालन विद्यार्थिनी विशाखा पवार हिने केले, तर वैशाली फुले हिने आभार मानले.

22/10/2024 | Nagpur | Page : 9
Source : https://epaper.loksatta.com



## ज्येष्ठांच्या समस्यांबाबत सकारात्मक!

नागपूर : ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची मदत घेण्यासंदर्भात सादर केलेल्या सामंजस्य कराराच्या प्रस्तावाला कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. महामंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रभूजी देशपांडे, सचिव अॅड. अविनाश तेलंग, डॉ अरविंद शेंडे आणि उल्हास शिंदे यांनी अलीकडेच कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांची प्रत्यक्ष भेट घेतली व त्यांना ज्येष्ठांसाठी विशेष सेवा प्रकल्प सामंजस्य कराराचे प्रारूप सादर केले. कुलगुरूंनी या प्रारूपावर गांभीर्याने विचार करून ज्येष्ठांना विविध प्रकारच्या सोयीसुविधा व सवलती कशा प्रदान केल्या जातील, यावर निर्णय घेण्याबाबत सकारात्मक भूमिका मांडली आणि या उपक्रमाचे कौतुक केले, अशी माहिती अॅड. अविनाश तेलंग यांनी दिली.

**नवभारत**

## संशोधकों की टीम के 3 महीने में 17 पेटेंट

### नागपुर विवि को राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय स्तर पर मिला स्थान



नागपुर, महानगर संवाददाता. नागपुर विश्वविद्यालय के भौतिकशास्त्र विभाग के वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय ढोबले व उनके मार्गदर्शन में कार्य कर रहे संशोधक विद्यार्थियों ... संशोधक विद्यार्थियों में डॉ. शामली मुले, डॉ. अमित कंडोड, ... आर.एस. मेश्राम, डॉ. निरुपमा ढोबले, ...

Nagpur Plus Edition
Oct 24, 2024 Page No. 4
Powered by: navbharatlive.com

**सकाळ**

## तिवारी, लांबकानेला प्रथमच विजेतेपद

### अरविंदबाबू देशमुख महाविद्यालयाचा सलग चवथ्या वर्षी डंका

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २१ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत एस. बी. सिटी महाविद्यालयाच्या सौरव तिवारी व पीजीटीडीच्या तेजस्विनी लांबकानेने अनुक्रमे पुरुष व महिलांची १० किलोमीटर शर्यत जिंकून प्रथमच विजेतेपदाला गवसणी घातली. पुरुषांत अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय भारसिंगीने सलग चौथ्या वर्षी सांघिक विजेतेपद पटकाविले.

अमरावती मार्गावरील विद्यापीठ क्रीडा परिसरातून शर्यतीला प्रारंभ झाला. विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य समय बन्सोड व दिनेश शेराम यांनी शर्यतीला झेंडी दाखवली. आणि शर्यतीनंतर त्यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. पुरुषांत शर्यतीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत तिवारी, खोडतकर व पंचबुद्धे यांच्यात चुरस होती. शेवटचे तीन किलोमीटर अंतर शिल्लक असताना तिवारीने वेग वाढविला शर्यत जिंकली. गेल्यावर्षी त्याचे विजेतेपद थोडक्यात हुकले होते. गेल्यावर्षी दहाव्या स्थानावर असलेल्या गौरवने प्रथमच दुसरे स्थान मिळवित विद्यापीठ संघात स्थान निश्चित केले.

महिलांच्या शर्यतीत तेजस्विनी लांबकानेला आव्हानच नव्हते. तिने सुरुवातीपासून आघाडी कायम ठेवली होती. गतवर्षी ती तिसऱ्या स्थानावर होती. आरती भगतने प्रथमच दुसरे स्थान मिळविले.

महिला गटात एकाही संघाला सांघिक विजेतेपद देण्यात आले नाही. पुरुषांत फक्त २६ तर महिलांत फक्त १४ धावपटूंनी शर्यत पूर्ण केली. दोन्ही गटातील प्रथम सहा खेळाडूंची पुढील महिन्यात मंगळूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड करण्यात येईल.



नागपूर : समय बन्सोड, दिनेश शेराम, डॉ. विशाखा जोशी व इतर मान्यवरांसोबत आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत प्रथम तीन स्थान मिळविणारे खेळाडू.

**निकाल असे**

(पुरुष-१० कि.मी.) : सौरव तिवारी (एस. बी. सिटी - ३१ मि.२६ से.), गौरव खोडतकर (आर्टस, कॉमर्स नाईट कॉलेज - ३१ मि.४३ से), रितिक पंचबुद्धे (आयडीसीपीई - ३१ मि.५९ से), समित टोंग (एस. बी. सिटी), मनीष पाठे (एडीएम भारसिंगी), प्रणव माहुले (आर्टस, कॉमर्स कॉलेज). महिला (१०.कि.मी.) : तेजस्विनी लांबकाने (पीजीटीडी - ३५ मि.५८ से), आरती भगत (सी.जे. पटेल तिरोडा - ३९ मि.०५ से), मिताली भोयर (चक्रपाणी महाविद्यालय - ४० मि.०८ से), सरस्वती सिंग (जेसीपीई), शालू (साकेत शारीरिक शिक्षण महाविद्यालय.), चैताली बोरेकर (चक्रपाणी महाविद्यालय).

**सकाळ**

## अमरावतीसह नागपूर, सातारा संघाची आगेकूच

### पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेचे शानदार उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा



अमरावती : कबड्डी स्पर्धेतील रंगलेला सामना.

Nagpur Main
23/10/2024 Page No. 6

सकाळ

# जेसीपीईला कुस्तीचे विजेतेपद



नागपूर : प्राचार्य डॉ. विजय दातारकर व अन्य मान्यवरांसोबत विजेत्या जोतिबा महाविद्यालयाचे कुस्तीपटू.

नागपूर, ता. २२ : जोतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने (जेसीपीई) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे आयोजित पुरुष व महिलांच्या आंतरमहाविद्यालयीन फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेत विजेतेपद पटकावले.

स्पर्धेत जोतिबा महाविद्यालयाने पुरुष गटात ४६ गुणांसह प्रथम स्थान मिळविले. कामठीच्या एस. के. पोरवाल महाविद्यालयाने उपविजेतेपद मिळविले. महिला गटात जोतिबा महाविद्यालयाने १३ गुणांसह पहिले व नाशिकराव तिरपुडे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने सहा गुणांसह द्वितीय स्थान मिळविले.

स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या प्रभारी संचा… डॉ. विशाखा जोशी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी लोकमान्य टिळक इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्चचे प्राचार्य डॉ. कार्तिक उत्तरवार, जोतिबा कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजय दातारकर, स्पर्धा प्रमुख डॉ. सुरेंद्र तिवारी यांच्यासह डॉ. राजू राऊत, डॉ. मोहन कडवे, डॉ. सोनाली बांद्रे, प्रा. नितीन येमदे आदी

Nagpur, Main
23/10/2024 Page No. 8

लोकमत

# संजय ढोबळे यांच्या संशोधन समूहाचे ३ महिन्यांत तब्बल १७ पेटंट

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे व त्यांचे संशोधक विद्यार्थी यासह संशोधक सहयोगी यांनी संयुक्तपणे काम करून त्यांच्या १७ पेटंटला मागील ३ महिन्यांत मान्यता प्राप्त झाली आहे. डॉ. ढोबळे व त्यांच्या संशोधक सहयोगींनी ल्युमिनिसेन्स मटेरियल विषयात संशोधनास लागणारे व समाजपयोगी कार्यावर नवकल्पनांना प्रोत्साहित करीत तब्बल १७ पेटंट प्राप्त केले आहे.

भौतिकशास्त्रासह आंतर विषयांमध्ये भौतिकशास्त्राची उपयोगिता सांगत वर्षानुवर्षे संशोधनाची कल्पना व त्यावर विचारपूर्वक कार्य करून त्यांनी एकूण १७ पेटंटला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला संशोधनाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी उत्कृष्ट कार्य केले आहे. डॉ. ढोबळे यांचे एकूण ८० पेटंट असून त्यापैकी ४७ पेटंटला मान्यता मिळाली आहे, हे विशेष.

त्यांच्या १७ पेटंटमध्ये त्यांचे सहकारी संशोधक व संशोधक विद्यार्थ्यांमध्ये डॉ. शामली गुप्ते, डॉ. अमित बंसोड, प्रियल चौधरी, सागर पवार, डॉ. यातिश परवाह, राहुल पवार, डॉ. नयना शिरभाते, प्रतीक तायडे, डॉ. वैशाली पिंपळे, डॉ. सीमा निंबार्ते, डॉ. नीरजा हरदास, डॉ. अर्चना कुलकर्णी, प्रीती डोंगरे, डॉ. प्रशांत शिंदे, डॉ. चंद्रशेखर डोईफोडे, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. रूपाली महाखोंडे, डॉ. अतुल येरपुडे, डॉ. राकेश रॉय, डॉ. श्वेता पार्वे, चंद्रहास नंदनवार, डी. एम. परशुरामकर, आर. एस. मेश्राम, डॉ. निरुपमा ढोबळे, डॉ. विभा चोपडा, डॉ. आरती मुळे, डॉ. स्वाती बिश्नोई, डॉ. शरद देशमुख यांनी कार्य केले आहे. भौतिकशास्त्र विभागातील शिक्षक व त्यांच्या संशोधक सहकाऱ्यांनी तब्बल १७ पेटंट मिळवीत यश प्राप्त केल्याने विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर सर्व शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.



कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. संजय ढोबळे यांच्यासह संशोधक सहयोगी व संशोधक विद्यार्थी.

Hello Nagpur
Page No. 8 Oct 24, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# ज्येष्ठांना मिळणार विद्यापीठाचा आधार



नागपूर : ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची मदत घेण्यासंदर्भात सादर केलेल्या सामंजस्य कराराच्या प्रस्तावाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. महामंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रभुजी देशपांडे, सचिव अॅड. अविनाश तेलंग, डॉ. अरविंद शेंडे आणि उल्हास शिंदे यांनी नुकतीच कुलगुरू डॉ. बोकारे यांची भेट घेत त्यांना 'ज्येष्ठांसाठी विशेष सेवा प्रकल्प सामंजस्य कराराचे प्रारूप सादर केले. कुलगुरूंनी या प्रारूपावर विचार करून ज्येष्ठांना विविध प्रकारच्या सोयीसुविधा व सवलती कशा प्रदान केल्या जातील यावर निर्णय घेण्याबाबत सकारात्मक भूमिका मांडली, असे अॅड. अविनाश तेलंग यांनी कळवले आहे.

देशोन्नती

# महाभारताचे तत्त्वज्ञान प्रत्येक पिढीला मार्गदर्शक

### डॉ. रवी खंगई यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन

नागपूर : महाभारताचे तत्त्वज्ञान येणाऱ्या प्रत्येक पिढीला मार्गदर्शन करणारे आहे, असे प्रतिपादन कर्नाटक केंद्रीय विद्यापीठ येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. रवी खंगई यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभागात सहकार्यक्रम अंतर्गत

१९ ऑक्टोबर रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी डॉ. खंगई मार्गदर्शन करीत होते.

कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे …



म्हणून कर्नाटक केंद्रीय विद्यापीठाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. रवी खंगई यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. खंगई यांनी महाभारताच्या तत्त्वज्ञानातून मानवाला जीवन सुसंगत करण्याची दिशा मिळते, असे सांगितले. महाभारतातील अनेक प्रसंगांचे साम्य वर्तमान …

येते. वेगवेगळ्या कालखंडात महाभारताचा अभ्यास झाला आहे. याच काळात संस्कृत भाषेला फार महत्त्वाचे स्थान होते असे डॉ खंगई म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी आपल्या भाषणात समाजाला नवी दिशा देण्याची ताकद महाकाव्यातील तत्त्वज्ञानात आहे, असे सांगितले. मानवी जीवनाच्या उन्नतीकरिता महाभारत आणि रामायण हे दोन्ही ग्रंथ महत्त्वाचे आहे. या दोन्ही

जाहीर नोटीस

जाहीर नोटीस

देशोन्नती

# 'मोहजाल' नाटिका का मंचन



संचालक डॉ. संजय कविश्वर, विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय

नागपुर। युवकों में बढ़ रहे ड्रग्स एडिक्शन पर जनजागृति करने के लिये अंबाझरी रोड पर गुरुनानक भवन में मोहजाल नाटिका का मंचन मंगलवार को किया गया. राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विद्यापीठ के विद्यार्थी विकास विभाग की ओर से आयोजित इस नाटिका का प्रस्तुतिकरण राधिका क्रिएशन के माध्यम से किया गया. कार्यक्रम में प्रमुख अतिथि के रुप में कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडल के प्रभारी खंडाल की प्रमुखता से उपस्थिति थी. इस नाटक के निर्माता राधिका क्रिएशन व रंजन कला मंदिर नागपुर-पुणे की ओर से किया गया. नाटक के निर्देशक संजय पेंडसे, लेखक प्रसन्ना शेंबेकर, निर्मिती सारिका पेंडसे तर नृत्य निर्देशन सौरभ मसराम का है. 25 मिनट के इस नाटक के माध्यम से युवकों में बढ़ रही ड्रग्स एडिक्शन के बारे में जनजागृति करन का प्रयत्न किया गया. उपस्थित दर्शकों ने भी इस नाटक को जोरदार प्रतिसाद दिया.

Main Edition
Oct 24, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

देशोन्नती

# ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी कुलगुरु सकारात्मक



देशोन्नती वृत्तसंकलन

नागपूरः ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची मदत घेण्यासंदर्भात सादर केलेल्या सामंजस्य कराराच्या प्रस्तावाला रातुम नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

महामंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रभुजी देशपांडे, सचिव अॅड. अविनाश तेलंग, डॉ अरविंद शेंडे आणि उल्हास शिंदे यांनी नुकतीच कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांची प्रत्यक्ष भेट घेतली व त्यांना 'ज्येष्ठांसाठी विशेष सेवा प्रकल्प सामंजस्य कराराचे प्रारूप सादर केले.

कुलगुरूंनी या प्रारूपावर गांभिर्याने विचार करून ज्येष्ठांना विविध प्रकारच्या सोयीसुविधा व सवलती कशा प्रदान केल्या जातील यावर निर्णय घेण्याबाबत सकारात्मक भूमिका मांडली आणि या उपक्रमाचे कौतुक केले, असे अॅड. अविनाश तेलंग यांनी कळविले आहे.

Nagpur Edition
Oct 23, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

# 'महाभारताचे तत्त्वज्ञान प्रत्येक पिढीला मार्गदर्शक'

नागपूर : महाभारताचे तत्त्वज्ञान येणाऱ्या प्रत्येक पिढीला मार्गदर्शन करणारे आहे, असे मत कर्नाटक केंद्रीय विद्यापीठातील इतिहास विभागप्रमुख डॉ. रवी खंगई यांनी …केले. राष्ट्रसंत तुकडोजी … नागपूर विद्यापीठाच्या … इतिहास विभागात आयोजित …त ते बोलत होते. …ानी विभागप्रमुख डॉ. श्याम …ते. …खंगई यांनी, महाभारताच्या …तून मानवाला जीवन सुसंगत करण्याची दिशा मिळते, असे सांगितले. महाभारतातील अनेक प्रसंगांचे साम्य वर्तमानकाळातील मानवी समाजात दिसून येतात. समाजातील अनेक समस्यांचे निराकरण या महाकाव्यांच्या तत्त्वज्ञानात दिसून येते, असेही ते म्हणाले. डॉ. कोरेटी यांनी, समाजाला नवी दिशा देण्याची ताकद महाकाव्यातील तत्त्वज्ञानात असल्याचे सांगितले. प्रास्ताविक आणि वक्त्याचा परिचय डॉ. राम कोरेकर यांनी केला. आभार प्रा. नेहा अफरीन यांनी मानले.





LOKMAT TIMES

# Sourabh, Tejaswini win cross country

Lokmat News Network
NAGPUR

Sourabh Tiwari and Tejaswini Lamkane emerged winners in the Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University Inter-ollege Cross Country Competition held at the university synthetic track on Sunday.

Sourabh finished the men's 10-km event in 31.26.42 seconds. Gaurav Khodkar finished second whereas Hrithik Panchbuddhe achieved third place.

Tejaswini, who took the lead from the start of the women's 10 km race, finished the race in 35. 58.03 seconds and emerged the winner. Aarti Bhagat came second and Mithali Bhoyer finished third. In the men's category, Arvindbabu Deshmukh College, Bharsingi won the individual title for the fourth year in a row. Member of the Management Council Dr.Samay Bansod, senate member Di-…



Prize winners of RTM Nagpur University Inter-College Cross Country with dignitaries.

**Results of inter-college cross coun…**



- Men's 10 km: Sourabh Tiwari (SB City C… 31. 26.42 sec), Gaurav Khodakar (Art, Com… Night College-31. 43.22 sec), Hrithik Panchbuddhe (IDCPE-31. 59.59 Sec.), Sam… Tong (SB City College-32. 38.13 sec.), Mani… Pathe (AD College Bharsinghi 32. 48.53 se… Pranay Mahurle (Arts, Commerce Night C… 32. 53.66 sec.).

THE TIMES OF INDIA, NAGPUR
THURSDAY, OCTOBER 24, 2024

# Dhoble's research grp nets 17 patents

Nagpur: Physics professor **Sanjay Janrao Dhoble** and his team of research students and collaborators from the department of physics at Nagpur University have jointly achieved recognition for 17 patents in the last three months, **reports Sarfaraz Ahmed.**



Dhoble and his research associates were granted these patents for their innovative work in luminescent materials, focusing on socially beneficial applications.

By demonstrating relevance of physics in interdisciplinary fields, they worked on research ideas over the years, securing international and national recognition for a total of 17 patents, thus elevating the university's status on the global research stage. Notably, Dhoble holds 80 patents in total, including 47 recognised.

The team of researchers and students involved in these 17 patents includes Shamli Gupte, Amit Bansod, Priyal Chaudhary, Sagar Pawar, Yatish Parvah, Rahul Pawar, Nayana Shirbhate, Pratik Tayde, Vaishali Pimple, Seema Nimbarte, Neerja Hardas, Archana Kulkarni, Preeti Dongre, Prashant Shinde, Chandrashekhar Doifode, Suvarna Patil, Rupali Mahakhonde, Atul Yerpude, Rakesh Roy, Shweta Parve, Chandrahas Nandanwar, DM Parshuramkar, RS Meshram, Nirupama Dhoable, Vibha Chopra, Aarti Mule, Swati Bishnoi, and Sharad Deshmukh.

Dhobale published 959 research papers on Scopus, with 13,866 citations and an H-index of 48. Recently, he was appointed to the editorial board of the prestigious journal 'Nature'. VC Prashant Bokare, registrar Raju Hiwase, dean Prashant Maheshwari, and physics HOD Omprakash Chimankar congratulated Dhoble.

लोकमत

# युवकांमधील नशेच्या सवयीवर 'मोहजाल'मधून जागृती



नागपूर : युवकांमध्ये वाढत चाललेल्या 'ड्रग्स एडिक्शन'वर जनजागृती करण्यासाठी अंबाझरी रोडवरील गुरुनानक भवन येथे 'मोहजाल' ही नाटिका सादर करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित या नाटिकेचे सादरीकरण राधिका क्रिएशनच्या माध्यमातून करण्यात आले. २५ मिनिटांच्या या नाटकाच्या माध्यमातून युवकांमध्ये वाढत असलेल्या 'ड्रग्स एडिक्शन'बाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपस्थित प्रेक्षकांनीदेखील या नाटकाला भरभरून दाद दिली. या नाटकाची निर्मिती राधिका क्रिएशन व रंजन कला मंदिर नागपूर-पुणे यांच्याकडून करण्यात आली. नाटकाचे दिग्दर्शक संजय पेंडसे, लेखक प्रसन्ना शेंबेकर, निर्मिती सारिका पेंडसे तर नृत्य दिग्दर्शन सौरभ मसराम यांचे आहे. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. संजय कवीश्वर, विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ प्रामुख्याने उपस्थित होते.

Hello Nagpur
Page No. 5 Oct 23, 2024
Powered by: erelego.com

# डॉ. प्रकाश इटनकर यांना डॉ. पारीख पुरस्कार

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच… औषधी निर्माणशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. प्रकाश इटनक… यांना डॉ. के. एम. पारीख स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्या… आले आहे. भारतीय पारंपरिक आशियाई औषध अभ्या… संघटनेच्या वतीने आयुर्वेदिक तत्त्वे आणि निसर्गाच्या नियमां… आधारित नैसर्गिक उत्पादने आणि पद्धती स्थापित करण्या… उत्कृष्ट योगदान दिल्याने डॉ. इटनकर यांना हा मान्यताप्रा… पुरस्कार प्रदान करण्यात आला.

Nagpur Edition
Oct 24, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

TheHitavada

Nagpur City Line | 2024-10-24 | Page- 2
ehitavada.com

# Dr Itankar honoured with Dr K M Parikh Memorial Award





Dr Prakash Itankar being felicitated with the Dr K M Parikh Memorial Award by the members of IAS-TAM-India at Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

■ Staff Reporter

DR PRAKASH Itankar, Professor of Pharmaceutical Engineering Department of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, has been honored with the prestigious Dr K M Parikh Memorial Award.

The award was conferred upon Dr Itankar by the Indian Association for the Study of Traditional Asian Medicine (IASTAM-India).

The award recognises Dr Itankar's significant contributions to the integration of Ayurvedic knowledge with modern scientific research, particularly in natural products and the foundations of Ayurveda.

The ceremony was attended by Dr Prashant Bokare, Vice-Chancellor; Dr Raju Hivse, Registrar and several faculty members, all of whom congratulated Dr Itankar on this well-deserved recognition for his visionary work in bridging traditional and modern medical practices.

Powered by iDocuments

लोकमत

# औषधी निर्माणशास्त्राचे प्रकाश इटनकर यांचा सन्मान



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. प्रकाश इटनकर यांना २०२४ साठीच्या प्रतिष्ठित डॉ. के. एम. पारिख स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भारतीय पारंपरिक आशियाई औषध अभ्यास संघटना यांच्यावतीने आयुर्वेदिक तत्त्वे आणि निसर्गाच्या नियमांवर आधारित नैसर्गिक उत्पादने आणि पद्धती स्थापित करण्यात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल डॉ. इटनकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. के. एम. पारिख स्मृती पुरस्कार हा आयुर्वेदिक औषध संशोधन आणि विकासामध्ये एक दूरदर्शी असलेल्या डॉ. के. एम. पारिख यांच्या स्मरणार्थ दिला जातो. नैसर्गिक उत्पादनांच्या संशोधन आणि विकासात, विशेषतः आयुर्वेदातील वैज्ञानिक पायाभूत तत्त्वे यामध्ये डॉ. इटनकर यांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. आयुर्वेदाच्या तत्त्वज्ञानाचे समजून घेण्यास आणि त्याचा वापर करण्यास प्रगतीच्या दिशेने त्यांचे प्रयत्न आहे. आयुर्वेदिक विज्ञानाचे जतन आणि आरोग्यसेवा क्षेत्रात नैसर्गिक उत्पादनांना अधिक सुलभ आणि वैज्ञानिक मान्यता मिळवण्यासाठी त्यांचे अतुलनीय कार्य आहे.

Hello Nagpur
Page No. 5 Oct 23, 2024
Powered by: erelego.com

TheHitavada
Nagpur City Line | 2024-10-25 | Page- 2
ehitavada.com

# Artificial skin material developed by Molecular Biology researchers at RTMNU

■ Staff Reporter

AN artificial skin material with antimicrobial properties have been developed by the researchers of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University's Department of Molecular Biology. The artificial skin can now be applied to the wound without dressing, exploring possibilities for advanced wound care.

Dr Dayanand Gogle, Head of Molecular Biology Department RTMNU, and Dr Aarti Shanware, Head of Department of Biotechnology, Laxminarayan Innovation Technological University (LITU), completed the research with the support of Bipin Lade, Project Head.

The research work states that it has been a practice for years to bandage the wound with an ointment and traditional wound dressing may not promote healing effectively.

The artificial skin created by the researchers can be applied to the injured area to allow the wound to dry-up and heal. Researchers used ecofriendly components, and it looks similar to natural skin.

The innovative material combines sodium alginate, gelatin, chitosan, and antimicrobial agents. It also include gallic acid and thymolm, these additives properties help prevent infection by killing bacterias. Various medicinal properties contained in the artificial skin have the ability to heal wounds quickly.

Also, this artificial skin will not harm healthy cells, and it is biodegradable even after it is removed from the wound, it will decompose automatically and will not create long-term waste problem.

Under the Rajiv Gandhi Biological Technology (RGBC) Project, RTMNU's Department of Botany, the research was started in 2019-2020. Akash Kandi, a student of Biotechnology Department participated in the research work

# डॉ. ढोबले के रिसर्च ग्रुप के 3 महीने में 17 पेटेंट



भास्कर संवाददाता | नागपुर. राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के भौतिकी विभाग के वरिष्ठ प्रोफेसर डॉ. संजय ढोबले और उनके शोध छात्रों ने मिलकर पिछले 3 महीनों में 17 पेटेंट प्राप्त किए हैं। डॉ. संजय ढोबले और उनके अनुसंधान सहयोगियों को ल्यूमिनेसेंस मटेरियल के क्षेत्र में 17 पेटेंट प्राप्त हुए हैं, जिससे अनुसंधान और सामाजिक कार्यों में नवाचार को बढ़ावा मिला है।

## अंतर्राष्ट्रीय स्तर पर ले जाने का उत्कृष्ट कार्य

डॉ. ढोबले ने शोध का विचार देकर और भौतिक विज्ञान की उपयोगिता बताते हुए कई सालों से सोच-समझकर काम करके कुल 17 पेटेंट को अंतर्राष्ट्रीय और राष्ट्रीय स्तर पर स्वीकृत करवाकर नागपुर विश्वविद्यालय को शोध के माध्यम से अंतर्राष्ट्रीय स्तर पर ले जाने का उत्कृष्ट कार्य किया है।

उल्लेखनीय बात यह है कि, डॉ. ढोबले के पास कुल 80 पेटेंट हैं, जिनमें से 47 पेटेंट को मंजूरी मिल चुकी है।

**शोधकर्ता छात्रों का अभिनंदन :** उनके 17 पेटेंटों में उनके साथी शोधकर्ताओं और शोध छात्रों में डॉ. शामली गुप्ते, डॉ. अमित बंसोड़, प्रियल चौधरी, सागर पवार, डॉ. यातीश परवाह, राहुल पवार, डॉ. नयना शिरभाते, प्रतीक तायडे, डॉ. वैशाली पिंपले, डॉ. सीमा निम्बारते, डॉ. नीरजा हरदास, डॉ. अर्चना कुलकर्णी, प्रीति डोंगरे, डॉ. प्रशांत शिंदे, डॉ. चंद्रशेखर डोईफोडे, डॉ. सुवर्णा पाटिल, डॉ. रूपाली महाखोंडे, डॉ. अतुल येरपुडे, डॉ. राकेश राय, डॉ. श्वेता पार्वे, चंद्रहास नंदनवार, डी. एम. परशुरामकर, आर.एस. मेश्राम, डॉ. निरुपमा ढोबले, डॉ. विभा चोपड़ा, डॉ. आरती मुले, डॉ. स्वाति बिश्नोई, डॉ. शरद देशमुख शामिल हैं। डॉ. ढोबले ने अब तक स्कोपस पर 13,866 सायटेशन, 48 के एच इंडेक्स के साथ 959 शोध पत्र प्रकाशित किए हैं। तदनुसार, गूगल स्कॉलर पर उनका सायटेशन 16,953, एच-इंडेक्स 54 और आई-टेन इंडेक्स 456 है। उपरोक्त शोध में उनके अनुभव को देखते हुए यह विशेष है कि उन्हें हाल ही में प्रतिष्ठित जनरल के संपादकीय बोर्ड में लिया गया है। इस सफलता के लिए प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान एवं प्रौद्योगिकी संकाय के अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी और भौतिकी विभाग के प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमनकर ने डॉ. ढोबले और उनके शोधकर्ता छात्रों का अभिनंदन किया है।




Fri, 25 October 2024
skarhindi.com/c/76110571

TheHitavada
Nagpur City Line | 2024-10-25 | Page- 4
ehitavada.com

# JCPE are overall champs



JYOTIBA College of Physical Education (JCPE) emerged overall champions in men and women categories in the inter-college wrestling competition held recently.

The wrestlers won the championship in freestyle category.

The men team garnered 46 points to emerge the best. SK Porwal College finished second with six points.

In women's section, JCPE collected 13 points while Nasikrao Tirpude College of Physical Education earned six points to finish second.

Earlier, the championship was inaugurated by Dr Vishakha Joshi, Acting Director, Department of Physical Education and Sports, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

Dr Kartij Uttarwar, Principal, Lokmanya Tilak Institute of Management Studies, Dr Vijay Datarkar, Principal, JCPE were also present.

Dr Surendra Tiwari was the technical director of the championship.

Dr Raju Raut, Dr Mohan Kadwe, Dr Sonali Bandre, Prof Nitin Yemde worked hard for the success of the event.

देशोन्नती

# डॉ. एम.के. पारिख स्मृती पुरस्काराने डॉ. प्रकाश इटनकर सन्मानित



देशोन्नती वृत्तसंकलन

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. प्रकाश इटनकर यांना २०२४ साठीच्या प्रतिष्ठित डॉ. के. एम. पारिख स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारतीय पारंपरिक आशियाई औषध अभ्यास संघटना यांच्या वतीने आयुर्वेदिक तत्त्वे आणि निसर्गाच्या नियमांवर आधारित नैसर्गिक उत्पादने आणि पद्धती स्थापित करण्यात उत्कृष्ट योगदान दिल्याने डॉ. इटनकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. इटनकर यांनी पारंपरिक ज्ञानाचा आधुनिक औषध पद्धतींसह सांगड घालून वैज्ञानिक संशोधनाद्वारे आयुर्वेदिक ज्ञानाचा प्रचार केला. नैसर्गिक उत्पादनांच्या संशोधन आणि विकासात, विशेषतः आयुर्वेदातील वैज्ञानिक पायाभूत तत्त्वे यामध्ये डॉ. इटनकर यांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. आयुर्वेदाच्या तत्त्वज्ञानाचे समजून घेण्यास आणि त्याचा वापर करण्यास प्रगतीच्या दिशेने त्यांचे प्रयत्न आहे. पारंपरिक पद्धती आणि आधुनिक औषध यांच्या दरम्यानचे अंतर कमी करण्यात त्यांच्या कार्याचा प्रभाव शिक्षण क्षेत्र आणि आरोग्य सेवा क्षेत्रात स्पष्टपणे दिसून येत आहे. आयुर्वेदिक विज्ञानाचे जतन आणि प्रचाराचे समर्पण तसेच आजच्या आरोग्यसेवा क्षेत्रात नैसर्गिक उत्पादनांना अधिक सुलभ आणि वैज्ञानिक मान्यता मिळवण्यासाठी त्यांचे अतुलनीय कार्य असल्याने डॉ. इटनकर यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार मिळाल्याने विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, औषधी निर्माणशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत पुराणिक, माजी विभागप्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर यांच्यासह शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

Nagpur Edition
Oct 25, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

TheHitavada
Nagpur City Line | 2024-10-25 | Page- 4
ehitavada.com

# Hindi play 'Mohjaal' creates awareness on drug addiction



A still from the play enacted at Gurunanak Bhavan.

■ Staff Reporter

THE Students' Welfare Department of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) organised a play 'Mohjaal' at Gurunanak Bhavan to raise awareness among youth on the rising cases of drug addiction and its negative consequences. The play was staged by Radhika Creations group.

Dr Raju Hiwase, Registrar of RTMNU; Dr Sanjay Kavishwar, Director Incharge of Examination and Evaluation Department; Dr Vijay Khandal, Director of Students' Welfare Department, were present as chief guests.

The play was produced by Radhika Creations and Ranjan Kala Mandir Nagpur-Pune, directed by Sanjay Pendse, written by Prasanna Shembekar, choreography by Saurabh Masram.

देशोन्नती

# जखमेवर लावा आता कृत्रिम त्वचा

■ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे संशोधन

■ संशोधकांनी शोधली अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा



देशोन्नती वृत्तसंकलन

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोलॉजी विभागातील संशोधकांनी अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा शोधून काढली आहे. संशोधकांच्या संशोधनामुळे आता जखमेवर मलमपट्टी न करता कृत्रिम त्वचाच लावता येणार आहे. विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोलॉजी विभागप्रमुख डॉ. दयानंद गोगले आणि लिटूच्या बायोटेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. आरती शनवारे यांनी प्रकल्पप्रमुख डॉ. बिपिन लाडे यांच्या मदतीने हे संशोधनकार्य पूर्ण केले आहे.

जखम झाली की मलम लावत पट्टी बांधायची अशी वर्षानुवर्षे पद्धत आहे. मात्र, या मलमपट्टीऐवजी विद्यापीठाच्या संशोधकांनी निर्माण केलेली कृत्रिम त्वचा जखमेवर लावता येणार आहे. जखम झालेल्या जागेवर पट्टीच्या ऐवजी या कृत्रिमत्वचेचा तुकडा लावल्याने जखम सुकेल आणि बरी होईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या औषधीय घटकांचा वापर या कृत्रिम त्वचेत करण्यात आला आहे. या [illegible] झाकली जाईल [illegible]ईल. जखम [illegible] कमी वेळात [illegible]येण्यासही या [illegible] शक्य होणार आहे. सोबतच ही त्वचा जैवविघटनशील असल्याने जखमेवर काढून टाकल्यानंतरही ती आपोआप विघटित होईल आणि त्यातून दीर्घकाळ टिकणाऱ्या कचऱ्याचा प्रश्नही निर्माण होणार नाही.

राजीव गांधी जैविक तंत्रज्ञान (आरजीबीसी) प्रकल्प अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर वनस्पती विभागाने संक्रमण रोखण्यासाठी आणि जखमांच्या बरे होण्यासाठी अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली नवीन कृत्रिम त्वचा विकसित करण्याबाबत २०१९-२०२० मध्ये संशोधनास सुरुवात केली.

या नाविन्यपूर्ण संशोधनाकरिता आवश्यक सामग्रीत सोडियम अल्जिनेट, जिलेटिन, किटोसन आणि अँटीमायक्रोबियल एजंट यांचा समावेश आहे. ज्यामुळे उच्च दर्जाच्या जखमा लवकर बरी होण्याकरिता मदत मिळेल. बायोटेक्नॉलॉजीचे विद्यार्थी आकाश कांदी यांनी संशोधन कार्यात सहभाग घेतला.

**नाविन्यपूर्णता**

जखमांवर मलमपट्टी करण्याची वर्षानुवर्षीची पद्धत अनेकदा संक्रमण रोखण्यात अपयशी ठरते. त्यामुळे या समस्येवर उपाय म्हणून संशोधकांनी सोडियम अल्जिनेट, जिलेटिन आणि किटोसन यांचा वापर करून कृत्रिम त्वचा तयार केली. संशोधकांनी पर्यावरणास अनुकूल अशा घटकांचा वापर केला. कृत्रिम त्वचा ही नैसर्गिक त्वचेसारखी दिसू शकते.

**मुख्य वैशिष्ट्ये**

संशोधकांनी निर्माण केलेल्या कृत्रिम त्वचेमध्ये अँटीमायक्रोबियल गुणधर्म असून ज्यामध्ये गॅलिक ॲसिड आणि थायमॉल यांचा समावेश आहे. यातील नैसर्गिक गुणधर्म जंतूंना मारत संक्रमण रोखण्यास मदत करते.

**सुरक्षा**

संशोधकांनी निर्माण केलेली कृत्रिम त्वचा ही नैसर्गिक त्वचेकरिता हानिकारक नसल्याचे विविध चाचण्यांमधून दिसून आले. अँटीमायक्रोबियल गुणधर्म असल्याने जखम लवकर सुकत बरी होण्यास मदत मिळणार आहे. याकरिता कृत्रिम त्वचेमध्ये समाविष्ट असलेल्या विविध औषधी गुणधर्मांमध्ये जखम लवकर बरी करण्याची क्षमता आहे.

Nagpur Edition
Oct 25, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

# NU's prof Prakash Itankar bestowed Dr Parikh award



Prakash Itankar, a professor at the department of pharmaceutical sciences, Nagpur University, was awarded the prestigious **Dr KM Parikh Memorial Award for Excellence 2024.** This esteemed recognition was conferred by the Indian Association for the Study of Traditional Asian Medicine (IASTAM-India) for his outstanding contributions in establishing natural products and practices based on Ayurvedic principles and the Law of Nature. The award is presented in memory of Dr KM Parikh, a visionary in Ayurvedic pharmaceutical research and development, and founder and treasurer of IASTAM-India. Itankar's work in promoting Ayurvedic wisdom through scientific research and integrating traditional knowledge with modern pharmaceutical practices earned him this honour. Itankar's contributions to the field, particularly in the research and development of natural products with a scientific foundation in Ayurveda, significantly advanced the understanding and application of Ayurvedic principles.

नवभारत

# कबड्डी : 19 अंकों से जीती नागपुर विद्यापीठ की टीम



■ नागपुर, खेल प्रतिनिधि. वेस्ट जोन इंटर यूनिवर्सिटी महिला कबड्डी टूर्नामेंट का आयोजन संत गाडगे बाबा यूनिवर्सिटी अमरावती में किया जा रहा है. यहां आरटीएम नागपुर विद्यापीठ की महिला टीम ने शानदार प्रदर्शन कर जोन सी क्लियर कर लिया. टीम का चौथा मुकाबला महाराजा गंगासिंह यूनिवर्सिटी बीकानेर से हुआ. इसमें नागपुर विद्यापीठ की टीम ने 19 अंकों से जीत दर्ज की. इस जीत के साथ टीम ने जोन सी क्लियर कर लिया. अब अगला क्वालीफिकेशन मैच मुंबई यूनिवर्सिटी के साथ होगा.

Nagpur Plus Edition
Oct 25, 2024 Page No. 4
Powered by: navbharatlive.com

लोकमत

# नागपूर विद्यापीठाचे विधी जर्नल प्रकाशित

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ विधी जर्नलच्या प्रथम आवृत्तीचे प्रकाशन प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. प्रकाशन शुभारंभाला कुलसचिव डॉ. राजू हिवसे, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, पदव्युत्तर विधी विभागप्रमुख डॉ. पायल ठावरे यांची उपस्थिती होती. विद्यापीठाच्या विधी जर्नलच्या सल्लागार मंडळात जागतिक स्तरावरील कायदेतज्ज्ञांचा समावेश आहे. पहिल्या अंकात भारतातील प्रसिद्ध तज्ज्ञांचे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. या जर्नलचा उद्देश संशोधकांमध्ये संवाद आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे आहे.

Hello Nagpur
Page No. 2 Oct 25, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

ॲण्टिमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा : नागपूर विद्यापीठाच्या संशोधकांचे यश

# जखमेवर मलमपट्टी विसरा, थेट कृत्रिम त्वचाच लावा

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : जखम झाली की मलम लावत पट्टी बांधायची असा उपचार वर्षानुवर्षांपासून केला जात आहे. मात्र आता अशी मलमपट्टी करण्यापेक्षा जखमेच्या ठिकाणी दुसरी त्वचाच लावण्याचे संशोधन नागपूर विद्यापीठाच्या संशोधकांनी केले आहे. ॲण्टिमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा लावल्याने जखम वेगाने बरी होईल आणि संक्रमणही वाढणार नाही, असा दावा संशोधकांनी केला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोलॉजी विभागातील संशोधकांनी ॲण्टिमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा शोधून तयार केली आहे. मॉलिक्युलर बायोलॉजी विभाग प्रमुख डॉ. दयानंद गोगले आणि लिटूच्या बायोटेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. आरती शनवारे यांनी प्रकल्पप्रमुख डॉ. विपीन लाडे यांच्या मदतीने हे संशोधनकार्य पूर्ण केले आहे. बायोटेक्नोलॉजीचे विद्यार्थी आकाश कांदी यांचाही सहभाग आहे. राजीव गांधी जैविक तंत्रज्ञान (आरजीबीसी) प्रकल्पाअंतर्गत विद्यापीठातील पदव्युत्तर वनस्पती विभागाने जखमांमुळे होणारे संक्रमण रोखण्यासाठी व बरे होण्यासाठी ॲण्टिमायक्रोबियल गुणधर्म असलेली नवीन कृत्रिम त्वचा विकसित करण्याबाबत २०१९-२०२० मध्ये संशोधनास सुरुवात केली. यात विद्यापीठाच्या संशोधकांना क्रांतिकारी यश मिळाले आहे.



नागपूर विद्यापीठाच्या संशोधकांनी तयार केलेली कृत्रिम त्वचा.

**कसा करायचा उपयोग?**

१ जखम झालेल्या जागेवर पट्टीच्या ऐवजी या कृत्रिम त्वचेचा तुकडा लावल्याने जखम सुकेल आणि बरी होईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या औषधीय घटकांचा वापर या कृत्रिम त्वचेत करण्यात आला आहे. या त्वचेमुळे जखम झाकली जाईल आणि बरीही होईल. जखम झालेल्या ठिकाणी कमी वेळात नैसर्गिक त्वचा येण्यासही या संशोधनामुळे शक्य होणार आहे. ही त्वचा जैवविघटनशील असल्याने जखमेवरून काढून टाकल्यानंतरही ती आपोआप विघटित होईल आणि त्यातून दीर्घकाळ टिकणाऱ्या कचऱ्याचा प्रश्नही निर्माण होणार नाही.

**कोणते घटक वापरले?**

२ या नावीन्यपूर्ण संशोधनात सोडियम अल्जिनेट, जिलेटिन, किटोसन आणि ॲण्टिमायक्रोबियल एजंट यांचा वापर करून कृत्रिम त्वचा तयार केली, ज्यामुळे उच्च दर्जाच्या जखमा लवकर बरी होण्याकरिता मदत मिळेल.

**नावीन्यपूर्ण वैशिष्ट्ये**

३ जखमांवर मलमपट्टी करण्याची वर्षानुवर्षांची पद्धत अनेकदा संक्रमण रोखण्यात अपयशी ठरते. कृत्रिम त्वचेमध्ये ॲण्टिमायक्रोबियल गुणधर्म असून, ज्यामध्ये गॅलिक ॲसिड आणि थायमॉल यांचा समावेश आहे. यातील नैसर्गिक गुणधर्म जंतूंना मारत संक्रमण रोखण्यास मदत करते. कृत्रिम त्वचा ही नैसर्गिक त्वचेसारखी दिसू शकते. संशोधकांनी निर्माण केलेली कृत्रिम त्वचा ही नैसर्गिक त्वचेकरिता हानिकारक नसल्याचे विविध चाचण्यांमधून दिसून आले.

Hello Nagpur
Page No. 4 Oct 25, 2024
Powered by: erelego.com

# 'EBSD tech can help record data on quakes'



**Nagpur: Mariani Elisabetta** from the University of Liverpool, England, emphasised the significant contribution of Electron Backscatter Diffraction (EBSD) technology in studying various elements like minerals and structures on Earth, **reports Sarfaraz Ahmed.**

She was delivering a lecture at the department of geology, Nagpur University, on Wednesday, in memory of former department head professor Shripadrao Kilpade.

The event was presided over by acting vice-chancellor Prashant Bokare, with notable guests including Mariani Elisabetta, Sam Gregor, and Kirtikumar Randive. Mariani discussed the use of EBSD technology in Earth sciences, explaining how to conduct detailed studies of minerals and their structures. She also described how this technology can record geological data on earthquake0s and investigate the current state of the Earth.

Sam Gregor shared insights on 'Identifying lithium content in granite'. Bokare noted the shift from easy jobs after graduation in the past to the current competition for govt jobs, and ample jobs in private sector.

लोकसत्ता

# 'अन्न ग्रहण नियमनात मेंदूची भूमिका महत्त्वपूर्ण'

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : अन्नग्रहण नियमनात मेंदूची महत्त्वपूर्ण भूमिका असते, अशी माहिती कॅनडा येथील मॅकइवन विद्यापीठाच्या नर्सिंग फाऊंडेशन अँड सायन्स विभागातील असोसिएट प्रोफेसर डॉ. राज नारनवरे यांनी दिली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागात झालेल्या अतिथी व्याख्यानादरम्यान ते बोलत होते.

या कार्यक्रमाला विभाग प्रमुख डॉ. व्ही.टी. धुर्वे, प्राणिशास्त्र सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ. सुरेश मसराम यांची उपस्थिती होती.

अन्न ग्रहण नियमनात मस्तिष्कातील न्यूरोन्सची प्रक्रिया तसेच हार्मोन्सचे परिणाम शोधण्यासाठी शरीर विज्ञानाची परिपूर्ण माहिती आवश्यक असते, याकडे डॉ. राज नारनवरे यांनी या कार्यक्रमात लक्ष वेधले.



'अन्न ग्रहणाचे मस्तिष्क नियमन : जीवन विज्ञानातील संशोधन आणि त्याची भविष्यातील संभाव्यता' या विषयावर बोलताना डॉ. नारनवरे यांनी अन्न ग्रहणाचा मेंदू आणि रोगप्रतिकारक प्रणालीशी कशाप्रकारे परस्पर संबंध आहे, याची विस्तृत माहिती दिली. वैद्यकीय तसेच नर्सिंगचे शिक्षण घेत असताना अभ्यासक्रमात शरीर शास्त्रासोबत शरीर विज्ञान संबंधी माहिती असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ वर्षात अभ्यासक्रमात कशाप्रकारे कोणता भाग असावा याबाबत त्यांनी पीपीटीद्वारे माहिती दिली. या विषयासंबंधी संशोधन करताना त्यांनी गोल्ड फिशवर केलेल्या प्रयोगाचे देखील वर्णन केले. शरीर विज्ञानसंबंधी माहिती असल्यास रुग्णालयात आलेल्या रुग्णांवर उपचार करताना त्याचा उपयोग वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांना होतो, असे ते म्हणाले. तत्पूर्वी डॉ. नारनवरे यांनी प्राणिशास्त्र सोसायटीचे उद्‌घाटन झाल्याचे घोषित केले. अध्यक्षीय भाषण करताना विभाग प्रमुख डॉ. व्ही. टी. धुर्वे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका सांगितली. यावेळी त्यांनी प्राणिशास्त्र सोसायटीचे गठन मागील महिन्यात करण्यात आल्याचे सांगितले. प्राणिशास्त्र सोसायटीचे सचिव आदित्य कडबे यांनी संपूर्ण वर्षभराचा विभागाचा शैक्षणिक अहवाल सादर केला. संचलन डॉ. सुरेश मसराम यांनी केले तर आभार प्राची राठोड यांनी मानले.

25/10/2024 | Nagpur | Page : 12
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता

# रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे यश

## ११ विद्यार्थी 'सेट' उत्तीर्ण

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील महत्त्वपूर्ण परीक्षांमध्ये यश संपादन केले आहे. सीएसआयआर-नेट परीक्षेत विभागातील विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांनी अधिछात्रवृत्तीही मिळवली आहे. तर ११ विद्यार्थ्यांनी सेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३ मधील प्रतिभावान विद्यार्थी प्रज्ज्वल उडान याने सीएसआयआर-नेट परीक्षेत यश मिळवले. प्रज्ज्वल हा वर्धा जिल्ह्यातील अकोली गावातील शेतकरी कुटुंबातील मुलगा आहे. त्याच्या यशामुळे विभागासाठी हा अभिमानास्पद क्षण ठरला आहे. प्रज्ज्वलने यावर्षी सेट आणि गेट परीक्षाही उत्तीर्ण केल्या. या यशातून प्रज्ज्वलचे शैक्षणिक क्षेत्रात असलेले समर्पण दिसून येत आहे.

आयआयटी किंवा आयआयएससी, बेंगलोरसारख्या सर्वोच्च संस्थांमध्ये संशोधन कार्य करण्याचा त्याचा मानस आहे. पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागाच्या ६० वर्षांच्या इतिहासातील हे यश मैलाचा दगड ठरणारे आहे. विभागातील ११ विद्यार्थ्यांनी वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक असलेली प्रतिष्ठित महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

26/10/2024 | Nagpur | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com

नवराष्ट्र

# कबड्डीत महिला संघ विजेता



**नागपूर.** वेस्ट झोन आंतरविद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती येथे केले जात आहे. तेथे आरटीएम नागपूर विद्यापीठाच्या महिला टीमने शानदार प्रदर्शन करून झोन सं... पूर्ण केले. टीमचा चौथा सामना महाराजा गंगासिंह युनिव्हर्सिटी बिकानेरशी झाला. यात नागपूर विद्यापीठाच्या संघाने 19 अंकांसह विजय नोंदविला. य... विजयासोबतच टीमने झोन सं... पूर्ण केले.

Orange City Plus Edition
Oct 25, 2024 Page No. 7
Powered by: NavaRashtra.com

# PGTD of Law releases maiden Nagpur University Law Journal



The inaugural edition of **Nagpur University Law Journal** published by post graduate teaching department of law (PGTD of Law) was released by NU vice-chancellor **Prashant Bokare** on October 23.

